# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा
## कार्यपत्रिका क्रमांक – ४८
## सभावृत्तांत

दिनांक – १८.०९.२०२० वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे सप्टेंबर-२०२० ची मासिक मा.महापालिका सभा शुक्रवार दिनांक १८/०९/२०२० रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे महापौर

२) मा.तुषार रघुनाथ हिंगे उपमहापौर

३) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे

४) मा.साधना अंकुश मळेकर

५) मा.अश्विनी संतोष जाधव

६) मा.सारीका शिवाजी सस्ते

७) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

८) मा.गायकवाड निर्मला मनोज

९) मा.गोफणे अनुराधा देविदास

१०) मा.बारसे प्रियांका प्रविण

११) मा.अजित दामोदर गव्हाणे

१२) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

१३) मा.लांडगे रवि लक्ष्मण

१४) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

१५) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

१६) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

१७) मा.सावळे सिमा रविंद्र

१८) मा.लोंढे नम्रता योगेश

१९) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२०) मा.गीता सुशिल मंचरकर

२१) मा.राहुल हनुमंतराव भोसले

२२) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

२३) मा.मंगला अशोक कदम

२४) मा.संजय बबन नेवाळे

२५) मा.भालेकर प्रविण महादेव

२६) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

२७) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

२८) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

२९) मा.घोलप कमल अनिल

३०) मा.उत्तम प्रकाश केंदळे

३१) मा.पवळे सुमनताई मधुकर

३२) मा.चिखले सचिन तुकाराम

३३) मा.यादव मीनल विशाल

३४) मा.वैशाली जालिंदर काळभोर

३५) मा.राजू मिसाळ

३६) मा.शैलजा अविनाश मोरे

३७) मा.बाबर शर्मिला राजू

३८) मा.अमित राजेंद्र गावडे

३९) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

४०) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

४१) मा.ढाके नामदेव जनार्दन

४२) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

४३) मा.करुणा शेखर चिंचवडे

४४) मा.भोईर सुरेश शिवाजी

४५) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

४६) मा.सुलक्षणा राजू धर

४७) मा.शाम गणपतराव लांडे

४८) मा.सुजाता सुनिल पालांडे

४९) मा.योगेश मंगलसेन बहल

५०) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

५१) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

५२) मा.नढे विनोद जयवंत

५३) मा.कोकणे संतोष अंकुश

५४) मा.बारणे अर्चना तानाजी

५५) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

५६) मा. ॲड.भोसले सचिन सुरेश

५७) मा.बारणे माया संतोष

५८) मा.निलेश हिरामण बारणे

५९) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

६०) मा.कलाटे राहुल तानाजी

६१) मा.कामठे तुषार गजानन

६२) मा.चोंधे आरती सुरेश

६३) मा.कस्पटे संदिप अरुण

६४) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

६५) मा.सविता बाळकृष्ण खुळे

६६) मा.सुनिता हेमंत तापकीर

६७) मा.चंद्रकांत बारकु नखाते

६८) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

६९) मा.कुटे निर्मला संजय

७०) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

७१) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

७२) मा.आंगोळकर सागर सुनिल

७३) मा.मुंढे उषा अंकुश

७४) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

७५) मा.आशा धायगुडे-शेंडगे

७६) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

७७) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

७८) मा.नवनाथ दत्तू जगताप

७९) मा.संतोष बबन कांबळे

८०) मा. संजय मल्हारराव वाबळे

८१) मा. भाऊसाहेब सोपानराव भोईर

८२) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

८३) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

८४) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.संतोष पाटील- मा.अतिरिक्त आयुक्त (१), मा.अजित पवार- मा.अतिरिक्त आयुक्त (२), मा.प्रविण तुपे-अतिरिक्त आयुक्त (३), मा.उल्हास जगताप- नगरसचिव, मा.बोदडे- सहा.आयुक्त, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----

**मा.महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक, मा.नगरसेविका, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.ज्ञानदेव थोरात –** मा.महापौर साहेब, प्रणव मुखर्जी- भारताचे माजी राष्ट्रपती यांचे निधन, साहेबराव खरात – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी नगरसेवक यांचे निधन, चंद्रकला नायर – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे नगरसेवक प्रेमकुमार

उर्फ बाबु नायर यांच्या मातोश्री यांचे निधन, वसंत वाणी – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी नगरसेवक व माजी भाजपा शहराध्यक्ष यांचे निधन, रामकृष्ण बाबा पाटील – माजी खासदार व कॉंग्रेसचे जेष्ठ नेते यांचे निधन, दत्ता एकबोटे – पुणे महानगरपालिकेचे माजी महापौर यांचे निधन, डॉ.गोविंद स्वरुप – जेष्ठ खगोलशास्त्रज्ञ यांचे निधन, चंद्रलेखाराजे भोसले – सातारा घराण्यातील छत्रपती शिवाजीराजे भोसले यांच्या पत्नी यांचे निधन, स्वामी अग्निवेश – सामाजिक कार्यकर्ते यांचे निधन, राजेंद्र भिसे – पिंपरी चिंचवड मनपातील कॉम्प्युटर ऑपरेटर यांचे निधन, काळुराम नलावडे - पिंपरी चिंचवड मनपातील शिपाई यांचे निधन, संभाजी पवार - पिंपरी चिंचवड मनपातील शिपाई यांचे निधन, कमल काटे- नगरसदस्य रोहित आप्पा काटे यांच्या मातोश्री यांचे दु:खद निधन झाले असल्याने त्यांना आजच्या सभेत श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.अंबरनाथ कांबळे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर -** श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे. (सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.नामदेव ढाके-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. खर म्हणजे आपल्या देशाचे तेरावे राष्ट्रपती आदरणीय प्रणवजी मुखर्जी यांच ३१ ऑगष्टला वयाच्या ८४ व्या वर्षी दु:खद निधन झाल. त्यांच्या जाण्याने कॉंग्रेस पक्षाची खुप मोठी हानी झालेली आहे. कारण कॉंग्रेस पक्षाचे जवळपास ६० वर्षे त्यांनी काम केलं. कॉंग्रेसमध्ये त्यांना संकटमोचक म्हणून बघीतल जात होतं. २०१९ ला त्यांना भारतरत्न म्हणून गौरवण्यात आलं. सातत्याने लोकसभेमध्ये असेल, राज्यसभेमध्ये असेल आपला कर्तत्वाचा ठसा आदरणीय प्रणवजी मुखर्जी यांनी उमटविला. एकंदरीतच एक अभ्यासू व्यक्तीमत्व म्हणून कॉंग्रेसमध्ये त्यांची ओळख होती. त्यांच्या जाण्यामुळे कॉंग्रेसची खुप मोठी हानी झालेली आहे. सर्वसामान्यांचे प्रश्न लोकसभेमध्ये त्यांच्याकडून मांडले जात होते आणि म्हणून त्यांना भारतरत्न मिळाल, जे आपल्या देशाचे राष्ट्रपती होते त्यांच्यासाठी आपली ही महासभा मंगळवाद दि. ६/१०/२०२० रोजी दु.२.०० पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.तुषार हिंगे –** मा.महापौर साहेब, तहकूबी सूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.महापौर –** उपस्थित सर्व सन्मा.सदस्यांच्या भावना लक्षात घेता ही सभा मंगळवार दि. ६/१०/२०२० रोजी दु.२.०० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

----

(उषा उर्फ माई मनोहर ढोरे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**
**कार्यपत्रिका क्रमांक – ४८**
**सभावृत्तांत**
**(दि.१८/९/२०२० ची तहकूब सभा)**

दिनांक – ६.१०.२०२० वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.१८/९/२०२० ची तहकूब मा. महापालिका सभा मंगळवाद दिनांक ६/१०/२०२० रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे महापौर
२) मा.कुंदन अंबादास गायकवाड
३) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे
४) मा.साधना अंकुश मळेकर
५) मा.अश्विनी संतोष जाधव
६) मा.सारीका शिवाजी सस्ते
७) मा.राहुल गुलाब जाधव
८) मा.वसंत प्रभाकर बोराटे
९) मा.बुर्डे सुवर्णा विकास
१०) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते
११) मा.गायकवाड निर्मला मनोज
१२) मा.गोफणे अनुराधा देविदास

१३) मा.बारसे प्रियांका प्रविण

१४) मा.अजित दामोदर गव्हाणे

१५) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

१६) मा.लांडगे सारिका संतोष

१७) मा.लांडगे रवि लक्ष्मण

१८) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

१९) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२०) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२१) मा.सावळे सिमा रविंद्र

२२) मा.लोंढे नम्रता योगेश

२३) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२४) मा.गीता सुशिल मंचरकर

२५) मा.राहुल हनुमंतराव भोसले

२६) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

२७) मा.अनुराधा गणपत गोरखे

२८) मा.केशव हनुमंत घोळवे

२९) मा.मंगला अशोक कदम

३०) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३१) मा.संजय बबन नेवाळे

३२) मा.एकनाथ रावसाहेब पवार

३३) मा.भालेकर प्रविण महादेव

३४) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

३५) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

३६) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

३७) मा.घोलप कमल अनिल

३८) मा.उत्तम प्रकाश केंदळे

३९) मा.चिखले सचिन तुकाराम

४०) मा.यादव मीनल विशाल

४१) मा.वैशाली जालिंदर काळभोर

४२) मा.प्रमोद कुटे

४३) मा.राजू मिसाळ

४४) मा.शैलजा अविनाश मोरे

४५) मा.बाबर शर्मिला राजू

४६) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

४७) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

४८) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

४९) मा.ढाके नामदेव जनार्दन

५०) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

५१) मा.करुणा शेखर चिंचवडे

५२) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

५३) मा.अपर्णा निलेश डोके

५४) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

५५) मा.गावडे राजेंद्र तानाजी

५६) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

५७) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

५८) मा.सुलक्षणा राजू धर

५९) मा.शाम गणपतराव लांडे

६०) मा.सुजाता सुनिल पालांडे

६१) मा.कदम निकीता अर्जुन

६२) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

६३) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

६४) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

६५) मा.नढे विनोद जयवंत

६६) मा.पाडाळे निता विलास

६७) मा.काळे उषा दिलीप

६८) मा.कोकणे संतोष अंकुश

६९) मा.पवार मनिषा प्रमोद

७०) मा.बारणे अर्चना तानाजी

७१) मा.अभिषेक गोविंद बारणे

७२) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

७३) मा.बारणे माया संतोष

७४) मा.निलेश हिरामण बारणे

७५) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

७६) मा.दर्शले रेखा राजेश

७७) मा.कलाटे राहुल तानाजी

७८) मा.कामठे तुषार गजानन

७९) मा.चौंधे आरती सुरेश

८०) मा.कस्पटे संदिप अरुण

८१) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

८२) मा.सविता बाळकृष्ण खुळे

८३) मा.चंद्रकांत बारकु नखाते

८४) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

८५) मा.कुटे निर्मला संजय

८६) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

८७) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

८८) मा.आंगोळकर सागर सुनिल

८९) मा.मुंढे उषा अंकुश

९०) मा.कदम शशिकांत गणपत

९१) मा.लोखंडे चंदा राजू

९२) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

९३) मा.आशा धायगुडे-शेंडगे

९४) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

९५) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

९६) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

९७) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

९८) मा.नवनाथ दत्तू जगताप

९९) मा.संतोष बबन कांबळे

१००) मा.सोनवणे शारदा हिरेन

१०१) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

१०२) मा. वाबळे संजय मल्हारराव

१०३) मा. भाऊसाहेब सोपानराव भोईर

१०४) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

१०५) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१०६) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर- आयुक्त, मा.अजित पवार - अतिरिक्त आयुक्त (२), मा.प्रविण तुपे-अतिरिक्त आयुक्त (३), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.चारठाणकर– उपआयुक्त, मा.पवार- उपसंचालक नगररचना, मा.सवणे-सह शहर अभियंता, मा.इंदलकर, मा.लोणकर-सहा.आयुक्त, मा.डॉ.साळवे-अति.वैदयकीय अधिकारी, मा.डॉ.वाबळे- अधिष्ठता वायसीएमएच हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----

**मा. महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक, मा. नगरसेविका, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.नामदेव ढाके –** मा.महापौर साहेब, ही सभा मंगळवार दि.१३/१०/२०२० रोजी दुपारी २.०० पर्यंत तहकुब करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.संतोष लोंढे** – मा.महापौर साहेब, तहकुबी सूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.महापौर** – आजची सभा मंगळवार दि.१३/१०/२०२० रोजी दुपारी २.०० पर्यंत तहकुब करणेत येत आहे.

-------

(उषा उर्फ माई मनोहर ढोरे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८.

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक – ४८</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

**<u>(दि. १८/९/२०२० व ६/१०/२०२० (दु.२.००) ची तहकूब सभा)</u>**

<u>दिनांक – १३.१०.२०२०</u> <u>वेळ – दुपारी २.०० वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.६/१०/२०२० (दु.२.०० वा.) ची तहकूब मा. महापालिका सभा मंगळवार दिनांक १३/१०/२०२० रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे | महापौर |
| २) | मा.तुषार रघुनाथ हिंगे | उपमहापौर |
| ३) | मा.कुंदन अंबादास गायकवाड | |
| ४) | मा.राहुल गुलाब जाधव | |
| ५) | मा.वसंत प्रभाकर बोराटे | |
| ६) | मा.बुर्डे सुवर्णा विकास | |
| ७) | मा.तापकीर विनया प्रदीप (आबा) | |
| ८) | मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते | |
| ९) | मा.गायकवाड निर्मला मनोज | |
| १०) | मा.सागर बाळासाहेब गवळी | |
| ११) | मा.गोफणे अनुराधा देविदास | |
| १२) | मा.बारसे प्रियांका प्रविण | |
| १३) | मा.अजित दामोदर गव्हाणे | |

१४)	मा.बोईनवाड यशोदा प्रकाश

१५)	मा.लांडगे सारिका संतोष

१६)	मा.लांडगे राजेंद्र किसनराव

१७)	मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

१८)	मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

१९)	मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२०)	मा.सावळे सिमा रविंद्र

२१)	मा.लोंढे नम्रता योगेश

२२)	मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२३)	मा.गीता सुशिल मंचरकर

२४)	मा.राहुल हनुमंतराव भोसले

२५)	मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

२६)	मा.अनुराधा गणपत गोरखे

२७)	मा.केशव हनुमंत घोळवे

२८)	मा.अश्विनी भिमा बोबडे

२९)	मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३०)	मा.संजय बबन नेवाळे

३१)	मा.एकनाथ रावसाहेब पवार

३२)	मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

३३)	मा.पंकज दत्तात्रय भालेकर

३४)	मा.घोलप कमल अनिल

३५)	मा.उत्तम प्रकाश केंदळे

३६)	मा.चिखले सचिन तुकाराम

३७)	मा.यादव मीनल विशाल

३८)	मा.वैशाली जालिंदर काळभोर

३९)	मा.प्रमोद कुटे

४०)	मा.राजू मिसाळ

४१) मा.शैलजा अविनाश मोरे

४२) मा.बाबर शर्मिला राजू

४३) मा.अमित राजेंद्र गावडे

४४) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

४५) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

४६) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

४७) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

४८) मा.ढाके नामदेव जनार्दन

४९) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

५०) मा.करुणा शेखर चिंचवडे

५१) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

५२) मा.अपर्णा निलेश डोके

५३) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

५४) मा.गावडे राजेंद्र तानाजी

५५) मा.कोमल दिपक मेवानी

५६) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

५७) मा.शाम गणपतराव लांडे

५८) मा.सुजाता सुनिल पालांडे

५९) मा.योगेश मंगलसेन बहल

६०) मा.कदम निकीता अर्जुन

६१) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

६२) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

६३) मा.पाडाळे निता विलास

६४) मा.काळे उषा दिलीप

६५) मा.पवार मनिषा प्रमोद

६६) मा.बारणे अर्चना तानाजी

६७) मा.अभिषेक गोविंद बारणे

६८) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

६९) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

७०) मा.निलेश हिरामण बारणे

७१) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

७२) मा.दर्शले रेखा राजेश

७३) मा.कलाटे राहुल तानाजी

७४) मा.ममता विनायक गायकवाड

७५) मा.कामठे तुषार गजानन

७६) मा.चोंधे आरती सुरेश

७७) मा.कस्पटे संदिप अरुण

७८) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

७९) मा.सविता बाळकृष्ण खुळे

८०) मा.सुनिता हेमंत तापकीर

८१) मा.चंद्रकांत बारकु नखाते

८२) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

८३) मा.कुटे निर्मला संजय

८४) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

८५) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

८६) मा.आंगोळकर सागर सुनिल

८७) मा.मुंढे उषा अंकुश

८८) मा.कदम शशिकांत गणपत

८९) मा.लोखंडे चंदा राजू

९०) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

९१) मा.आशा धायगुडे-शेंडगे

९२) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

९३) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

९४) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

९५) मा.नवनाथ दत्तू जगताप

९६) मा.संतोष बबन कांबळे

९७) मा.सोनवणे शारदा हिरेन

९८) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

९९) मा.भाऊसाहेब सोपानराव भोईर

१००) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

१०१) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१०२) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर-आयुक्त, मा.संतोष पाटील- अतिरिक्त आयुक्त (१), मा.अजित पवार - अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.सुभाष इंगळे, मा.चारटणर- उपआयुक्त, मा.कोळंबे- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.निकम, मा.सवणे-सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.लोणकर, मा.बोदडे-सहा.आयुक्त, मा.मुंढे-प्र.शिक्षणाधिकारी, मा.डॉ.साळवे-अति.आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.डॉ.वाबळे- अधिष्ठता वायसीएमएच, मा.गायकवाड-जनतासंपर्क अधिकारी, मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी, मा.गोफणे-आरोग्य अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----

**मा.महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक, मा. नगरसेविका, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, ही सभा आज दि.१३/१०/२०२० दु. २.२० पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.ॲड.मोरेश्वर शेडगे -** मा.महापौर साहेब, तहकूब सूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.महापौर** – ही सभा मंगळवार दि.१३/१०/२०२० रोजी दुपारी २.२० पर्यंत तहकुब करणेत येत आहे.

-------

(उषा उर्फ माई मनोहर ढोरे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – ४८**

**सभावृत्तांत**

**(दि. १८/९/२०२० व ६/१०/२०२० (दु.२.००), दि.१३/१०/२०२० (दु.२.००) ची तहकूब सभा)**

दिनांक – १३.१०.२०२० वेळ – दुपारी २.२० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.१३/१०/२०२० (दु.२.०० वा.) ची तहकूब मा. महापालिका सभा मंगळवार दिनांक १३/१०/२०२० रोजी दुपारी २.२० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे | महापौर |
| २) | मा.तुषार रघुनाथ हिंगे | उपमहापौर |
| ३) | मा.कुंदन अंबादास गायकवाड | |
| ४) | मा.राहुल गुलाब जाधव | |
| ५) | मा.वसंत प्रभाकर बोराटे | |
| ६) | मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे | |
| ७) | मा.बुर्डे सुवर्णा विकास | |
| ८) | मा.तापकीर विनया प्रदीप (आबा) | |
| ९) | मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते | |
| १०) | मा.गायकवाड निर्मला मनोज | |
| ११) | मा.सागर बाळासाहेब गवळी | |

१२) मा.गोफणे अनुराधा देविदास

१३) मा.बारसे प्रियांका प्रविण

१४) मा.अजित दामोदर गव्हाणे

१५) मा.बोईनवाड यशोदा प्रकाश

१६) मा.लांडगे सारिका संतोष

१७) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

१८) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

१९) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२०) मा.अॅड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२१) मा.सावळे सिमा रविंद्र

२२) मा.लोंढे नम्रता योगेश

२३) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२४) मा.लांडे विक्रांत विलास

२५) मा.गीता सुशिल मंचरकर

२६) मा.राहुल हनुमंतराव भोसले

२७) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

२८) मा.अनुराधा गणपत गोरखे

२९) मा.केशव हनुमंत घोळवे

३०) मा.मंगला अशोक कदम

३१) मा.अश्विनी भिमा बोबडे

३२) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३३) मा.संजय बबन नेवाळे

३४) मा.एकनाथ रावसाहेब पवार

३५) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

३६) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

३७) मा.घोलप कमल अनिल

३८) मा.उत्तम प्रकाश केंदळे

३९) मा.चिखले सचिन तुकाराम

४०) मा.यादव मीनल विशाल

४१) मा.वैशाली जालिंदर काळभोर

४२) मा.प्रमोद कुटे

४३) मा.राजू मिसाळ

४४) मा.शैलजा अविनाश मोरे

४५) मा.बाबर शर्मिला राजू

४६) मा.अमित राजेंद्र गावडे

४७) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

४८) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

४९) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

५०) मा.ढाके नामदेव जनार्दन

५१) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

५२) मा.करुणा शेखर चिंचवडे

५३) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

५४) मा.अपर्णा निलेश डोके

५५) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

५६) मा.गावडे राजेंद्र तानाजी

५७) मा.कोमल दिपक मेवानी

५८) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

५९) मा.सुजाता सुनिल पालांडे

६०) मा.योगेश मंगलसेन बहल

६१) मा.कदम निकीता अर्जुन

६२) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

६३) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

६४) मा.पाडाळे निता विलास

६५) मा.काळे उषा दिलीप

६६) मा.पवार मनिषा प्रमोद

६७) मा.बारणे अर्चना तानाजी

६८) मा.अभिषेक गोविंद बारणे

६९) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

७०) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

७१) मा.निलेश हिरामण बारणे

७२) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

७३) मा.दर्शले रेखा राजेश

७४) मा.कलाटे राहुल तानाजी

७५) मा.ममता विनायक गायकवाड

७६) मा.कामठे तुषार गजानन

७७) मा.चोंधे आरती सुरेश

७८) मा.कस्पटे संदिप अरुण

७९) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

८०) मा.सविता बाळकृष्ण खुळे

८१) मा.सुनिता हेमंत तापकीर

८२) मा.चंद्रकांत बारकु नखाते

८३) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

८४) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

८५) मा.आंगोळकर सागर सुनिल

८६) मा.मुंढे उषा अंकुश

८७) मा.कदम शशिकांत गणपत

८८) मा.लोखंडे चंदा राजू

८९) मा.आशा धायगुडे-शेंडगे

९०) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

९१) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

९२) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

९३) मा.नवनाथ दत्तू जगताप

९४) मा.संतोष बबन कांबळे

९५) मा.सोनवणे शारदा हिरेन

९६) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

९७) मा.भाऊसाहेब सोपानराव भोईर

९८) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

९९) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१००)मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर- आयुक्त, मा.संतोष पाटील- अतिरिक्त आयुक्त (१), मा.अजित पवार - अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.सुभाष इंगळे, मा.चारटणर- उपआयुक्त, मा.कोळंबे- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.निकम, मा.सवणे-सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.लोणकर, मा.बोदडे-सहा.आयुक्त, मा.मुंढे-प्र.शिक्षणाधिकारी, मा.डॉ.साळवे-अति.आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.डॉ.वाबळे- अधिष्ठता वायसीएमएच, मा.गायकवाड- जनतासंपर्क अधिकारी, मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी, मा.गोफणे-आरोग्य अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----

**मा.महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक, मा. नगरसेविका, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.राजू मिसाळ -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. मा.महापौर साहेब, या शहरामध्ये जो कुत्र्यांचा सुळसूळाट आहे त्याच्या बाबतीतला मी या सगळया सभागृहाच्या आणि तुमच्या निदर्शनास आणून देण्यासाठी हा विषय घेत आहे. मा.महापौर साहेब, तुम्ही या शहरामध्ये कोणत्याना कोणत्या कार्यक्रमा निमित्त फिरता. मला वाटत तुम्हांला पण तो अनुभव येत असेल की शहरामध्ये या कुत्र्यावरच जे नियंत्रण आपल्या महापालिकेचा जो काही विभाग पाहतो तर त्या बाबतीमध्ये आज पुर्णपणे लोकांना सामोर जाव लागत आहे. आठ वर्षामध्ये ८६५६६

जणांनी रेबीज इंजेक्शन घेतलीत. मा.महापौर साहेब, सकाळी, संध्याकाळी वॉकींगला जाताना सुध्दा या कुञ्यामुळे सर्वसामान्य मनुष्य वॉकींगला बाहेर पडू शकत नाही. ठिक आहे, लॉकडावून होत त्यामुळ कुञ्यांना खायला मिळत नव्हत. काही काही एनजीओ, या शहरातील नागरीक हे स्वत:च्या खर्चान त्यांना खायला घालत होते. मा.महापौर साहेब, पशुवैदयकीय अधिकारी दगडे साहेब असतीलतर त्यांना बोलून घ्या. त्यांना कधीही फोन केलातर, पहील्यांदा डॉ.गोरे साहेब होते ते थोडस हासून, भेटून, फोन करुन, हॅलो, हाय करुन लोकांचे जे काही प्रश्न होते ते समाधान थोडफार करु शकत होते. याच्यावर आपण काय नियंत्रण करणार आहेत. काल कासारवाडीमध्ये आशाताई यांच्या वॉर्डातील एक मुलगा कुञ्याच्या चाव्याने मयत झाला. अशा ब-याचशा गोष्टी पेपरमध्ये छापून आल्यानंतर आपल्याला कळतं. असे ॲक्सिडेंट होतात, आपल शहर हे पुर्ण वाढलेल आहे आज जवळ जवळ २५ लाखाच्या लोकसंख्येपर्यंत आपण गेलोत. तरी या संदर्भात आपण गांभीर्याने लक्ष घालून आज या डॉगच्या संदर्भात जो कोण अधिकारी असेल पाहीजेतर तुम्ही त्यांना बोलून घ्या, पाहीजेतर आपण या विषयावर नंतर बोलू व पुन्हा मला बोलण्याची संधी दया. कारण आज मी पुर्ण शहराच्या वतीने बोलतो. मला वाटत आशाताईपण या विषयावर बोलतील कारण त्यांच्या प्रभागात हा विषय घडला आहे त्यामुळे तो पेपरद्वारे आपल्या समोर आला आहे. प्रत्येक नागरीक प्रत्येक नगरसेवकाला रोज कंम्पलेंट करतात की त्या डॉगवर काहीतरी करा. आपण त्यांना मारु शकत नाहीत, शस्त्रक्रीया करुन परत आणून त्याच जागी सोडतो. आज शहरामध्ये त्यासाठी काय नियंत्रण आहे किंवा किती एजन्सीज काम करतात, किती ते डॉग उचलून घेवून जातात आणि किती ऑपरेशन झालेली आहेत. हे पहील सभागृहासमोर आपण डॉक्टराना बोलून सांगायला लावा. किती शस्त्रक्रीया झाल्या, त्याच्यावर त्यांच नियोजन काय आहे आणि आजची सद्यपरिस्थिती काय आहे. आताच पंकज भालेकर यांना एक मॅसेज आला आहे. "भटक्या कुञ्यांच्या त्रासामुळे कुटूंब देशोधडीला लागल" मा.महापौर साहेब, हा एका नगरसदस्याला आलेला मॅसेज आहे. प्रत्येक नगरसदस्याला या गोष्टीला सामोर जाव लागतं. आपण एवढा विकास करता, मा.महापौर साहेब, तुमच्याकडन आम्हांला एकच अपेक्षा आहे तुम्ही ज्या पध्दतीने मगाचा विषय हॅण्डल केला शिक्षणमंडळाचा, त्याबद्दल माई तुमच खरच अभिनंदन करतो. तुम्ही आमच्या शब्दाचा मान ठेवून तुम्ही हा विषय फेटाळला त्याबद्दल मी तुमच पुन्हा एकदा अभिनंदन करतो. माई या महापौर आहेत, महापौर कधीही

पक्षाचे  नसतात तर महापौर हे पुर्ण शहराचे असतात. त्यामुळ माईना याची पुर्ण जाणीव आहे. माई अनुभवी आहेत, त्यामुळ तुम्ही जरी कितीही माईला सांगीतलतरी त्यांना पटेल तेच त्या करतील हे आम्ही अनुभवलेल आजच सभागृहातील उदाहरण आहे. माई, या कुत्र्याच्या संबंधित जे कोणी डॉक्टर आहेत त्यांना याठिकाणी बोलून घ्याव आणि नंतर मला बोलण्याची संधी दयावी.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. हा विषय विषयपत्रीकेवर नसलातरी खुप महत्वाचा विषय आहे. आज शहरामध्ये खुप कुत्रे धुमाकूळ घालतात. प्रत्येकाचा जीव धोक्यात आलेला आहे. यामध्ये सर्वात प्रथम जर बघीतलतर महिला इतक्या वैतागलेल्या आहेत. मी पिंपरी चिंचवड शहरात फिरत असताना बघीतल प्रत्येक घराच्या बाहेर लाल बाटली पाण्यामध्ये कुंकू टाकून महीलांनी ठेवलेली आहे. हे कशासाठी ठेवल असं मी सहज विचारल महीलांना तर, काय ताई सगळया महीला सांगत होत्या की कुत्रे त्रास देतात. माई तुम्ही पण बघीतल असेल की शहरामध्ये बाटलीमध्ये पाणी आणि कुंकू घालून प्रत्येकानी घराच्या बाहेर ठेवलेल आहे. आपण डॉगवाल्यांना फोन जर केलातर ते फोन उचलत नाहीत, समाधानकारक उत्तर देत नाहीत, येत सुध्दा नाहीत. माझ्या प्रभागामध्ये माझ्या तीथ जी गाडी आहे तीथला माझ्याच प्रभागातला ड्रायव्हर आहे तरीही त्या समस्याच निवारण होत नाही. तरी निश्चित याकडे लक्ष घालाव. दुसरी महत्वाची गोष्ट आहे आपण हे जे बोलतो ते भटक्या कुत्र्यांच्या बाबतीत बोलतो. पण ज्यांनी कुत्रे पाळलेली आहेत, जे रोज सकाळी स्वतः वॉकींगला जातात आणि त्या बरोबर कुत्र्यांना पण वॉकींगला घेवून जातात तर ते जे कुत्रे रस्त्यावर घाण करतात. आपण स्मार्ट सिटीकडे चाललेलो आहोत, आपण सगळयाच बाबतीत बोलतो आहोत आणि ते रस्त्यावर घाण करतात आणि ती घाण आपल्या घरापर्यंत जाते. आता कोरोनाच्या काळात याबाबतीत सुध्दा विचार करावा. याबाबत काहीतरी धोरण ठरवाव. आपण प्रत्येकाला जसं डस्टबीन देतो तसं प्रत्येक कुत्र्यावाल्यांना आपण पिशव्या दयाव्यात असं मी सांगेल निश्चित याच्यामध्ये विचार करावा. कारण याच्यामध्ये शहर खुप घाण हात चाललेल आहे त्याबद्दल विचार करावा, धन्यवाद.

**मा.हर्षल ढोरे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. हा डॉगचा विषय आहे, आताच राजू मिसाळ बोलले आणि बाकीच्यांनाही या विषयावर बोलायच आहे.

आपल्या शहरामध्ये खरच आता अशी परिस्थिती आहे की जस लॉकडावून चालू झाल आपल्या शहरामध्ये तशी लोक घरीच होती. रस्त्यावरती फक्त कुत्रीच दिसत होती. आमच्या सांगवीमध्ये मा.महापौरांनी लक्ष घातल्यानंतर आता कुठेतरी परिस्थिती थोडीशी अटोक्यात आली. आम्ही वेळोवेळी फोन करतो, मा.महापौर स्वतः फोन करतात श्री.कोटीयन असतात, डॉ.दगडे असतात. किती कुत्र्यांची ऑपरेशन होतात ही सगळी मलाही माहीती पाहीजे. आज आमच्या इथ अशी परिस्थिती आहे की आमच्या प्रभागामध्ये कुठून एवढी कुत्री येतात जवळ जवळ तीस-तीस, बत्तीस-बत्तीस कुत्री एकाच टोळक्यानी फिरत असतात. आता अशी परिस्थिती आहे की जेव्हा सकाळी वॉकींगला लोक निघतात तर ते वॉकींग करु शकत नाहीत. एवढी भयंकर आमच्याकडे डॉगची परिस्थिती आहे. हा विषय दगडेना सांगीतलातर येतात, गाडी येती पण एखाद कुत्र फक्त पकडायच काम करतात आणि निघून जातात. कुत्री सकाळी असतात त्याच्यानंतर ते सर्व गायब होतात. कोण कुठल्या गाडीखाली जावून बसत कोण कुठ बसत आणि यांना दुपारनंतर कुत्री सापडत नाहीत. सकाळी सकाळी गाडी आली पाहीजेतर दगडे साहेब म्हणतात आम्ही या टाईमाला गाडी नाही पाठवू शकत. त्याच्यासाठी आम्ही एक त्यांना प्राणीमित्र पण दिला, की जो प्राणीमित्र स्वतः तुमच्या बरोबर येईल आणि तुम्हांला जी पाहीजे ती मदत करल. या कुत्र्यामुळ आमच्या सांगवीत नागरीक हैराण झालेले आहेत. अक्षरशः भयंकर परिस्थिती झालेली आहे. कुठल्याही परिस्थितीत कुत्र्यांच साहेब काहीतरी करा. लहान लहान मुलांवरती कुत्र अक्षरशः धावून जात. परवाची गोष्ट आहे आमच्या इथे सुशिल नावाचा एक लहान मुलगा आहे. त्याचे आई-वडील इथे वॉचमेन म्हणून काम करतात. त्या मुलाला कुत्र्यांनी एवढा मोठा चावा घेतला की त्याचा लचका काढला. अक्षरशः भितीदायक वातावरण आहे. कुत्री पिसाळलेली आहेत, काही काही कुत्र्यांना जखम झालेली आहे. जखम झाल की कुत्र अटॅक करतं. डॉ.रॉय सरांना सुध्दा सांगीतल रॉयसरांची तब्येत बरी नव्हती. ते म्हणाले होते की सकाळची गाडी पाठवण्याची व्यवस्था आम्ही करतो. तसे डॉ.दगडेना त्यांनी सांगीतल सुध्दा होतं. पण अजूनही तसा काही प्रकार घडलेला नाही. कुत्रीतर वाढतच चालली आमच्या इथे डुकरांबद्दल अजीत पवार साहेबांना सांगीतल होत त्यांना सांगीतल की त्यांनी लगेच ऍक्शन घेतली. त्यावेळेस तमीळनाडूचा स्कॉड आणला होता आणि ती डुकर पकडून ठेवली होती. त्याच्यानंतर आता परत परिस्थिती वाढलेली आहे. तरी डुकरांचही तुम्ही कंट्रोलमध्ये आणाव. डुकरांचीही

आमच्याकडे खुप संख्या झालेली आहे. या भटकी जनावरांवर तुम्ही नियंत्रण आणले पाहीजे. मा. महापौर साहेब तुम्ही बोलण्याची संधी दिली, धन्यवाद.

**मा.उषा मुंढे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आताच हर्षलभाऊनी सांगीतल  डुकरे आणि कुत्रे अक्षरशः बाहेर निघु देत नाहीत. आज आपल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच आशिया खंडामध्ये नाव आहे. आपल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा वर्धापनदिन साध्या पध्दतीने करु शकलात, आपल्या या महापालिकेसाठी अनेकांच योगदान आहे. मग आण्णासाहेब मगरांच असेल, रामकृष्ण मोरेंच असेल, पवार साहेबांच असेल, लक्ष्मणभाऊ असतील, महेशदादा असतील. अनेकांच या पिंपरी चिंचवड महापालिकेसाठी योगदान आहे. परंतु साहेब, तुम्ही बाकी सर्व समारंभ पन्नास-पंचवीस लोकांमध्ये करु शकता, मिटींग करु शकता. पण महानगरपालिकेच्या वर्धापनदिनाचा तुम्हांला विसर पडलेला आहे तो तुम्ही करु शकलेला नाहीत, ही खंत आहे. आता हर्षलभाऊनी सांगीतल, डुकरांचा विषय, इतकी डुकर शहरामध्ये झालेली आहेत की कोरोनातर बाजूला राहीला परंतु या डुकरांमुळे माणसाला थंडी, ताप हा आजार होणार आहे कारण की ही डुकर पाळलेली आहेत ती कुठून आलेली नाहीत. ज्या लोकांनी ही डुकर पाळलेली आहेत ती लोक संध्याकाळी बारानंतर हॉटेलमधल जे राहीलेल जेवण आहे ते आणून त्या डुकराला खाऊ घालतात आणि रात्री दोन आडीच वाजता ते एका टॅम्पोमध्ये घालून पकडून नेतात. हे कुठतरी थांबल पाहीजे. आयुक्त साहेब ठिक आहे कोवीड होता हे मान्य करु आपण त्यामुळे शहरामधे कुत्रे, डुकराकड लक्ष देवू शकलो नाहीत. परंतु आता कुठेतरी स्थिर होतय तरी अशा काही गोष्टीना प्राधान्य मिळतय. डुकर अक्षरशः लहान मुलांच्या अंगावर धावून जातात. तरी यासाठी आयुक्त साहेबांना मी विनंती करते की साहेब, तुम्ही यावर लक्ष दयाव. अगोदर कुणीतरी काम काढल, एक डुकर पकडायचे सातशे रुपये तो विषयतर बाजूला राहीला, कुत्र्यांना आपण पकडून नेतो त्यांना इंजेक्शन देतो तीन दिवस ठेवतो आणि परत आणुन सोडतो. पण असं काहीतरी न करता की जेणेकरुन ही डुकर जे कोणी पाळत असेल त्यांच्यावर काहीतरी कडक कारवाई करा आणि त्यांना काहीतरी दंड बसू दया की जेणेकरुन ते डुकर विकत असतील त्यांना ती आद्दल घडली पाहीजे की आपण हे पाळण चुकीच आहे. त्यामुळे शहरामध्ये सर्व दुर्गंधी पसरली आहे. आयुक्त साहेब आपण या स्मार्ट सिटीमध्ये जे काही काम करतो त्याचप्रमाणे जे मेट्रोच काम चालू आहे आमच्या

वॉर्ड क्र. २९ मध्ये जे मेट्रोच काम चालू आहे तेथे मेट्रोचे कामगार जे राहतात ते सर्व त्या नदीच्या साईडला जे डुकर आहेत त्यांना पुर्ण सांभाळण्याच काम या मेट्रोच्या माध्यमातून होतं. आयुक्त साहेब त्याकडे आपल लक्ष असाव जेणेकरुन नागरीकांना कोवीड पासून या वेगळया आजाराला सामोर जायला नाही लागल पाहीजे. एवढ बोलून मी थांबते, धन्यवाद.

**मा.प्रमोद कुटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आताच राजू मिसाळ यांनी सर्वांच्या निदर्शनास आणून दिलं की कुत्र्यांची समस्या किती भयंकर आहे. सर्व सदस्यांनी कुत्रे पकडण्याच सांगीतल. माझी आपल्याला एक विनंती, सुचना राहील की दिवसाचे हे कुत्रे सापडत नाहीत, रात्रीच्या टाईमाला जसे गुन्हेगारांच्या टोळया असतात, चोरांच्या टोळया असतात तशाप्रकारे या कुत्र्याच्या टोळया तयार झालेल्या आहेत आणि यांना रात्रीच पकडण्यासाठी आपण उपाययोजना तयार करावी. सेकण्ड शिफ्टची लोक, थर्ड शिफ्टची लोक, सकाळी वॉकींगला जाणारी लोक ही सगळे रात्रीचे मोठया प्रमाणावर आहेत. ज्या ठिकाणी नाले आहेत त्या नाल्यामध्ये काही स्लॉटर हाऊसेस आहेत आपल्या शहरामधले, हॉटेलचे जे वेस्ट आहे ते नाल्यामध्ये टाकल जातं आणि त्या वेस्टवर ही कुत्री जगतात आणि त्याच्या अवतीभोवतीच्या परिसरामध्ये रात्रीच्या टाईमाला ही असतात. अक्षरश: रात्रीच्या दोन वाजता, तीन वाजता लोक फोन करतात की या कुत्र्याच काहीतरी करा. मी आपणास विनंती करतो की लोक कुत्र्यांची सात दिवस तक्रार देवून कंटाळले. आपल्या इथे कर्मचारी, ठेकेदार नेमलेले आहेत तो बीचारा येतो गाडी घेवून त्याच्याकडे दोन माणस असतात, दिवसा येतो ते कुत्रे सापडत नाहीत, नाल्यामध्ये कुठेतरी लपलेले असतात ते निघुन जातात. आपण हा कुत्री पकडण्याचा कार्यक्रम आहे तो रात्रीचा जर केलातर चांगल्याप्रकारे याचा रिझल्ट येईल. नसबंदी करुन किंवा त्यांच्यावर योग्य ती शस्त्रक्रीया करुन त्यांना परत आणुन सोडल जातं ते सुध्दा थोडस आपण चेंज कराव आणि कुठेतरी या कुत्र्यांच संगोपन होईल, पोलनपोषण होईल त्याकरिता आपली उपाययोजना करावी ही नंम्र विनंती.

**मा.संदीप वाघेरे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. गेले साडेतीन वर्षे ब-याचवेळा कुत्र्याचा विषय झाला, मोकाट जनावरांचा विषय झाला, डुकराचा विषय झाला. एकाच गोष्टीची चर्चा करुन करुन मलाही कंटाळा आला त्यामुळ मगाच्या

विषयात मी बोललोच नाही. गेल्या सहा महीन्यापुर्वी जो विषय मीच काढला ज्योत्सना शिंदे मॅडमचा आणि बाकी दत्ता काका विचारत होते त्यांनी तो विषय मंजूर करा, मा.महापौर साहेब, तुम्हीच म्हणलात अनुमोदन दया पण ते नंतरच्या काळात विषय का थांबला, राहुल जाधवांना कुणी तसा दम दिला आणि त्याच्यामुळ ते बीचारे घाबरले. आता कुऱ्यांचा विषय, मोकाट जनावरांचा विषय, डुकराचा विषय आहे त्याच्यावरती आतापर्यंत मी दोन तीन वेळा बोलण झाल. डॉ.दगडे यांच्याबाबतीत पण बोललो होतो. आज पवार साहेबांनी मोकळी जनावर पकडण्यासाठी बाकीची यंत्रणा उभी केली, डुकर पकडण्यासाठी तमीळनाडूवरुन एजन्सी आली त्यांच्यावरती दोन चार वेळा हाल्ले झाले. मी स्वतः एकदा डुकर पकडायला गेलो होतो. म्हणजे अस नाही की माझा तो धंदा आहे तरी पण माझ्या प्रभागात आहे म्हणून मी गेलो होतो. परिस्थिती अशी आहे की डॉ.दगडे किंवा त्यांची टिम सांगत असेल एवढया एवढया कुऱ्यांवरती शस्त्रक्रीया केली मग कुत्री वाढली कुठून. आज पिंपरी चिंचवडमध्ये एवढी कुत्री झालीत, मोकाट जनावर झालीत, डुकर झालीत त्याच्यावरती काही कंट्रोल आहे का नाही. मा.महापौर साहेब, खेडेगावा मध्ये आज सुध्दा अशी परिस्थिती आहे की मोकाट कुत्री असतात आणि जनावर हे सगळे गोठयात असतात. आयुक्त साहेब, आज इथ अशी परिस्थिती आहे की जनावर पण बाहेर आहेत आणि कुत्री पण बाहेर आहेत आणि माणस आतमध्ये आहेत. म्हणजे हे शहर माणसांसाठी आहे का मोकाट जनावरासाठी आहे. आयुक्त साहेब याच्यावरती कडक कारवाई करा. काहीतरी निर्णय घ्या नाहीतर येणारा काळ मला वाटत सोपा नाही राहणार. आज माझ्या प्रभागामध्ये एवढी कुत्री झालीत, मोकाट जनावर झालीत. मी माग लागून लागून तुमच्याकडन बाकीच्या गोष्टी करुन घेतो. साहेब, तुम्हांला पकडलेली कुत्री सोडायला अडचण असेलतर त्या पाच एक्कर जागेमधील एक ते दिड दोन एक्कर जागा कुऱ्यांसाठी करा. ब-याचशा एनजीओ आहेत त्या कुऱ्याला सांभाळतील, बघतील. एकदा त्यांची व्यवस्थीत शस्त्रक्रीया करुन जर बाकीच्या गोष्टी केल्याना तर कुऱ्यांची संख्या वाढणार नाही. मा.महापौर साहेब, तुम्ही आयुक्त साहेबांना क्लिअरकट आदेश दया की मोकाट जनावर, डुकर आणि कुत्री आणि ती डुकर पकडायची तमीळनाडूची जी एजन्सी होती त्यांना ब-यापैकी अनुभव आहे त्यांनाच कुत्री पकडायच पण टेंडर दया. एवढ बोलून थांबतो, जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.राहुल जाधव -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आता जो संदिपभाऊनी मांडलेला विषय आहे की कुत्री पुण्याची आपल्याकडे येतात हे वाक्य प्रोसिडींगमधुन वगळावे. आम्हांला निघोजीची लोक म्हणतात की पिंपरी चिंचवडचे कुत्रे आमच्याकडे आणुन सोडतात तर हे काही बरोबर नाही आपण काय करतो फक्त कुत्री पकडतो, नसबंदी करतो आणि तीही आपल्याच ऐरीयामध्ये सोडून देतो. त्यामुळे कोणत्यातरी विषयाला वाचा फुटेल अशा पध्दतीच वक्तव्य नको.

**मा.महापौर-** ठिक आहे, हे वाक्य प्रोसिडींगमधुन वगळण्यात याव.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. खरतर मी आज पेपरच कात्रण पर्स मध्ये ठेवल होतं आणि ज्यावेळेला सभा सुरु होईल त्यावेळेस आपण नक्की बोलू. परंतु मगाशी सदस्यांची निवड होती आणि ज्याला त्याला आनंद होतो आणि त्या आनंदाला कुठेतरी खीळ बसू नये म्हणून मी त्यावेळेला थांबले होते परंतु माझी सुप्त इच्छा राजूभाऊ मिसाळ यांनी पुर्ण केली असं म्हणाव लागेल. खरतर माई अनेकदा म्हणजे या दहा वर्षामध्ये किमान वीस वेळा वर्षातून दोनदा आमचा कार्यक्रम आहे हा की काही वेळ घालवायचा तर आज कुत्र्यावर गप्पा मारल्या असं कुठतरी आता माई आम्हांला वाटायला लागलं. म्हणजे काहीच काम नाही आता सभागृह निवांत आहे पाच सहा विषय आहेत ते असेच होवून जातील मग एकानी एक विषय काढायचा, आशाताईनी दुसरा विषय काढायचा, तीस-यांनी तीसरा विषय काढायचा चर्चा करायची त्यातल्या त्यात शेवटी काय निष्पन्न झालंतर काहीच नाही. साहेब, वाईट वाटत ज्यावेळेला माझ्या वॉर्डातील किंवा हा आमच्या येथील १३३ जणांचा विषय आहे. ज्यावेळेस आमच्या वॉर्डातील एखादा मनुष्य, एखादा मुलगा, एखादी व्यक्ती दगावते ते ही कुत्र्यांसारख्या विषयामुळ त्यावेळेला निश्चितपणे दु:ख होतं. कुटूंबातील एक माणुस आमच्या चुकीमुळ, असं वाटते की आम्हीच अकार्यक्षम आहोत. स्वत:च्याच मनाला प्रश्न पडतो की नेमक मी काय करते सभागृहात जाऊन, मी पालीकेत जावून नेमक काय करते. माई, खरच मनाला त्यादिवशी प्रश्न पडला त्यादिवशी ज्यावेळेस मला फोन आला की आशा आनंदचा ऍक्सिडेंट झाला, आनंद जागेवर गेला. रात्री साडेआकराची वेळ असेल, आमच्या बरोबर खेळलेला मुलगा आमच्या एकदम जवळचा घरातला मुलगा आणि त्याला आम्ही कसलीही मदत करु शकलो नाही, आमच्या हाती

लागायच्या आत पोरग आम्हांला सोडून गेलं होतं आणि काय तर तो घरी चालला होता, वॉर्डातील एका मुलाकड पुस्तक घ्यायला कामावरुन सुटल्यानंतर आला होता. सेंट्रलला कामाला असणारा मुलगा निर्व्यसनी होता, नौकरी वरुन सुटल्यानंतर घराकडे निघाला होता कचराकुंडीच्या तेथून एक कुत्र आडव आलं त्याची गाडी कंट्रोल करायला तो गेला आणि गाडी स्लिप झाली आणि जागेवर गेला. साहेब, एक नाही, दोन नाही असे अनेक उदाहरण या शहरामध्ये आहेत. रोज वृत्तपत्रातल्या मी सगळया बातम्या काढून ठेवायचे, नेमकी फक्त एकच बातमी माझ्याबरोबर आली की मुलांच्या मागे कुत्र लागल, ज्येष्ठांच्या मागे कुत्र लागल, आमका माणूस पायात पाय आडकून पडला वगैरे, वगैरे, वगैरे. मा.महापौर साहेब, एकदा काहीतरी निर्णय याच्यावर घेणे आवश्यक आहे. जसा आपण गायांचा, गुरांचा कोंडवाडा करतो तसा कुत्र्यांचा करता येतो का? मा.मेनका गांधीशी बोलायच का? पत्रव्यवहार करायचा का हे तुम्ही तुमचे निर्णय घ्या. परंतु शहरामध्ये माझा एकही नागरीक, एकही बालक, एकही महीला याची शिकार होता कामा नये याची तजवीज करण्याची जबाबदारी साहेब तुमचीच आहे. परवा दिवशी सुध्दा एक पिसाळलेल कुत्र असाव, ते पिसाळलेल आहे की नाही त्याची शहनिशा आम्हांला करण्याची कुवत आमची नाही परंतु हे कुत्र सगळया लोकांच्या मागे गल्लीत गेल की लागतं म्हणून मला एकानी फोन केला की आशाबाई असं असं झाल आणि काय करता येईल मी म्हणाले दोन मिनीट दे मी आमच्या डॉ.दगडेशी बोलते आणि गाडीची व्यवस्था करते तुम्ही कुत्र बांधुन ठेवा. त्यांनी सांगीतल आम्ही कुत्र्याला पकडून ठेवतो. डॉ.दगडेना सहा फोन केले असा कोणता व्हिआयपी माणूस आहे असं एकदा सांगा आणि आज सभागृहाला सांगायच नाहीतर माई मी पुढची सभा खरच चालू देणार नाही. आम्ही काही मुर्ख नाहीत याठिकाणी येतो चर्चा करतो, बोलतो त्याच्यावरती उत्तर, पर्याय शेवटी काहीच निघत नाही. आम्ही चर्चा करणार, गप्पा मारणार आणि निघून जाणार उदयाला पुन्हा सगळे अधिकारी तुमचे जैसे तैसे. डॉ.दगडेना त्यादिवशी पाच फोन केले त्याच उत्तर त्यांनी का दिल नाही. त्यांच्या खाली कोण आहे त्यांना सुध्दा मी पाच फोन केले नंतर त्यांचा रिटर्न कॉल आला की कदाचित ते गाडीवर असतील किंवा प्रवासात असतील काय माहीत नाही परंतु त्यांचा मला नंतर फोन आला आणि त्यांनी सांगीतल आज रविवार आहे मी काही गाडी पाठवू शकत नाही परंतु डॉ.दगडेंचा फोन बंद. साहेब, ते सुट्टीवर आहेत का आणि नसतीलतर कायमचे सुट्टीवर पाठवून दया. आज तुम्ही या सभागृहात सांगायच आहे की त्यांच्यावरती

तुम्ही कोणती ॲक्शन घेणार आहेत. अनेकवेळा या सभागृहामध्ये सांगीतले आहे की डॉ.दगडे फोन उचलत नाहीत आणि मला वाटते माझा जो अनुभव आहे तो १३३ नगरसेवकांचा असणार. साहेब, ते कसे आहेत, ते बरे आहेत का, जेवलात का साहेब, झोपलात का साहेब, पगार आला का साहेब असे प्रश्न विचारायला आम्ही काही कुणी मोकळे नाहीत. माझ्या प्रभागामध्ये कोणती अडचण येते, कुत्र काही तुम्हांला सांगून किंवा मला विचारुन येणार नाही की आज रविवार आहे का म्हणून विचारणार नाही तुमचे दगडे डॉक्टर जागेवर आहेत का ते बघा एकदा मग मी लोकांच्या मागे लागणार आहे असं काही ते कुत्र विचारुन येत नाही त्यामुळे डॉ.दगडे हे २४x७ अलर्ट असले पाहीजेत. त्यांनी आमचा २४x७ फोन घेतलाच पाहीजे. एकदा डॉ. वाबळेंना फोन केला रात्रीच्या वेळेस फोन नाही उचलला पहाटे चारची वेळ होती माणूस मेला होता आम्ही समजू शकतो पहाटे चारला फोन नाही उचलला, नाही जाग आली. डॉ.पवन साळवेनां पण मी फोन केला होता. डॉ.पवन साळवेनी सकाळी १०.१४ मि. रिप्लाय दिला आणि डॉ. वाबळेंचा मला सकाळी साडेसहा, पावणेसातला फोन आला की ताई मला रात्री फोन घेता नाही आला ते आम्ही समजू शकतो की फोन नाही उचलला. डॉ.दगडेंचा काय विषय प्रत्येक वेळेला माई तुम्ही त्यांना कधीही फोन करा कधीच ते फोन उचलत नाहीत. माझ्या वॉर्डातला मुलगा मेला तरुण आहे तो ३० वर्षाचा मुलगा आहे त्याला चार वर्षाच आपत्य आहे त्याला काय सांगायच त्याची आत्या नगरसेवक असताना त्याचा बाप त्याठिकाणी मेलेला आहे, हे सांगायच का त्याला. साहेब, आमच्या अत्यंत जवळचा, घरातला मुलगा फक्त एका कुत्र्यामुळ मरतो. काय कारण आहे साहेब, तुमच प्रशासन झोपत, दिवसाढवळया झोपतं. काय करणार हे तुम्ही सांगा डॉ.दगडेंच आणि या सगळया यंत्रणेच. जर तुम्ही ऑपरेशन करता आता राहूलदादांनी खुप बाजू घेवून सांगीतली, दादा बरोबर आहे. खरच जर ऑपरेशन केल असेलतर कुत्र्यांना पिल्ल होतात कशी. का तुमची तीथ पहाणी होत नाही. पवार साहेबांनी सांगीतल की महीन्याला आपण आडीच हजार ऑपरेशन करतो. साहेब एकदा निर्णय घ्याना काय करायच ते. मी आज इथ उभ राहून बोलू शकले कारण मी माझ्या पंधरा दिवस भावना दडवून ठेवल्या आहेत याच्यामध्ये. काय केल पाहीजे साहेब, अशा एक नाहीतर हजार चुका तुमच्या प्रशासनाच्या सांगते. मग प्रशासन प्रमुख म्हणून तुम्ही काय करता. मी परवा तुम्हांला म्हणाले सगळ चकीच चालू आहे. बदनामतर आम्ही १३३ आहेत. डॉ.दगडेवर तुम्ही काय ॲक्शन घेणार ते एकदा सांगा आणि यापुढे तुमची यंत्रणा

काय करणार कुत्र्याच्या बाबतीत हे पण आम्हांला सांगायच नाहीतर पुढच सभागृह माई मी चालू देणार नाही. अक्षरशः माई २८ वर्षाची त्याची बायको आहे आख्ख आयुष्य ती कशी काढणार आहे तो चार वर्षाचा मुलगा आयुष्यभर कसे काढणार आहे. मला आज सुध्दा आठवते माजी नगरसेवक होते त्यांचे मुलाला लघवीच्या जागेच्या ठिकाणी कुत्र चावल होतं, काय करणार तो माणूस. आम्हीतर काही करु शकत नाहीतना. आम्ही हातबल तुमच्यासाठी होण्यास रिकामे नाहीत. काय म्हणून हातबल व्हायच, पगार कमी मिळतात. तुम्हांला एक नगरसेवक बोलला का साहेब हे काम माझ्या वॉर्डातील अर्जंट आहे आणि कोविडच नंतर बघा. प्रशासनाकड कोणी बोट दाखवल नाही पाहीजे यासाठी कोणत्याही संकोचाशिवाय आम्ही तुमच्या बरोबर असतो. मग ज्यावेळेस आमच्या वॉर्डातले तळमळीचे विषय येतात, नागरीकांच्या जीवाचे विषय येतात त्यावेळेस तुमचा असा हातबलपणा आम्ही बघायला रिकामे नाहीत. नसेल झेपततर सांगून टाका तुम्ही आम्हांला काय करायचा तो एकदा निर्णय. मा.महापौर साहेब आज आदेश दिला पाहीजे की डॉ.दगडेच काय करणार आहेत आणि त्याच बरोबर पुढची रणनिती या महापालिकेची काय असणार आहे. हा आजचा विषय नाही, सत्ता कोणाची काय याला मला घेणंदेणं नाही. ते कुत्र काही विचारुन आलेल नाही. अनेकवेळा सांगीतल रात्रीच कुत्री पकडायला माणस सोडा, का सापडत नाही तुम्हांला. मग कशाला त्या लोकांना पैसे देवून खर्च करताय जे कुत्रीच पकडू शकत नसतीलतर. आता एक नवीन प्रकार आहे माझ्या वॉर्डातील कुत्र एका छोटया मुलाच्या माग लागल ते एका मोठया माणसाने पाहील थोडक्यात समजा की मीच पाहील आम्ही त्या कुत्र्याला हाकललंतर त्या कुत्र्यानी माझ्यावर डुक धरला. वॉर्डातील एक मुलगा आहे अमर दिक्षीत नावाचा तो ही आई-वडीलांना एकुलता एक मुलगा आहे. त्यांनी सांगीतल की आशाताई असं असं झाल त्या कुत्र्याला मी हाकलल ते लहान मुलाच्या मागे लागल होत म्हणूनतर त्या कुत्र्यांनी डुक धरलाय रात्री मी नाईटवरुन आलो माझ तीथन येणं बंद झाल व दुस-या रस्त्यावर तुम्ही ड्रेनेजची लाईन टाकता तो रस्ता पण मी बदलला. साहेब नागरीक कुत्र्याच्या भीतीने रस्ता बदलतात. काय म्हणून कुणाची दहशत चोरांची दहशत होती, गुंडाची दहशत आहे, दारुडयांची आहे, टुकाराची आहे आता कुत्र्याची दहशत यायची राहीली शहरांनी. मा.महापौर साहेब, खरच अमर दिक्षीत नावाच्या मुलांचा पाहीलतर मला मॅसेज आहे की ताई कुत्र्याच काहीतरी करा. हया रस्त्यानी जाता येत नाही तीकड ड्रेनेज लाईन टाकली इकडन गेलतर कुत्र माझ्या मागे लागतय

एका दिवशी माझाही लचका काढेल. साहेब, याच्यावरती एकदा निर्णय घ्या अत्यंत वाईट आणि दुर्दैवी घटना शहरात घडतात त्याला कुठेतरी आळा घालणं आता गरजेच आहे त्यामुळे आपण याच्यावर निर्णय त्वरीत घ्यावा.

**मा.संगीता (नानी) ताम्हाणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आज हा विषय अजेंडयावर नसतानाही माई तुम्ही आम्हांला बोलू देता. आमच्याकडे शेतकरी जास्त असल्यामुळ गोठे आहेत. तुम्ही ही लोक कुत्री पकडण्यासाठी दिवसा ठेवतात त्यांच्या डयुटया संध्याकाळच्या करा. कुत्री तुम्हांला सकाळी सहा वाजता सापडणार व संध्याकाळी दहाच्या नंतर कुत्री सापडणार. तुम्ही दिवसभर किती पण फिरा तुम्हांला कुत्री सापडणारच नाहीत. तरी पालीकेच्या या लोकांच्या डयुटया कुत्र्यासाठी संध्याकाळच्या करा. आज गोठयाच्या बाहेर जनावर जर बांधलेतर आज त्या वासरांना कुत्री जगु देत नाहीत, आज माझ्या घरचा प्रसंग मी तुम्हांला सांगते. दोन ते चार दिवस झाले एक माणुस सेकंण्डची डयूटी करुन येत होता त्याच्या मागे अर्धी कुत्री व पुढ अर्धी कुत्री तो माणुस पडला त्याचा पाय फॅक्चर झाला. मग काय करायच, दिवसा लोक कुत्री पकडायला असतात त्याचा काही उपयोगच नाही. कुत्री रात्री दहाच्या नंतरच तुम्हांला सापडणार. डॉ.दगडेना कधी पण फोन करा ते कधीच फोन उचलत नाहीत. आतापर्यंत त्यांनी माझा एक पण फोन उचललेला नाही. त्यांना बोलून विचारा तुम्ही फोन उचलता का म्हणून.

**मा.सचिन चिखले -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. खरतर खुप महत्वाचा विषय आहे. ही तीसरी घटना आहे शहरा मधली. ज्येष्ठ नागरीक असतील, लहान मुल असतील, गार्डनला जाताना किंवा ग्राऊंडवर फिरताना म्हणा शहरामध्ये मोठया प्रमाणात भीतीच वातावरण आहे. दगडे साहेब असतील, कोटेलवार साहेब असतील बिलकूल अजीबात उत्तर देत नाहीत किंवा रिप्लाय सुध्दा देत नाहीत. गाडी जर मागीतलीतर चार-चार, पाच-पाच दिवस त्यांना फोन करावा लागतो. गाडी येते दोन मिनीट थांबते आणि निघून जाते असेही प्रकार चालू आहेत. सर्वात महत्वाची गोष्ट माई, कुत्रीतर वाढलेलीच आहेत. कुत्र्यावरती आपण नसबंदी करतो तर शहरामध्ये मोठया प्रमाणात कुत्री वाढतात कशी हा सगळयात मोठा प्रश्न आहे. शहरातले भरपूर प्रोजेक्ट आपण पायलट केलेत याच्यावर जरा थोडीशी कारवाई करायची अत्यंत गरज आहे. काही एनजीओ नक्कीच चांगल काम करतात आणि त्यांच पण कार्य

पुढ चालू राहील पाहीजे. संदिपभाऊनी सांगीतल कुठतरी पाच ते दहा एक्कर जागा घेवून आपण सर्व व्यवस्थीतपणे जर त्यांना पाळलतर खुप चांगल होईल आणि तीथच त्यांना सांभाळलतर अत्यंत उत्तम होईल. कुठेतरी कुऱ्याच प्रमाणे कमी कमी होत जाण खुप गरजेच आहे. महत्वाची गोष्ट म्हणजे शहरामध्ये कुऱ्यांच प्रमाण पण जास्त वाढल आहे. मा.महापौर साहेब, एक डुकर जर का पाळलतर थोडस मोठ केलतर एक दोन तीन चार किलो झालतर पन्नास-पन्नास, साठ-साठ हजाराला विकल जातं. हा एक प्रकारचा धंदा त्यांनी चालू केलेला आहे. आपल्या अधिकारी वर्गाला कित्येक वेळेस सांगीतल याच्यावर कारवाई करा, कारवाई करा. बरं, आपले अधिकारी वर्ग तीथ कारवाई करायला गेले असताना ते तीस-तीस, चाळीस-चाळीस जण लोक बाहेर येतात आणि आपल्या अधिका-यांना दमदाटी करतात. म्हणून आपले अधिकारी वर्ग तीथ जात नाही किंवा घाबरतो मग आपली जी पोलीस यंत्रणा आहे ती पोलीस यंत्रणा हाताशी धरुण त्या अधिका-यांनी संबंधित व्यक्तीवर कारवाई करानां. त्यांचा व्यावसाय आहे, त्यांचा व्यावसाय हा चालला पाहीजे या मताशी मी पण सहमत आहे पण ते डुकर पाळण पण कंट्रोलमध्ये ठेवानां, कुठतरी त्यांना व्यवस्थितपणे रुम करा त्याचे आतमध्ये पालन करा असे भरपुर पिकशॉप पण आहेतना पाळतातना व्यवस्थितपणे. पण हा दररोज आता रस्त्यावर चाललेला प्रकार आहे तो कुठतरी थांबला पाहीजे अन्यथा खुप मोठा अक्रोश जनतेचा समोर येईल असं मी सांगतो, धन्यवाद आपण वेळ दिल्याबद्दल.

**मा.राहूल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. राजूभाऊनी एका चांगल्या विषयाला हात घातला म्हणजे आपल्या शहरामध्ये आता तो ही एक पाण्यासारखा ज्वलंत प्रश्न झाला. आयुक्त साहेब तुम्हांलाही आणि मलाही आमच्या प्रभागातून बरेच मेल आहेत. खुप मोठा मेल आहे कम्प्लेन्टसचे नंबर पण आहेत एमए १४०८८, एमए १३४००, एमडब्ल्यू ७३४२ असे खुप बरेच आहेत. साहेब, अशा पध्दतीने जर प्रशासन काम करत असेलतर, आपण तीथे गेलोच नाहीत, आपण कुत्री पकडलीच नाहीत आपण सारथीच्या कम्पलेन्ट क्लोज केल्या म्हणजे कुठेतरी तुमच्या डिपार्टमेंटच्या या लोकांना हे प्रश्न विचारानां. नवीन नवीन लॉकडावुन झाल त्यावेळेला कुत्री थोडी मरगळलेली होती, भुकायचीच नाही परंतु नंतर काय झाल एनजीओ हे लोक नंतर त्यांना खायला दयायला लागले. मग हाळू हाळू परत ते गाडयांच्या मागे पळायला लागले. आम्ही सायकल वर निघालोतरी ती कुत्री मागे

पळायची. कधी मुलगा वगैरे असेलतर त्याला सांगायला लागायच की तु गाडीवर ये सायकलवर नको जावू म्हणजे संपुर्ण शहराची ही परिस्थिती आहे. प्रत्येक गोष्टीत आपला असा कंट्रोल होत गेलाय. आयुक्त साहेब आपल्याकडे एक एनजीओ आहे सीसीसी नावाचा ते काय करतात एक टेम्पो आणतात एक कॅचर असतो त्यांच्याकड त्यांच भूगावला सेंटर आहे पण ते नसबंदी करत नाहीत तर सर्जरी करतात. आम्ही आपल्याला फोन करुन वैतागलो आम्ही त्यांची मदत मागतो आता. नंतर साहेब म्हणायला लागले आता करोना आहे कुठ कुठ लक्ष दयायच तरी त्यांनी डुकरांची मोहीम चांगली केली होती पण नंतर परत ती पण बारगळलेली दिसते. आज संचिन चिखलेच ऐकल्यानंतर परत असं वाटत की ती पण मोहीम तुमची सक्सेस झालेली नाही. साहेब, ही अतीशय चांगली संस्था आहे सीसीसी ही त्यांच भूगावला हेड ऑफीस आहे ते कधी कधी कॅचर व्हॅन घेवून येतात कधी ते सापडत किंवा नाही सापडत पण आज त्या कुत्र्यांच ते टार्गेट ठेवतात.  ते नेल्यानंतर एक दिवस ऑब्झर्व्हेशनखाली ठेवतात. त्याला कुठला आजार नाही हे पाहील्यानंतर त्याची सर्जरी करतात. सर्जरी केल्यानंतर त्या कुत्र्याला ते पाच दिवस ठेवतात. जनरली काय होत आपल्याकडे नसबंदी करतात ती नसबंदी नंतर फेल होते. मिनीमम सहा महीन्याच्या आतल कुत्र असेलतर ते सोडून देतात. महापालिकेला वैतागून आम्हांला त्या लोकांची मदत घ्यायला लागते. ते फक्त कॅचरचे पैसे घेतात बाकी ते फ्रि मध्येच करतात. मग एका बाजुला आपण इकडे कोटयावधी रुपये खर्च करतो तरी पण त्यातन रिझल्ट काही नाही. याच्यामध्ये कुठतरी सुसूत्रता आणणे गरजेची आहे. ही संस्था एकदम डेडीकेटली काम करते ती भूगावला आहे. त्यांचे एक एनजीओ आहेत काजळे म्हणून आहेत त्या आमच्या सोसायटीत राहतात. त्या एवढ काम करतात म्हणजे लॉकडावून मध्ये कुत्र्यांना जेवायला दे, हे दे, ते दे. आज ही दोन वर्षाची मुलगी मरता मरता वाचली. तुम्ही जर त्या दोन तीन रस्त्यानी गेलेना तर जावुच शकत नाहीत सकाळी संध्याकाळी. मला हे मान्य आहे की दिवसा आपल्या गाडया आल्या की हे कुत्री पळून जातात. मला संदिपनी सांगीतल हा भाद्रपद महीना आहे कुत्री चांगली रस्त्यावर येतात. कुठतरी तुम्ही या गोष्टी व्यवस्थीत करा. फक्त सहा हजार रुपये ते कॅचरचे घेतात, एकदा आलेल्या व्हॅनचे. त्यात त्यांच दहा ते पंधरा कुत्र्याच टार्गेट असतं पण आठ ते दहा सापडलीतरी ते जातात. जर आपली लोक सक्षम नसतीलतर असं कुणालातरी गाईडलाईनन घ्या, त्याना बरोबर घ्या. आपण नसबंदीवर बराचसा खर्च करतो पण

त्याचा रिझल्ट आपला कमी आहे. हे कुठल्या प्रकारे शस्त्रक्रीया करतात ते पहा जेणेकरुन शंभर टक्के रिझल्ट आहे. माझी आपल्याला विनंती आहे की या गोष्टीकड सिरीअसली बघा. सगळयाच गोष्टीचा खेळखंडोबा करायचा असेलतर तुमच आहे असच चालू राहू दया. आपल्याला काहीतरी लोकांना दिलासा दयायचा असेलतर हे जी लोक रोज वैतागतात, शंभर शंभर मेल आहेत साहेब, तुम्हांला पण मेल आहेत मला पण मेल आहेत. रोज मेल आहेत कुत्र्यानी आडवल नाही आणि कुत्र्यांनी चावल नाही असा एक ही मेल नाही सोसायटीवाल्यांचा. मी बराचवेळा पवार साहेबांना सुध्दा म्हणल मध्यंतरी ते म्हणाले कोरोना आहे ते थोड कमी होवू दयात पण आता लक्ष देण्याची वेळ आलेली आहे नाहीतर हाता बाहेर परिस्थिती जाईल. आता कुत्री चावतात नंतर ती चावलेल कुत्र घेवून दगडी घेवून लोक आपल्या मागे लागतील हे परिस्थिती शहरात येवू देवू नका थोड सिरीअस व्हा माई त्याप्रमाणे आपण प्रशासनाला आदेश दया की ही गोष्ट तुम्ही सिरीअसली घ्या म्हणून, धन्यवाद.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. खर म्हणजे भटक्या कुत्र्यांच्या संदर्भामध्ये आपले विरोधी पक्षनेते यांनी हा विषय याठिकाणी आणला. ताईनी सुध्दा त्यांच्या वॉर्डामधला विषय याठिकाणी मांडला. कुत्रे पकडण्यासाठी ज्या एजन्सी नेमलेल्या असतील त्यांच कुत्रे पकडण्याच जे टाईमींग आहे ते दिवसाच आहे परंतु कुत्रे जे आहेत ते रात्रीचे आणि सकाळचे असतात आणि रात्री सेकंण्ड करुन येणारी मंडळी आहेत त्यांच्या सुध्दा माझ्याकडे काही तक्रारी आलेल्या होत्या. मध्यंतरीच्या काळामध्ये एक पिसाळलेल कुत्र होतं ते जवळपास आठ ते दहा लोकांना चावल. त्यावेळेला मी स्वतः तीथ हजर होतो लोकांनी त्याला मारण्याचा प्रयत्न केला मी त्यांना सांगीतल की त्याला मारु नका मग नंतर दोन तीन तासामध्ये आपली गाडी आली आणि मग त्याला नेलं. आता ताईनी सांगीतल्याप्रमाणे कुत्र्यामुळे लोक आपला जाण्याचा येण्याचा रस्ता बदलवतात हे तेवढच सत्य आहे. कारण कुत्र्यांच्या टोळक्यामुळे किंवा पिसाळलेल्या कुत्र्यांमुळे लोकांच्या मनामध्ये एक भीती आहे आणि मगाशी सर्वानी सांगीतल्याप्रमाणे हा विषय सारथीच्या माध्यमातून असा काही क्लोज होत असेलतर हे कशा पध्दतीने होवू शकते. कारण नागरीक सारथीवर तक्रार करतात आपण तेवढयासाठीच सारथी ठेवलेली आहे तरी त्या तक्रारीच निराकरण न होता ती क्लोज कशी काय करु

शकतात हा पण विषय आहे. या भटक्या कुञ्यांच्या किंवा जनावराच्या संदर्भामध्ये आपल्याला जर का काही लिगल सल्ला घेवून आपल्याला कोंडवडयाच्या संदर्भामध्ये किंवा कुञ्यांची जी काही संख्या आहे त्या संदर्भामध्ये आपण शस्त्रक्रीया वगैरे करतो परंतु ती संख्या मात्र वाढते त्या संदर्भामध्ये सुध्दा याठिकाणी डॉ.दगडे आलेले आहेत तरी मा.महापौरांनी त्यांना त्या संदर्भात खुलासा करण्याचा आदेश दयावा अशी मी विनंती करतो आणि कोंडवडयाच्या संदर्भामध्ये महानगरपालिकेकडे भरपूर जागा आहेत तरी आपल्याला त्या संदर्भात काही करता येते का किंवा आपल्याला मोठया स्वरुपाचा कोंडवडा काही करता येईल का अशा स्वरुपामध्ये सुध्दा आपण विचार करणं गरजेच आहे. तरी डॉ.दगडे यांना त्यासंदर्भात खुलासा करण्यास सांगावे अशी मी मा.महापौरांना विनंती करतो.

**मा.महापौर -** डॉ.दगडे खुलासा करावा व तुम्ही फोन का उचलत नाहीत हे सुध्दा सांगाव. सध्या भटकी कुत्री पकडायला काही अडचण आहे परंतु जी पाळीव कुत्री घराघरात आहेत सकाळी नागरीक फिरण्यासाठी बाहेर पडतात परंतु ते कुत्रे रोडवरच घाण करतात. आपल्या आरोग्याच्या लोकांनी कोरोनाच्या काळात काम केल पण त्यांनी कुञ्याची घाण भरावी का आयुक्त साहेब. तरी तीकडे पण लक्ष दयावे. डॉ.दगडे आपण सविस्तर खुलासा करावा.

**डॉ.दगडे (पशुवैदयकीय अधिकारी) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आता सर्व सन्मा.सदस्यांनी कुञ्याच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे त्यासाठी सुप्रिम कोर्ट व केंद्रशासनाच्या नियमानुसार........

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा.महापौर साहेब, डॉ.दगडे तुम्ही फोन का उचलत नाहीत ते अगोदर सांगा. डॉ.गोरे होते त्यांनी कधी फोन घेतला नाही असे झालेले नाही.

**डॉ.दगडे (पशुवैदयकीय अधिकारी) -** मा.महापौर साहेब, फोन उचलतोना.

**मा.महापौर -** आशाताई डॉ.दगडे यांना काही उत्तर देता येणार नाहीत तरी अति.आयुक्त पवार साहेबांनी खुलासा करावा.

**मा.अजीत पवार (अति.आयुक्त) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आपण दोन-तीन गोष्टी बाबत चर्चा केलेली आहे. गुरं-ढोरं, डूकर आणि कुञ्यांच्या बाबत. गेल्या मार्च पासून माझ्यासह सगळे अधिकारी कोरोनामध्ये होतो. १ ऑक्टोबर पासून आम्हांला थोडाफार वेळ मिळाला आहे आणि त्याच्यातली प्रगती

आपल्याला सांगतो. कलाटे साहेबांनी डूकरांच्या बाबत विषय सांगीतला होता त्याबाबत कालपासून तामीळनाडूची टिम आलेली आहे काल त्यांनी चाळीस डुकर पकडलीत, आज तीस डूकर पकडलीत आणि ती मोहीम डिक्लेर करायची नव्हती त्याबाबत सागर अंगोळकरांनी बोलले होते आता ते चालू आहे पण गेल्या वेळेसचे डूकर पकडणा-यांचे अनुभव फार खराब आहेत आणि आता सुध्दा खराब आहेत. गेल्यावेळेस काही लोकांनी त्यांच्यावर हाल्ला केला होता आपण त्यांना कोल्हापूर पर्यंत पोलीस बंदोबस्त दिला होता. आपल्या पिंपरी चिंचवड मधील काही गुंडानी कोल्हापूरमध्ये जावून दगडफेक केली होती. आजही तामीळनाडूतील लोकांची हीच मागणी आहे की आम्हांला कोल्हापूरच्या पलीकड कर्नाटक बॉंड्रीपर्यंत सोडाव आणि आपण त्यांच्या मागणीनुसार त्यांना कर्नाटक बॉंड्रीपर्यंत सोडतोय. गु-हांच्या बाबत गंभीर प्रश्न असलातरी आपण त्याच्यामध्ये या महीन्यामध्ये दोन-तीन गोष्टी चांगल्या केलेल्या आहेत. एकतर त्याच टेंडर काढलेल आहे आणि चांगल्या ग्रूपने ते टेंडर घेतलेल आहे ते अत्यंत कमी दरामध्ये घेतलेलं आहे. डूकरांच्या बाबतीत सांगायच झालतर पुर्वीचा आपला डूकर पकडण्यासाठीचा ७०० रुपये दर होता पण आता महानगरपालिका ही फुकट डूकर पकडते त्याच्यामध्ये एकही रुपया खर्च नाही. गु-हांच्या बाबतीत मा.संदिप वाघेरे यांच मी विशेष आभार मानेल की त्यांनी त्या गुरंढोर पकडणा-यांच्या बाबत माझी बैठक आणि त्यांची आणि पकडणा-या लोकांची बैठक घेवून दिली आणि त्यांनी आम्हांला असं आश्वासन दिलय की आम्ही दोन हजार गाई आणि गुरं पकडून देवू. त्यांच्या कामासाठी मी स्वत: भीमाशंकर येथील जे गुरं ठेवतात त्या संस्थेला भेटून आलो, पुरंदरच्या संस्थेला भेटून आलो, रांकाच्या पांजरपोळला भेटून आलो. रांकाच्या पांजरपोळनी मला फक्त पन्नास गुरं ठेवण्याची सहमती दिली त्यांच्याकड आतापर्यंत ७८ गुरं ठेवलीत त्यातली जवळजवळ मी ५२ गुरं पुरंदरला पाठवलीत. संदिप वाघेरे यांच पुन्हा एकदा आभार मानतो की त्यांनी एक अशी संस्था दिली की पाचशे ते हजार गुरं घेवून जातील आणि पुढच्या आठवडयामध्ये गुरं आणि ढोरं पकडण्याची मोहीम सुरु होईल. कुत्र्यांच्या बाबत मा.आयुक्त साहेब आणि आम्ही दिपा बजाज यांच्या बरोबर बैठक घेतली आणि आमचा हा जो प्रॉब्लेम आहे तो कशाप्रकारे सॉल्व्ह करावा याबाबत त्यांच मार्गदर्शन घेतलं, एक दोन एनजीओ आम्हांला मदत करतात. गेल्या सहा महीन्यामध्ये आपण एक प्रयोग राबवला होता तो असा प्रयोग राबवला होता की आपली पुर्वीची हजार ते बाराशे ऑपरेशन परडे होत होती. आता साधारण आपण आडीच हजार ऑपरेशन

महीन्याला करतो आणि गेल्या पाच महीन्यात कोवीड पासून साधारणतः आपण साडेबारा हजार ऑपरेशन्स केलीत त्याचा सगळा डाटा आहे. ज्या ज्या कुत्र्यांचे कान कापलेले आहेत त्याचा डाटा आहे आणि शिवाय त्यांना बेल्ट लावण्याची सोय करतो. याच्यामध्ये एक मेजर प्रॉब्लेम असा आहे की आपल्याला आडीच हजार महीन्याची ऑपरेशन्स करुन हा प्रॉब्लेम सॉल्व्ह होणार नाहीतर आपल्याकडे जो डॉगचा डाटा आहे तो ८० हजार आहे त्याच्यामुळे अजून पॉईंटस वाढवण्याबाबत मा.चेअरमन साहेब यांच्याशी चर्चा केली आणि चेअरमन साहेबांनी त्याच्यामध्ये मान्यता दिलेली आहे पुढच्या आठवडयात डॉकेट ठेवणार आहेत त्याच्यामध्ये साधारणतः अजून हजार महीन्याला ऑपरेशन्स वाढतील एवढ केस बनवण्याच प्रपोजल देत आहे. याच्यामध्ये मोठा प्रॉब्लेम आहे की पिंपरी चिंचवड मध्ये डॉगप्रेमी फार जबरदस्त आहेत कारण आपल्याकड जी स्मशानभूमी आहे ती स्मशानभूमी बंद करण्यासाठी अडचणी येतात म्हणून आपण प्रांताशी कॉन्टॅक्ट केलाय. एक उदाहरण म्हणून सांगतो की मध्यंतरी एका डॉगप्रेमीनी सात वर्षापुर्वी एक डॉग मेला त्याचा वाढदिवस साजरा करण्यासाठी परवानगी मागीतली होती. मी ती परवानगी दिली नव्हती. मुलगा आणि वडील दोघेजण माझ्याकड दुपारी रडत आले त्यांचा मुलगा फॉरेनवरुन आला होता आणि आपल्याच ऐरीयामध्ये त्याला वाढदिवस साजरा करायचा होता. मी आपल्याला त्याचे फोटो दाखवले त्यादिवशी त्यांनी त्या जागेवर जवळ जवळ शंभर दिडशे फुगे लावले होते आणि आडीचशे लोकांना जेवण घातलं होतं. अशा डॉगप्रेमी बाबत डॉगवर कारवाई करणे किती अवघड गोष्ट असेल हा आज पिंपरी चिंचवडमध्ये चर्चेचा विषय आहे. तरी सुध्दा जे काही सेंट्रलचे आणि स्टेटचे मार्गदर्शक तत्व आहेत त्याच्यानुसार या महीन्यामध्ये आपण दोन तीन गोष्टी करु. एकतर आपण मा.आयुक्त यांच्या मागदर्शनाखाली आणि बजाज मॅडमच्या मागदर्शनाखाली काही ईवाय डिक्लेअर करु. कलाटे साहेबांनी वगैरे सांगीतलेल्या संस्थेबरोबर कसं कोलॅब्रेशन करुन आणखीन काम करता येईल ते बघु यात. या महीन्या दिड महीन्यामध्ये आम्ही या तीन्ही विषयामध्ये आपल्याला चांगला रिझल्ट दाखवतो. डूकर पकडण्याची मोहीम कालपासून चालू आहे त्याचा एक रिझल्ट येईल. संदिप वाघेरेंच्या बरोबर कोलॅब्रेशन करुन ती जी संस्था आहे त्यांच्या बरोबर काम करुन गुरं पकडण्यामध्ये आपल्याला महीन्या दिड महीन्यामध्ये चांगला रिझल्ट येतोय. डॉगमध्ये मी आपल्याला परत एकदा विनंती करतोय की संख्या खुप मोठी

आहे ८० हजार आहे त्याचा रिझल्ट यायला थोडा वेळ लागेल पण आम्ही चांगले प्रयत्न करु एवढ आपल्याला आश्वासन देतो.

**मा.राजू मिसाळ -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. भटक्या जनावर वरती किंवा कुत्र्यावरती जी काही आपण कारवाई कारणार त्याच नियोजन सांगीतल आहे. पाळीव प्राण्याबाबतीत आपल काही धोरण ठरलय का. पुणे महापालिकेन ज्यांच लायसेन्स नाही किंवा तो रोडवर घेवून फिरतो अशाला पाचशे रुपये दंड आहे. त्याच्यासाठी त्यांना जी काही बॉण्डींग करावी लागते त्यासाठी आपल्या महापालिकेनी काही व्यवस्था केली का, कारण ती पण व्यवस्था करावी लागेल. मी अ प्रभाग अध्यक्ष होतो त्यावेळेला मी प्रभागामध्ये धोरण केलेलं होतं की अशा लोकांना पाच हजार रुपये दंड करा. त्याला पहील्यांदा व्यवस्था करुन देणं गरजेच आहे. ती व्यवस्था करुन दिल्यानंतर आपण दंड पण आकारु शकतो. पहीली व्यवस्था करणें गरजेचे आहे व्यवस्था करुन दिल्यानंतर आपण दंडात्मक कारवाई करु शकतो. एक पत्रक काढून फक्त प्रसिध्दी मिळवण्यासाठी आपल्या विभागाने त्याच्यावर कोणतीही कारवाई केलेली नाही. दगडे साहेब बाजूलाच आहेत त्यांनी किती कारवाया केल्या आहेत ते विचारा बरं. आज तुम्ही शहरात फिरा, आमच्या कडे प्राधिकरण म्हणल्यानंतर प्रत्येक घरात डॉग आहेत. एक नाहीतर दोन-दोन, तीन-तीन लोकांनी पाळलेले आहेत. आज नागरीकांना त्रास होतोय. तो भाग असलातरी आपण त्यांची पहील्यांदा व्यवस्था करण फार गरजेच आहे. जस तुम्ही परवा आमच्या डीआरएम ऑफीसला येवून जो मला आपण रेल्वेचा पट्टा करतो त्याच्यामध्ये जे डिझाईन केल आहे त्याच्या लॅण्डस्केपमध्ये त्या प्रकारची सॅण्ड त्याचा ऐरीया करुन त्याच्यामध्ये काहीतरी एक इन्जेक्ट केलं जातय त्या स्मेलमुळ तो डॉग हा ऍटोमेटीक तीथपर्यंत जाऊन त्याची ती क्रीया करु शकतो. आपण पकडण्याचा विचार करतो पण जे पाळीवप्राणी आहेत यांची पहील्यांदा व्यवस्था करा. आता वैशालीताईनी सांगीतल उदया हॅण्डग्लोज दया किंवा त्यांची जी काही पिशवी, कॅरीबॅग असेल ते दयाव लागेल. हे आपल्याकडन पहील प्रोव्हाईड करु नंतर मग त्याच्यावर दंडात्मक कारवाई करता येईल पण लगेच त्याच्या बरोबर ते प्यारलल धोरण पण ठेवा एवढ बोलून थांबतो.

**मा.अजीत पवार (अति.आयुक्त) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. पाळीव प्राण्या

बाबत आयुक्त साहेबांशी चर्चा करुन त्याच्यावर काय निर्णय घ्यायचा त्याबाबत डॉकेट ठेवतो.

**मा.महापौर-** आपल्या सर्वांच्या भावना लक्षात घेवून पशुवैदयकीय अधिकारी पुर्वी गोरे साहेब होते त्याच्यानंतर पशुवैदयकीयला वारीस नाही हे आपल्या सर्वांच्या लक्षात आल आहे. पण आयुक्त साहेब डॉ. दगडे फक्त खुर्ची आणि पगार घ्यायला आहेत का. नाहीतर दुसरे कोण असतीलतर त्यांना चार्ज दया. जे पाळीव कुत्री आहेत त्यांचा सर्व्हे करा त्यांना आपल्या पालीकेची परवानगी आहे का, बॅच, बील्ला आहे का. आपली लोक गेली की ती दडून बसतात. पाळीव कुत्री सुध्दा लोक मोकळी सोडतात आणि ब-याच जणांना चावतात. विचीत्र परिस्थिती आहे. आयुक्त साहेब आपण स्वतः लक्ष घालाव आणि सभागृहाच्या भावना लक्षात घेता डॉ. दगडे फोन उचलत नाहीत. दगडेंचा पशुवैदयकीय अधिकारी म्हणून कुठलाही उपयोग होत नाही, कुत्र्यांची शस्त्रक्रीया आपण वेगळया संस्थेला करायला देतो त्यामध्ये ब-याच कुत्र्यांना मृत्यू सुध्दा आलेला आहे. डॉगप्रेमीनी माझ्याकडे तक्रार सुध्दा केलेली आहे. तरी आयुक्त साहेब याच्यावर एक वेगळा अधिकारी ठेवा त्यांना पगार दया आणि यांना त्यांच्या घरी पाठवा. विषय क्रमांक १ वाचावा.

**मा.अॅड.मोरेश्वर शेडगे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- ५७३ विषय क्रमांक- १

दिनांक- १३/१०/२०२० विभाग- मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/१०३/२०२०, दि.२८/०२/२०२०

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६८९९ दि.२८/२/२०२० अन्वये.

३) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ५३३ दि.०१/०६/२०२० अन्वये.

४) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ५५४ दि.२१/०८/२०२० अन्वये.

मनपाच्या परिसरातील रुग्णालये व इतर संलग्न (मनपासह) जैव वैदयकीय संस्थामधून निर्माण होणा-या जैव वैदयकीय कच-याची याबाबतचा कायदा, नियम व मागदर्शक सुचना या गोष्टींच्या योग्य त्या अंमलबजावणी बाबत गांर्भियाने विचार करणे आवश्यक आहे. या सर्व बाबींचा विचार करता मोशी येथे जैव

वैदयकीय घनकचरा विल्हेवाटीचा Plant स्थलांतरीत करण्यासाठी M/s.Pasco Environmental Sol. Pvt. Ltd., यांनाच करारनामा अट क्र.२२ नुसार चालू Terms वर नवीन Plant स्थापन करुन संचालन पुढील १५ वर्षे करावे की नव्याने निविदा काढावी ? याबाबत विचारणा करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७२ (ब) नुसार सोबत जोडलेल्या प्रपत्र - अ, ब, क व ड चे अवलोकन करुन मान्यता देणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी असली तरी, प्रस्तुत विषयातील काम मे.पास्को इन्व्हायरमेंटल सोल्युशन प्रा.लि. यांचे कडून अट क्र.२२ नुसार चालू Terms वर नवीन Plant स्थापन करून पुढील १५ वर्षे संचालन करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.अंबरनाथ कांबळे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.महापौर-** याची महीती दयावी.

**डॉ.साळवे (अति.वैदयकीय अधिकारी) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरातील हॉस्पिटल वेस्ट जे आहे किंवा बायोमेडीकल वेस्ट आहे त्याची विल्हेवाट लावण्यासाठी जो पास्कोचा व कंत्राटदाराचा विषय आहे तो आपल्या समोर आहे. हा जो प्रोजेक्ट आहे त्याची निवीदा काढून खाजगी तत्वाने खाजगी गुंतवणुकीतून पीपीपी या तत्वावर त्यावेळेस निवीदा काढून या संस्थेला नेमलेलं आहे. त्यावेळेस त्या संस्थेला १५ वर्षासाठी नेमणूक केली होती. २८/२/२००५ ला १५ वर्षाचा करारनामा केलेला होता. ज्यावेळेस महापालिकेनी प्रोजेक्ट सुरु केला त्यावेळेस प्रायव्हेट डॉक्टर आणि हॉस्पिटलसाठी त्यांना सवलती दरामध्ये सेवा पाहीजे होत्या त्यासाठी त्यांनी मागणी केली. महापालिकेनी करारनामा केला होता त्यावेळेस त्या कंत्राटदाराला त्यांचे बरोबर ठरवलेल्या रेट प्रमाणे वार्षीक दरवाढीपमाणे रेट दयायचे कबूल केलेल होतं करारनाम्यामध्ये आणि सवलतीचे दर दयायच ठरवल होतं. सवलतीचे दर साधारणतः २००६-०७ पासून २०१३ साला पर्यंत टप्याटप्याने दिले गेले होते. त्याला सक्षम समितीची मान्यता होती. या संपुर्ण २००६-२०१३ या कालावधीमध्ये महापालिकेनी ठेकेदाराला साधारणतः १० कोटी ५१ लाखाचे बील अदायगी केली. त्याच कालावधीमध्ये खाजगी रुग्णालय किंवा वैदयकीय व्यावसायाकांकडून जे बील जमा केली त्याच्यामध्ये महापालिकेनी बायोमेडीकल वेस्टचे ३ कोटी ७२ लाख जमा केले. ॲग्रीमेंटप्रमाणे महापालिकेनी खाजगी वैदयकीय व्यावसायाकांकडून

नोंदणीचे पैसे घ्यायचे होते आणि बील आपण करारनाम्याप्रमाणे त्यांना दयायचे. या कालावधीमधला खर्च जो आहे साधारणतः आपल्याला जी सुट दिलेली आहे त्याच्यातुन आपल्याकड ५ कोटी ८० लाख रु. खर्च आलेला आहे आणि त्याच्यामध्ये आपल्याला सुट दिल्याबद्दलचा जो बोजा आलेला होता तो साधारणतः ६ लाख रु. आलेला होता. सर्व वैदयकीय व्यावसायीक व डॉक्टर संघटनेच्या माध्यमातून जास्तीत जास्त नोंदणी करण्यासाठी प्रयत्न केलेला होता त्यामुळ महापालिकेत सुट दिली होती. २०१३ पासून युजर चार्जेस लावले त्यामध्ये महापालिकेनी कुठल्याही प्रकारची अतीरीक्त चार्जेसचे जेवढे पैसे आपण कंत्राटदारांना देतो तेवढेच पैसे वैदयकीय व्यावसायातून वसूल करायच ठरलं. तेव्हापासून महापालिकेनी कुठल्याही प्रकारच या कॉन्ट्रॅक्टरला वेगळे पैसे दिले ते सगळे पैसे आपण वसुल करतो. याच कालावधीत फक्त महापालिका त्यांचे त्यांचे रुग्णालय, दवाखाने यांची बायोमेडीकल वेस्टेचे तेवढे चार्जेस आदा केले जातात. याच्यामध्ये २०१३ पासून आपण २१ कोटी २५ लाख रुपये या कंत्राटदाराला आदा केले आहेत त्यापैकी आपण जे जमा केलेत महापालिकेकड ते १८ कोटी ४० लाख रुपये फि पोटी आपण जमा केलेले आहेत आणि यापैकी महापलिकेचे ऍडीशनल पैकी २ कोटी ५२ लाख रुपये महापालिकेच्या कच-यापोटी आपण त्यांना पेमेंट केलेल आहे. हे सगळ पाहीलतर २०१३ पासून २०२० च्या कालावधीमध्ये कुठल्याही प्रकारचा खर्च नाही हे स्पष्ट होते त्यामुळ आता त्या कालावधीत महापालिकेकडे जो प्रोजेक्ट सुरु झाला त्यावेळेस त्याला सुट दिली होती. आतापर्यंत ज्या गोष्टी आहेत त्याच्यामध्ये २०१३ पासून कुठल्याही प्रकारे त्याला सुट दिली नाही. सद्स्थितीमध्ये आता आपल्याकड २०२० ची जर स्थिती पाहीलीतर आता आपल्याकड २५०० वेगवेगळे रजिस्ट्रर आहेत आणि साधारणतः शहरामध्ये जमा होणारा कचरा ५८७ टन होतो म्हणजे साधारणतः दिवसाला १.७ इतका कचरा लावतो. जर बघीतलतर आपल्या परिसरामध्ये वैदयकीय व्यावसायीकांची दर वर्षाला साधारणतः १८ ते २० टक्के इतकी वाढ होते आणि कच-याची साडेनऊ ते दहा टक्क्यांनी वाढ होते. कचरा जो वाढतो शहरामध्ये तो शहरीकरणामुळ. शहरामधल जे बायोमेडीकलवेस्ट आहे तो अतीशय महत्वाचा मुद्दा आहे कारण आता बायोमेडीकल वेस्टचे २०१६ चे नवीन कोर्स चालू झालेले आहेत. सध्याचा प्रकल्प पहील्यापासून वायसीएम मध्ये चालू आहे. २००६ पासून अटीमध्ये ठरल्याप्रमाणे आपण जागा शोधतोय, जागा आपल्याला मिळत नव्हती. २०१० साली मोशी येथील कचरा डेपोमधली एक एक्कर

जागा निश्चित केली होती. ती निश्चित केल्यानंतर टप्याटप्याने त्याला परवानगी घ्यायची प्रक्रीया चालू झाली. २०११ मध्ये एमपीसीबीकड दाखवून एमपीसीबीने त्याला नाहरकत प्रमाणपत्र दिलं प्रोजेक्ट करायला हरकत नाही म्हणून व २०११ मध्ये चिमणीसाठीच्या उंचीसाठी त्याला परवानगी घ्यावी लागली. २०१२ मध्ये त्यानी जो बायोमेडीकल वेस्टचा प्रोजेक्ट बांधायचा होता बिल्डींग प्लॅन पास करण्यासाठी त्यांनी अर्ज केला तो बिल्डींग प्लॅन साधारणतः २०१४ मध्ये पास झाला. नंतर त्यांनी कन्सेन्टू एस्टॅब्लीश ही एमपीसीबीची परवानगी असते त्यासाठी अर्ज केला कन्सेन्टू एस्टॅब्लीश त्यांना प्राप्त करुन घ्यायची होती तेव्हा त्यांनी अर्ज केला त्यावेळेस एमपीसीबीने एन्व्हायरलमेंट क्लेरन्स घ्यायला लागेल अशी अट घातली. कन्सेन्टू एस्टॅब्लीश घ्यायची होती तेव्हा त्यांनी महापालिका आयुक्तांच्या मान्यतेनी २०१६ साली त्याला अप्लाय केला. अप्लाय केल्यानंतर त्यात सार्वजनीक सुनावणी झाली व मे-२०१९ मध्ये स्टेट एन्व्हायरलमेंटलची जी कमिटी आहे यांनी आपल्याला शिफारस केली की यांना दयायला हरकत नाही आणि स्टेट एन्व्हायरलमेंटल कमिटीने जानेवारी २०२० मध्ये त्याला ईसी प्राप्त झाली. आता परिस्थिती अशी आहे की वायसीएम मधला प्रोजेक्ट ब-यापैकी जुना झालेला आहे. तीथ जागा नाही. त्यांना गेल्या सहा महीन्याच बघीतलतर ३५ ते ४० लाख एवढ महीन्याच बिलींग आहे. वर्षाला साधारणतः त्याला चार ते साडेचार कोटीच आपल्याला बिलींग आहे, आपण बील देतो. ते ऍग्रीमेंटच असं आहे की आपण त्यांला बिल दयायच आहे आणि आपण मेडीकल एस्टॅब्लिश करुन ते गोळा करायच आहे आणि हेल्थकेअर फॅसिलीटी जी आहे त्यांच्याकडे महापालिका रजिस्ट्रेशनच्यावेळी पैसे जमा करते आणि आपण त्यांना बील देतो ही प्रक्रीया गेले २००६ पासून चालू आहे. २००६ ते २०१३ पर्यंत १० कोटी दिले आणि २०१३ ते २०२० पर्यंत २१ कोटी दिले.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह मा.कमिशनर साहेब, आता तुम्ही जे काही मुद्दे आम्हांला सांगितले आहेत ते आम्हांला एकदम स्पष्टपणे सगळयांना कळाले. एक तर सगळयात महत्वाचं मा.महापौर साहेब या विषयाला माझा ठाम विरोध आहे. १५ वर्ष एखादया कॉन्ट्रॅक्टरला आपण टेंडर काढून काम दिल्यानंतर परत त्याला १५ वर्षासाठी मुदतवाढ देणं योग्य नाही. मगापासून आम्ही सगळेजण बोलतोय की, प्रशासन नेमकं काय करतयं ज्यादिवशी तुम्हांला माहिती होतं की,याचं टेंडर ६ महिन्याच्या आतमध्ये संपणार आहे, वर्षाच्या

आत मध्ये संपणार आहे, तर आपण टेंडर प्रक्रियेला का गेलो नाही? ईसीकड जायच का? कन्सेन टू एस्टॅब्लिश घ्यायच का? कन्सेन टू ऑपरेट घ्यायच का ? नन ऑफ हावर बिझनेस. मला एक सांगा एमपीसीबीचा नियम आज आपल्याला आला आहे का? २००५ सालीच आलेला आहे. ज्यावेळेस तुमचं टेंडर झालं त्या टेंडरमध्ये तुमच्या या अटी असायला पाहिजे होत्या. अहो,तुम्ही कुणाला शिकवता साळवे साहेब. अहो,याच्या आधी २००९ ला आपल्या इथे Consent to Establish आणि Consent to Operate घेतला नाही म्हणुन याठिकाणी MPCB ने आपल्या झोपडपट्टी पुनर्वसन सेक्टर २२ चे प्रकल्प बंद पाडले. ही तुमची सगळयाची मिलीभगत आहे आणि म्हणुन तुम्ही कळु देत नव्हता. आपले जे महापालिकेचे हॉस्पिटल आहेत त्याचे सुध्दा आपण चार्जेस देतो त्यांना, आणि कोटयावधी रुपये देतो. तुम्हांला माहिती आहे नां आता साहेब आपण कचरा डेपोला नवीन प्रोजेक्ट तुम्ही केलेला आहे. कमिशनर साहेब, तुम्हांला विचारते, तुम्ही खालीच बघता, काही तरी रिऍक्ट करानां, आता जे प्रोजेक्ट केले त्याच्यामध्ये त्यांना MPCB कडे जायला Environment clearance घ्यायला १ वर्षाच्या कालावधीत आतमध्ये त्यांनी आणलं आणि ज्या माणसाला १० वर्ष, १५ वर्ष, ८-८ वर्ष लागतात त्याला परत का द्यायचं? मा.महापौर साहेब, ही परवानगी द्यायला ६ महिने किंवा १ वर्ष लागतात.आता तुम्ही जो कायदा सांगितला तो इतका हास्यास्पद आहे, कीव करावीशी वाटते. लेखी दिलं आहे इथ प्रशासनाने की,मग आपण त्यांना Consent to Operate घ्याव लागेल मग Building Permission घ्यावं लागेल, मग त्यांना MPCB कडे जावे लागेल आणि मग त्यांना Environmental कडे जावे लागेल, का जाऊ नये. इथे बसलेले अनेकजण आहेतना, अजित गव्हाणे असतील,संदीप वाघेरे,भाऊसाहेब भोईर असतील हे सगळेजण बिल्डर आहेत ते जात नाहीत का? ते जात नाहीत का ते विचारा MPCB कडे किंवा Environmental कडे जावंच लागतंय नां आणि सगळया कार्यक्रमाला म्हणजे ६ महिन्याच्या आत परवानगी मिळते मग तुम्हांला इतकी वर्ष का लागले. हे,जे आहे नां साहेब, कमिशनर साहेब, तुम्ही याच्यावरती म्हणजे खरंतर तुमच्यासारख्या अभ्यासु कमिशनर साहेबांनाकडनं आम्हाला अपेक्षाच नाहीहो साहेब हे. अशा प्रकारे तुम्ही काम करणार आहो,आमचं सोडा हो, आम्हीतर कुणालाही सांगतो, आमच्यावर नका जाऊ तुम्ही, तुम्ही तुमचं काहीतरी स्कील वापरा नां, आणि एवढा विश्वास टाकला तुमच्यावरती तुमचं काही स्कील वापरणार आहेत की नाही, चीड येती हो साहेब, असं झाल की. तुम्हांला माहिती आहे याच्यामध्ये काय

आहे याच्या उपर तुम्ही विषय आणायचा वारंवार प्रयत्न करता आणि एखादा विषय का जर आम्ही सांगितलाना भावनेच्या आहारी तर तुम्ही आम्हांला कायदा शिकवता आता इथं का नाही तुम्ही कायदा पाळला. का नाही तुमच्या प्रशासनावरती कारवाई केली तुम्ही. वर्षाला ५ ते ६ कोटी रुपयाच उत्पन्न आहे पास्कोचं आता १५ वर्ष काम केलं विचारा त्यांना काय असतं. वर्षाच त्यांच बॅलेन्स शिट दाखवा त्यांनी विषय यावेळेस तहकुब ठेवू देत पुढच्यावेळेस मी बॅलेन्स शिट दाखवते आणि यांनी नाही दाखवले तर मी १०० टक्के हायकोर्टाचा दरवाजा वाजवणार, मी काही गप्प बसणार नाही. अशा प्रकारची लुट करुन आणि तुम्ही अशा प्रकारे १५-१५ वर्ष जर का एकाच माणसाला पोसणार असाल आणि पुढच्या १५ वर्ष परत तुम्ही त्याला देणार असालतर खपवून घेणार नाही. तुमचं प्रत्येक गोष्टीत तसंच आहे शिक्षण मंडळ असेल तिथं तुमच तसंच इथंही तुमचं तसंच, कशासाठी? आमचेच आणि आपले आलीबाबा चाळीस चोर,आमचं घेणं देणं पण नाही. आम्हांला तर माहित पण नाही काळा का गोरा तोही पाहिला नाही. याच्यापुर्वी कुत्र्याचा,डुकराचा,जनावरांचा विषय झाला. आहो,माणुस कोण आहे तो बघायला जरी बोलावलंना तरी येत नाही. ते सांगतात तुम्हांला गरज आहे तर काम करुन घ्या नाहीतर आम्ही येत पण नाही इतकी वाईट परिस्थिती आहे आणि अशा प्रकारे जर का तुम्हांला वार्षीक ४/५ कोटीचं उत्पन्न होत असेल तर त्या माणसाला आपण परत १५ वर्ष देण्याचं कारण काय? फार,फार तर तुम्ही ६ महिन्याची मुदतवाढ द्या. आणि तुमच्या म्हणण्याप्रमाणे इतरांना सगळयांना वेळच लागणार आहे नां, तुम्ही कन्टेस्ट तरी करु द्या शर्यतीत पळूतर दया लोकांना. ६ महिने करा याला आणि ६ महिन्यानंतर मा.महापौर साहेब,आपण आदेश करा की, ६ महिन्याच्या आत उद्यापासून आपण याठिकाणी या निविदा प्रक्रियेला सुरुवात करा. आपण करु शकतो आणि समजा आपल्या म्हणण्यानुसार हाच एकटाच माणुस आहे जगात, भारत देशामध्ये तर हाच पात्र होईल परत त्याला १५ नाही २५ वर्षासाठी देवुन टाका पण तुमची शर्यतच झाली नाही त्यामुळ कोण हरलं आणि कोण जिंकल हे म्हणायला वाव नाही. त्यामुळ अशा प्रकारचा प्रस्ताव आणताना ज्या,ज्या अधिका-यांनी त्याठिकाणी दुर्लक्ष केलेलं आहे ज्यांनी टेंडरची मुदत संपल्यानंतर सुध्दा टेंडर प्रक्रीया चालू केलेली नाही त्या अधिका-यावर काय कारवाई करणार आहात हे कमिशनर साहेब तुम्ही पहिलं सांगा आणि मग आम्हांला या विषयावरती बोलायचं आहे. कशासाठी करतोय साहेब आपण हे, आणि का? मगाशी आम्ही तुमचा कोविडचा तो विषय ठेवला आहे बाजुला

अनेक लोकांना अनेक प्रश्न आहेत नगरसदस्यांना कुठल्या वस्तू घेतल्यात, किती आल्या आहेत, सीएसआर मध्ये किती आल्यात, कुठं काय वाटप केलं कशाचा कशाशी ताळमेळ नाही. आम्ही त्या विषयाच्या विरोधात नाहीत, उद्या तिकडचा विरोधी पक्ष सत्ताधारी पार्टी म्हणुन आमचे वाभाडे काढणार आहे आणि म्हणुन आम्ही ते थांबवलय. या विषयात सुध्दा तसंच आहे. ज्यांचे कोणाचे इंट्रेस्ट असतील त्यांचे असु दे बीचा-यांचे, आमचं काही म्हणणं नाही. परंतु ६ महिन्यासाठी तुम्ही त्यांना मुदतवाढ देवुन सुध्दा हा विषय करु शकता आणि जो तुम्ही सरळ मार्गी करु शकता त्याच्यासाठी परत १५ वर्ष मुदतवाढ द्या म्हणुन तुम्ही आमच्यापुढं येणं हे योग्य नाही, हे योग्य नाही. कमिशनर साहेब,तुमच्याकडनं मला अपेक्षाच नाही, अपेक्षाच नाही. तुम्ही नका करु ही असली कामं, याचा सगळयाचा भुर्दंड आम्हांला बसणार आहे. एक तर मुळात तुम्ही वायसीएमएचला जागा द्यायला नव्हती पाहिजे. आता चिमणी बसवण्यासाठी म्हणे MPCB ची परवानगी घ्यावी लागते. अरे,कुठला पण कारखानदार त्या एम.आय.डी.सी.त या माझ्या कुठलाही कारखानदार ज्यादिवशी तो कंपनी बांधायला घेतो ना,त्यादिवशी तो पहिलं MPCB कडं जातो, त्या दिवशी तो पहिलं Environment कडे जातो चिमण्या सगळयांनाच कढाव्या लागतात. इथ इन्स्टॉलेशन होतं आपल, किती सिरीअस विषय होता त्यावेळीतरी NCP आणि Congres सत्तेत होती म्हणुन त्यांच्या चुका आम्ही करायच्या हे योग्य नाही. आम्हांला दुरुस्तीला संधी आहे नां, मग आम्ही दुरुस्त का करायचं नाही. नाहीतर त्यांच्यात अनं आमच्यात काय फरक राहीला त्यावेळेस त्यांना नाही कळालं,आज कळतंय नां, आज सगळयांचे हात वर आहेत त्याच्यावर तेच बोलणार आहेत मग का कळत असेलतर, कळत असताना सुध्दा एखादा केलेला गुन्हा हा तुमच्या आर्थीक हितासाठी असतो आणि म्हणून अशा आर्थीक हिताच्या गुन्हयाच्या मी ठामपणे विरोधात आहे. तुम्ही त्यांना ६ महिन्याची मुदतवाढ द्या ६ महिन्याच्या आत कमिशनर साहेब,तुमच्याकडनं याच्यावर कारवाई झाली पाहिजे. साहेब,तुम्ही मुळात आमच्याकडं यायलाच नाही पाहिजे होतं. साहेब, तुम्ही यायला नाही पाहीजे होत. आम्ही म्हटल नाही, तुम्ही आमच्या गळयात लोढणं अडकवायचं नाही. आमचा काय संबंध नाही याच्याशी आणि आता हा खेळ आमच्या गळयात नका टाकू, हा खेळ आमच्या गळयात नका टाकू आमचा काय संबंध आहे याच्याशी. साहेब, हा विषय आणला का? तुमच्याच स्तरावरती करायचं होतं. काय क्लॉज होता वाचाहो, करारनामा वाचा.

**मा.डॉ.पवन साळवे (अति.आरोग्य वैदयकीय अधिकारी) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह करारनाम्यातील अट क्र.२२ नुसार, मा.आयुक्त यांना कामाची गुणवत्ता तपासून सदर कामास मुदतवाढ देण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे. ऑपरेटर या कलमाप्रमाणे ऑपरेटरने इथं प्रोजेक्ट उभा केल्यानंतर त्या कालावधीमध्ये त्याचे जे कामकाज मशिनरी चांगली ठेवली,आवश्यक ते सर्व मनुष्यबळ ठेवुनजर चांगला प्रोजेक्ट राबवला,कुठल्याही प्रकारच्या तक्रारी नसतील तर आयुक्त त्याच्या कामाची गुणवत्ता तपासून त्यांना पुढील १५ वर्षाच्या मुदतवाढीचा विचार करु शकतात.

**मा.सिमा सावळे –** मा.महापौर साहेब**,** जी.बी.चा उल्लेख आहे का? आयुक्तांना प्रत्येक टेंडर नाकारण्याचा,डायरेक्ट काम देण्याचा, हे प्रत्येक टेंडर क्लॉजमध्ये, क्लॉज असतो साहेब. शिक्षण मंडळाच्या कपडे खरेदीच्यामध्ये का नाही तुम्ही तुमचा अधिकार वापरला, का नाही वापरला साहेब आपण, आपण परवाच्या दिवशी ड्रेनेज खोदाईचं काम एका दिवसात थांबवलं माझ्या वॉर्डात येऊन बघा तुम्ही पाईप टाकण्याचं काम तुम्ही थांबवलं, का केलं साहेब, तिथं केलना तुम्ही एका दिवसात तुम्ही आला नाहीत आम्हांला जीबी पुढे विचारायला,आम्हांला विचारायला नाही आलात,मग इथे कसे आलात? तुम्ही जी.बी.पुढं येऊ शकत नाही साहेब, तो तुमच्या अधिकारात करा, त्यांचा प्रोजेक्ट चांगला होता ना मग रॅन्कीवाल्याचा पण चांगला होता. पोलीस फोर्स लावून आपण बाहेर काढला. आम्हांला पण कळतं तो जो क्लॉज आहेना तो प्रत्येक टेंडर नोटीसमध्ये असतो, प्रत्येक टेंडर नोटीसमध्ये असतो. नाकारायचा किंवा फेटाळायचा हा अधिकार आयुक्तांना असतो. म्हणून त्याच्यावरती तुम्ही १५ वर्ष नाही करु शकत साहेब,१५ वर्ष नाही करु शकत आणि त्याही पेक्षा महत्वाचं तुमची इमेज खुप क्लीन आहे. Non Corrpted म्हणुन आहे.बाकी कोणी काही म्हणु दे. का शंकेला वाव देताय, आहो, आम्ही कोणी येणार नाहीहो तुमच्या बरोबर, हे सगळं बदनामीचं गाठोडं तुम्हांला घेवुन जायचं आहे. तुम्ही येथून बदली होऊन गेलातना पाठ फिरली नाही फिरली, इथं दुसरा कमिशनर बसला रे बसला की,हार्डीकर किती नालायक,हार्डीकर कसा भ्रष्टाचारी किस्से रंगवून सांगणार आम्ही, हेच केलयं आम्ही इथं बसुन इतके वर्ष, कशाला करताय आमच्यासाठी, का? पापाचे गठ्ठे ठेवानां इथच ज्याचे आहे तो वाहील आणि तो जर एवढा चांगला असेल तर परत तो कॉन्ट्रॅक्टर बसलं कॉन्ट्रॅक्टरची इतकी बाजु घेण्याचं कारण काय? एका-एका दिवसात २४X७ ला, अमृत योजनेला एका-एका दिवसात तुम्ही कारवाई केलेली

आहे, काय कारण आहे हे तुम्ही सांगत नाहीत. तुमचा अधिकारी सांगतो तो एसी केबीनमध्ये बसून की साहेब, माझ्या वॉर्डात किती लाईन खोदून ठेवलेल्या आहेत ते तुम्हांला सांगतो आणि पाईप टाकताना हात वर केले. मी लोकांच्या शिव्या खाते तीथ तुम्ही एका दिवसात काय कारण नसताना काम बंद केलंना. आपल्या प्रशासनाच्या अशा किती चुका दाखवू. परवाच्या दिवशी दुस-या एका टेंडरमध्ये तुमच्याकडे आले, तुमच आणि माझ बोलणं झाल. एकाच ठेकेदाराला पाणीपुरवठयामध्ये चार-चार टेंडर लागतात. कसं करत साहेब प्रशासन? मॅनपॉवर पुरवण्याच्या केसमध्ये एकाच ठेकेदाराला चार टेंडर लागतात साहेब, मा.पंतप्रधानांनी सांगीतल की तेरा टक्क्यात आणि आकरा टक्क्यात तुम्ही त्याठिकाणी हे घ्या तीन महीन्याची सवलत होती आणि सवलतीच्या याच्यात तुम्ही एक वर्षाच टेंडर कोट केल आणि सांगीतल नाही भाऊसाहेब भोईर शेवटचे आले भाऊसाहेबच त्यात बसणार, का नाही बसणार भाऊसाहेब भोईर, कारण प्रशासन त्यांच्यासंग आहे. मला कॉन्ट्रॅक्टरला नांव घेवुन मोठ करायला लावु नका तुमच्याकडे तक्रार केली साहेब, सलग दहा दिवसानी हेलफाटे मारले मी तुमच्याकडे. काय संबंध आहे साहेब, काल तुमच, माझ, तांबेच चार तास बोलणं झालं, काय संबंध आहे कॉन्ट्रॅक्टरनी मला फोन करायचा, काय संबंध आहे. जर का माझी चर्चा प्रशासनाबरोबर झाली असेल तर त्याला कसं कळालं ही पारदर्शकता आहे आपल्या कामाची, अपमानकारक वाटते साहेब, अंगाची लाही,लाही होते. इतकाही अपमान करु नका आमचा. तुम्ही जर हे केलं ना साहेब, तर व्यक्तीशा तुमच्या नावांनी कोर्टात केस दाखल करणार आणि मी वैयक्तीक तुम्हांला जबाबदार धरुन दाखल करणार माझा तुमच्यावरती प्रचंड विश्वास आहे आणि मी जेवढे काही कमिशनर पाहिले असेल त्यातले सर्वात बेस्ट कमिशनर म्हणुन मी तुमच्याकडे पहाते. मला ते करायला लावु नका,मला ते पाप करायला लावु नका. पण हे करीत असताना तुम्ही जर का हे केलं तुम्ही आमच्या पुढं यायचं काहीच कारण नव्हतं, काहीच कारण नव्हतं तुम्ही तुमचं परस्पर करु शकला असतात. साळवे साहेब,त्याच्यामध्ये आणखी काही अटी आहेत का? जी.बी.ची मान्यता घ्यावी लागलं का? त्याच्यामध्ये आहे का? परत १५ वर्षानी मुदतवाढ देताना जी.बी.ची मान्यता घ्यावी लागेल का? जो विषय आमचा नव्हता त्यात आम्हांला घेवु नका त्याच्यामध्ये, मला अजिबात आवडणार नाही पण तुम्ही जर करायला लावल हे जर केलं आणि करणार आहे मी वैयक्तीक नावानिशी पिटीशन दाखल करणार आणि तुम्हांला माहिती आहे. फस्ट हेअरींगला मी त्यामध्ये न्याय

घेवू शकेल, नका साहेब मला दार वाजवायला लावू. विरोधी पक्षात असताना मी तेच काम केल. किमान आता सत्तेत आहे तर सत्तेचं काही तरी आम्हांला बघु द्या. आम्हांला पण खुप चांगल काम करण्याची इच्छा आहे साहेब, लोकं आम्हांला पण नांव ठेवतात हो बाहेर, लई कोर्टात जात होती आता का नाही जात. नका जायला लावू आम्हांला, आणि नका करायला लावू साहेब ते. एखादया कॉन्ट्रॅक्टरला एखादया माणसांनी वर्षाला किती पैसे कमावले पाहिजेत हो, किती भूक असली पाहिजे माणसाची इतकी की, माणसाला माणुस गिळंकृत करायला अजुन तुम्हांला पैशाची भूक आहेच, अजून तुम्हांला कुणालाच त्याच्यामध्ये भाग घेवू दयायचा नाही. किती तरुण पोरं आहेत साहेब आता. सायंटीस्ट असलेली, या क्षेत्रा मध्ये काम करणारे. आपल्याकडे तर सतरंजी विकणारा पण मेडीकल इक्वीपमेंट पुरवतो, खेळणी पुरवणारा पण तीथ मेडीकलचे औषध पुरवतो. आहो, कशा कशावर बोलायचं असं वाटतं आपणच राजीनामा देवुन बाजुला व्हावं, कंटाळा आला आहे आम्हांला या सगळया गोष्टींचा. मा.कमिशनर साहेब, मा.महापौर साहेब, मी अत्यंत जबाबदारीने याठिकाणी विधान करते जर आपण आज या विषयाच्या विरोधात कमिशनर साहेब, आमचा काही सहभाग नसताना टेंडर नोटीसमध्ये कुठेही जनरल बॉडीकडे येण्याची एकही अट नसताना आपण हा विषय जनरल बॉडीकडे आणला आणि याठिकाणी आपण आमच्या मध्येच मतभेद करायला लावलेले आहेत त्यामुळे याच्यामध्ये पुर्णपणे जबाबदारी आपली आहे. आपण परत टेंडरींग करायला पाहिजे या मताशी मी नाही तर तुम्ही सुध्दा आहात परंतु आपण त्यामध्ये टेंडरींग न करता विषय सभागृहात आणला, याठिकाणी सभागृहामध्ये ही तीस-यांदा मिटींग तहकुब आहे, कोरम सुध्दा नाही आणि तुम्ही जो विषय आणला तो १५ वर्षाचा आहे. १५ महिन्याचा नाही किंवा १५ दिवसाचा पण नाही. त्यामुळे या काही विषयांमध्ये आपल्याला निर्णय घेता येणार नाही. तुम्ही जर का असं काही केलं तर निश्चितपणे मी वैयक्तीक तुमच्या नावाने कोर्टामध्ये केस दाखल करेन, धन्यवाद मा.महापौर साहेब.

**मा.अजित गव्हाणे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह महापौर साहेब,सिमाताईंनी अत्यंत कडक शब्दामध्ये म्हणजे त्या सत्ताधारी पक्षाच्या असुन सुध्दा विरोधी पक्षासारखी भूमिका त्यांनी मांडली त्याबद्दल मी त्यांच मनापासून अभिनंदन करतो. माई,मागच्या काळामध्ये सुध्दा सिमाताई प्रत्येक विषयावर अशाच पध्दतीने विरोधी पक्षाची भूमिका मांडत होत्या. या निमित्ताने साडे तीन ते

चार वर्ष मा.महापौर साहेब, तुमच्या सत्तेला झालेले आहेत आणि आयुक्त साहेब,आपलाही कार्यकाळ तेवढाच झालेला आहे. आता मगाशी चर्चा करीत असताना भाऊसाहेब भोईर आणि मी चर्चा करीत होतो भाऊसाहेब भोईर सांगत होते की,मागच्या काळामध्ये ते कॉग्रेस मध्ये होते तेंव्हा राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता याठिकाणी होती आणि आता ते राष्ट्रवादी मध्ये आहेत आणि आता बीजेपीची सत्ता याठिकाणी आहे. बोलता,बोलता त्या म्हणाल्या की,त्यावेळी सुध्दा ते प्रेक्षक होते आणि आम्ही सगळे त्याच्यामध्ये होतो आणि आम्ही बघतोय असं नाही की,आम्हांला कळत नाही प्रत्येक विषय महापालिकेमध्ये जो होतो,स्थायी समितीमध्ये होतो जे काही होतं ते सगळया नगरसेवकांनी किमान जे जुने आहेत त्यांच्याही लक्षात येत आणि नवीन लोकांच्या आता,आता लक्षात यायला लागले आहे. परंतु माई,प्रत्येकाच्या लक्षात यायला लागले आहे की,विषय करताना याच्यामध्ये कोणाचा इंटरेस्ट आहे.कोण याच्यामध्ये सहभागी आहे.मी अनेकवेळा या सभागृहामध्ये बोललो आहे. नामदेवराव,एकनाथराव मी तुम्हांला अनेकवेळा बोललो आहे. तुम्ही जर चुका केल्या तर याचे परिणाम तुम्हांला येत्या निवडणुकामध्ये भोगावे लागतील. ताईंनी मगाशी उल्लेख केला आहे की,आम्ही कितीही गोड बोललो,छान बोललो तरी आम्ही हे साठवून ठेवतोय. विरोधी पक्ष म्हणुन आम्ही साठवुन ठेवतोय आणि महापालिकेच्या निवडणुकीमध्ये १०० टक्के या सगळया गोष्टी पुढे येणार आहेत. किती अती करावं त्याला एक प्रमाण असतं म्हणजे अक्षरशा प्रत्येक विषयाचा अतिरेक झालेला आहे. मा.महापौर साहेब,तुम्हांलाही काही गोष्टी पटत नसतील हे बिच्चारे पक्षनेते होतात एकनाथरावांनी सोडलं आणि नामदेवरावांच्या गळयात बांधलयं हे बिच्चारे फक्त नामधारी आहेत. म्हणजे एक गोष्ट या निमित्ताने सांगतो एक दरोडेखोरांची टोळी असते ती टोळी काय करते दरोडा टाकायला जाते आणि एकाला बाहेर थांबवते शिट्टी वाजवण्यासाठी पोलीस आले की, बिच्चारे आमचे नामदेवराव किंवा एकनाथराव हे शिट्टी वाजवायला थांबलेत माई ही गोष्ट आहे, त्यादृष्टिने घ्या.

**मा.महापौर** –अजित विषय काय चालला आहे ते नामधारी नसून ते सभागृहाचे नेते आहेत. सॉरी म्हणा आणि आपण विषयावर मत मांडा.

**मा.अजित गव्हाणे-** मा.महापौर साहेब, माई,जे खरं आहे ते खरं आहे. नागरीकांना पण माहिती आहे या शहरात काय चाललं आहे. आयुक्त साहेब,हा विषय तर आहेच पास्कोचा विषय या सभागृहात आणला आहे. डॉक्टर तुमच्याकडे मी त्यादिवशी

आलो होतो त्याची माहिती घ्यायला. मागच्या जी.बी.मध्ये निलेश बारणे आणि सिमाताईंनी विषय मांडला आणि याठिकाणी विरोध केला. आज तुम्ही भूमिका घेतली की,हा विषय मंजुर करायचा तो तुमचा अधिकार आहे माई, परंतु सिमाताईंनी काय सांगितलं की, मी कोर्टात जाणार आहे आम्ही पण राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष या संदर्भात पहिलं राज्य शासनाकडं जाणार आहोत. जर तुम्ही अशा पध्दतीने चुकीचा विषय केला तर आम्ही मा.अजितदादांकडे, मा.मुख्यमंत्र्याकड यासंदर्भात दाद मागणार, नाहीतर आम्हीपण हायकोर्टात जाणार या विषया संदर्भात. आयुक्त साहेब,आम्ही तुमचा रिस्पेक्ट ठेवलेला आहे आजपर्यंत विरोधी पक्षात जरी असलो तरी आयुक्तांचा अपमान होईल अशी भूमिका कधी घेतलेली नाही आणि सातत्याने प्रत्येक काम सांगताना तुमचा रिस्पेक्ट ठेवुन काम करणेचा प्रयत्न केलेला आहे. परंतु महापालिकेतल साडेतीन वर्षामधलं प्रत्येक टेंडर हे रिंग असतं अगदी ५ लाखाच्या टेंडर पासून ते १०० कोटी रु.पर्यंत टेंडर प्रत्येक कामामध्ये रिंग होत असते आणि नुसती रिंग होत नाहीतर भागीदारी घेतली जाते. गेल्या ३ ते साडेतीन वर्षामध्ये या महापालिकेचे इतके दुर्देव आहे की, सिमाताई पण बोलल्या आहेत की,आयुक्तांची भूमिका खुप चांगली असते. त्यांचा स्वभाव चांगला आहे.परंतु आयुक्त साहेब,पुर्णपणे दबावाखाली काम करतात. मागच्या महिन्यापासून आयुक्त साहेब मी तुम्हांला भोसरीतील एका कामासंदर्भात फोन करतोय आमच्या भोसरीमध्ये जे काम निघालयं ते काम चुकीचं आहे तुम्ही या कामाच्या संदर्भात आम्हांला आणि नागरीकांना प्रेझेंटेशन द्या. अधिकारी आणि तुम्ही त्याच्यापासून लांबच आहेत. आम्ही विरोधी पक्षाचे नगरसेवक असुन अतिशय प्रेमाने आम्ही आमची भूमिका मांडतोय याच्यामध्ये ज्या त्रुटी राहीलेल्या आहेत त्या त्रुटी तुम्ही समजून घ्या. आणि त्याच्यामध्ये फेरबदल करा आणि मग काम करा परंतु तसं न करता तुम्ही ते रेटून काम चालू केलं आहे. आम्हांला कळत नाही असं नाही आम्हांला प्रत्येक विषय या महापालिकेतला माहिती आहे आणि नागरीकांना पण माहिती आहे. एकही काम असं नाही की ते नागरीकांना कळत नाही. परंतु मांजर डोळे झाकुन दुध पितय त्याला वाटतयं कोण बघत नाही परंतु सगळया शहराला कळतंय या महापालिकेत काय चाललंय आणि आयुक्त साहेब,तुम्ही हे जसं महाभारतामध्ये गांधारीने डोळयाना पट्टी बांधली तसं तुम्ही डोळयांना पट्टी बांधुन तुमची या सगळयांना मुक संमती देताय. तुम्ही स्वभावाने खुप चांगले आहात आम्ही अनेक आयुक्त पाहिलेले आहेत. आयुक्तांनी अनेक निर्णय सभागृहाच्या

विरोधात जाऊन घेतलेले आहेत. स्टँडींग कमिटीने जर एखादया विषयाच्या संदर्भात एकदा,दोनदा,तिनदा निर्णय घेतला नाही, मंजूर केला नाही तर आयुक्तनी त्यांच्या अधिकारात ते विषय मंजुर केलेले आहेत. पण ते नागरीकांच्या आणि शहराच्या हिताच्या संदर्भातले होते. पास्कोला आपण १५ वर्षासाठी काम देता आम्ही पण हाच व्यवसाय करतो. आमचा पण कंन्स्ट्रक्शनचा व्यवसाय आहे. एमपीसीबीची परवानगी कशी मिळते, Consent to Operate कसं मिळतं Consent to Establish कसं मिळतं आम्हांला काय माहित नाही का? त्याची भिती दाखवून तुम्ही आम्हाला त्या ठेकेदाराला काम द्या म्हणताय तुम्ही विषयच तसा आणला आहे की,त्याच कॉन्ट्रॅक्टरला काम कसं द्यावं या भूमिकेतून तो विषय मांडला आहे. आम्ही काय मुर्ख आहोत का? आम्हांला पण कळतयं सगळं टेंडर काढायला किती दिवस लागतात हो. त्यांनी मगाशी सांगितलं की, त्याला ६ महिन्याची मुदतवाढ द्या. आणि ६ महिन्यामध्ये टेंडर प्रोसेसला द्या. निविदा येऊ द्या. स्पर्धा होऊ द्या त्याच्यामधुन ज्याला काम मिळेल त्याला मिळेल. परंतु महापालिकेचं नुकसान करायचं,नागरीकांच नुकसान करायचं सगळयांना अंधारात ठेवायचं ही जी कामाची पध्दत आहे ती अत्यंत चुकीची आहे. आयुक्त साहेब यानंतरचा पण विषय आहे एक व्यक्ती हरीत लवादामध्ये आहे त्याच्यावर पण आम्हांला बोलायचे आहे. पण काही अधिकारी चुकीचं काम करतात आणि त्याला आपण पाठीशी घालतो बदनाम तुम्ही होणार आहे. सत्ता तुमची आहे उद्या काही चुकीचं झालं तर त्याचे परिणाम तुम्हांला भोगावे लागणार आहेत. सिमाताईंनी मागच्या काळातले मुर्त्यांचा विषय काढला आणि तो विषय गाजला प्रत्येक्षात त्याच्यामध्ये नंतर काही तथ्य नाही निघाल परंतु आम्हांला सत्ता घालवावी लागली. आयुक्त साहेब तुमच्या विषयी नगरसेवक किंवा लोक बोलतात खाजगीत की आयुक्तांचे याठिकाणी काही चालत नाही. खाजगीत आज पण बोलतात आयुक्त साहेबांचे काही चालत नाही. आयुक्त साहेब दबावाखाली काम करतात अशा प्रकारची सर्व नगरसेवकांमध्ये आणि परिसरामध्ये चर्चा आहे. त्यामुळे अशा प्रकारे चुकीचा विषय आणुन आमच्यावर लादणार असणार तर आम्हांला १०० टक्के याच्या विरोधात जावं लागणार आहे. आम्ही तुम्हाला सांगितले आहे की,आम्ही काय करणार आहोत. त्यामुळे तुम्ही निर्णय घ्यायचा आहे. आज तुमच्या हातात आहे इथ सभागृहात काय करायच ते परंतु त्याच्यानंतरच मात्र आम्ही ठरवणार आहोत काय करायच ते. त्यामुळे मा.महापौर

साहेब,हा विषय फेटाळून लावा आणि आयुक्त साहेब नव्याने टेंडर काढा त्याला तोपर्यंत मुदतवाढ द्या आणि हा विषय फेटाळून लाव.

**मा.निलेश बारणे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह जसा आपण शिक्षण मंडळाचा विषय फेटाळला तसाच हा विषय फेटाळण्यात यावा आणि नव्याने निविदा काढावी अशी मी आपल्याला नम्र विनंती करतो. खरंतर पास्कोचा विषय १५ वर्षापुर्वी ज्यावेळेस आला त्याच्या आधी ६ महिने या कंपनीची स्थापना झालेली आहे. पास्कोचा साधारणपणे १०० ते १२५ कोटीचा टर्न ओव्हर होतो. मेन काय आहे माहिती आहे का मा.महापौर साहेब, याची सगळी बिले गोळा करण्याचं काम ही आपली महापालिका करते. हे फक्त कचरा उचलून घेवुन जातात आणि महापालिका बिलं काढणे,बिलं टाकणं,बिलं गोळा करणं त्याच काम आपण करतोय आणि त्याचे पैसे आपण त्याला नेऊन देतो. खरंतर त्याला आपण अट क्र.२२ नुसार त्यांनी चांगल काम केलं म्हणुन त्याला काम दिलं पाहिजे. प्रदुषण महामंडळात २.७.२०२० साली जे मिनिटस झाले आहेत त्याच्यामध्ये कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत. मग कुठल्या अनुषंगाने आपण त्यांना काम देत आहोत. पास्कोची प्रकल्पाची क्षमता वाढविण्यासाठी एमपीसीबीने कायदेशीर कारवाई करावी अशी सूचना प्रदुषण महामंडळाने केलेली आहे. तसेच पिंपरी चिंचवडचे एमपीसीबीचे एसआरओ यांनी सांगितले आहे की,बँक गॅरंटी पण जप्त केलेली आहे. हे सगळं असताना पण परत त्या माणसाला काम का द्यायचं याचं टेंडर काढलं नाही जस संदिप वाघेरेनी सांगीत तस याठिकाणी कोणाची वतनदारी आहे का? याच्यामध्ये कोणत्या अधिका-याचे हात ओले झाले आहेत का? १०० ते १२५ कोटी मध्ये कोणाची भागीदारी आहे का? २० ते २५ टक्के आता तरी सध्या हेच चाललं आहे. जसं अजितभाऊंनी सांगितलं, सिमाताईंनी सांगितलं कुठलाही विषय आला की, तो विषय माझा,तो विषय तुझा हे सध्या असंच महापालिकेत चाललं आहे. मी शिवसेना पक्षाच्या वतीने या विषयाला विरोध नोंदवतो.हा विषय मंजुर करु नये, या विषयाचे नवीन टेंडर काढणेत यावे. याच्यामध्ये पालिकेचे पैसे वाचतील,हॉस्पिटलचे पैसे वाचतील, १०० ते १२५ कोटोचा विषय आहे.या विषयाला आमचा विरोध आहे तो नोंदवुन घेणेत यावा अशी विनंती करतो, धन्यवाद.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह खरंतर सिमाताईंनी जो काही विषय मांडला आणि त्याच्यातले जे काही बारकावे होते ते सभागृहाला सांगितले आहे. त्यातला एक महत्वाचा मुद्दा मला जाणवतो तो म्हणजे

आपण हा विषय घेण्यासाठी तुमचं पत्र आहे. म्हणजे आम्ही तुम्हांला इतके मुर्ख वाटतो का हो, आपण इथे लिहीतोय काय की या संस्थेला १५ वर्ष संचलन करण्याची मान्यता देण्यात यावी अशी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. जर या संस्थेची २८/२/२०२० ला मुदत संपली तर आयुक्त म्हणुन तुमची जबाबदारी काय आहे यांनी स्थायीकडे पत्र पाठविल्या शिवाय स्थायीने विषय घेतला का? त्याच्या आदि आयुक्त साहेब हे तुमचं पत्र आहे. मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र दि.२८/२/२०२० तुमचे सुध्दा पत्र आहे यात जर २८ फेब्रुवारीला यांची मुदत संपली तर कमिशनर म्हणुन तुमची जबाबदारी काय होती. ज्या अधिका-यांनी हे पत्र तुमच्यापर्यंत पाठवलं २८/२/२० लाच त्याला जाब विचारायला पाहिजे होता.त्याच्याकडुन लेखी खुलासा घ्यायला पाहिजे होता.जर टेंडरची मुदत २८ फेब्रुवारीला संपत असेल तर राजे आपण काय करताय खुर्ची उबवताय का? ६ महिने आधी टेंडर काढण्याची प्रक्रीया का सुरु केली नाही. साहेब, आणखी दुर्देव म्हणजे आमचे १३३ मुर्खांचे बादशाह आहेत आम्ही सगळे असे वाटायला लागतं. या अधिका-यांची किती डेरींग आहे इथे जे बसले आहेत ना त्यांचा आता शोध घ्या. दया येते साहेब आम्हांला आमच्या बुध्दीमत्तेची. याठिकाणी प्रपत्र अ मध्ये दिलेले आहे की,त्यात त्यांनी किती मेहरबान्या केल्या, किती कष्ट केलेले आहेत आणि एक नाही,दोन नाही,तीन नाही,चार नाही इतक्या परवानग्या मिळवल्या. असं दाखवण्याचा प्रयत्न या सभागृहामध्ये केला आहे. एवढी मेहरबानी, एवढं सविस्तर. दुसरं प्रपत्र ब जर आपण नवीन संस्था नियुक्त करावयाच्या असल्यास पुढील प्रक्रीया कराव्या लागतील व त्या परवानग्या मिळवाव्या लागतील. तुमच काम आहे निविदा राबवणं. तुम्ही फक्त निविदा काढण्याचं आणि ते राबविण्याचं काम करा. तो पुन्हा येईल त्याला नाकारण्याच आमच काही कारण नाही पण त्याला रितसर येऊ द्यानां. तिसरं प्रपत्र क याशिवाय नियुक्त संस्थेस पुढील गोष्टी कराव्या लागतील. तुम्हांला काय घेणं देणं आहे.तुम्हांला काय घेणं देणं आहे साहेब. कुणाला काय करावं लागणार आहे तुम्हांला टेंडर काढायचं आहे टेंडर मधील ज्याअटी/शर्ती टाकायच्या आहेत जी चुक राष्ट्रवादीने त्यावेळी केली ती चुक आमच्या गळयात घालताय आता. त्यांनी जाणीवपुर्वक केली का,कशी केली, का कोणाच्या दबावाखाली केली त्याच्यावर भाष्य करायचं नाही. कारण आम्ही या शहराच्या हितासाठी विरोधी पक्षात असताना सुध्दा बोलायचं आणि आज आता सत्ताधारी पक्षात असताना सुध्दा आमचे विषय तितकेच परखडपणे सभागृहात मांडतो. त्यामुळे विरोधी पक्षात असताना सुध्दा

त्यावेळेस जी आमची भूमिका होती चुकीच्या गोष्टी नाही झाल्या पाहिजेत त्यावेळेला आम्ही सभागृहात बोलायचो आणि आज असं वाटतं की जरी आम्ही सत्तेत जरी असलो तरी चुकीच्या गोष्टी आम्ही सत्ताधारी पक्ष म्हणुन करत नाही तुम्ही आम्हांला करायला लावताय हे आमचं दुर्दैव आहे आमचं आणि म्हणुन तुमच्या निदर्शनास आणुन देतोत की, पहिलं पवन साळवेवर तुम्ही कारवाई करावी त्यांना तुम्ही विचारा २८ फेब्रुवारीला जर मुदत संपत होती तर आपण का टेंडर प्रक्रीया राबवली नाही. आपण त्यामध्ये काय अटी/शर्ती टाकायच्या आहेत त्या शहराच्या हितासाठी आहेत त्या का टाकल्या नाहीत. का तयार केल्या नाहीत साधारणपणे मागच्या जुन २०१९ मध्येच यांची प्रक्रीया पुर्ण व्हायला पाहिजे होती, टेंडर फ्लोट व्हायला हवं होतं. मा.सभागृहास सांगु इच्छिते की, हे वर्षानुवर्षाचं आहे. साहेब,तुम्हांला तुमच्या नोकरीची रिटायरमेंटची डेट माहिती आहे. आम्हांला सगळयांना पण माहिती आहे आम्ही फेब्रुवारी २०१७ मध्ये आलो आणि २०२२ मध्ये आम्ही जाणार आम्हांला पुन्हा परिक्षा द्यायची आणि आलोतर आम्ही परत येणार हे आम्हा सगळयांना माहिती आहे. आता सहा महीन्यात आमच्या सगळयाच्या अंगात यायला लागेल आम्ही सगळेजण आमच्या,आमच्या कामाला लागू आम्हांला आमची डेट कळती तुमचे सगळे अधिकारी  ए टू झेड का आपल्याला कळत नाही की, पालिकेमध्ये एवढया निविदा प्रक्रीया होतात की, किती वेळा तरी मुदतवाढ दिली तरी स्थायी समितीपुढे विषय येतो. निविदा प्रक्रिया वेळेत का राबविली जात नाही. आजपर्यंत आपण किती अधिका-यावरती कारवाई केली. निविद्रा प्रक्रीया संपण्याच्या ६ महिने आधी साहेब,कधी कधी असं वाटतं की,मनामध्ये खंत आणि दु:ख आहे. श्रीकर परदेशी या पालिकेत आले जे आम्ही फेब्रुवारी २०१२ मध्ये निवडुन आलो त्यानंतर ५/६ महिन्यांनी श्रीकर परदेशी साहेब आले त्यानंतर ते कसे आहेत,कसे नाही,खुप खऊट आहेत वगैरे,वगैरे चर्चा होती. परंतु हम किसीके बस की बात नही श्रीकर परदेशी बनना. त्यांची कोणालाही अंगावर घ्यायची मानसिकता होती. जी चुक आहे ती चुक आणि जे बरोबर आहे ते बरोबर आहे जे तुम्हांला दिसतच नसेल,बघायचंच नसेल, तर किमान आम्ही दाखवतोय. ते तरी बघा साहेब, ते तरी बघा. साहेब, हे असे प्रपत्र अ,ब,क काढून तुम्ही आमच्या समोर आणताय. ज्या ठेकेदाराला यायचं आहे तुम्ही त्याच्यामध्ये निविदा अटी/शर्ती टाका आणि त्या पध्दतीने निविदा प्रक्रिया राबवावी  ज्या अधिका-यांनी तुमच्या समोर हे पत्र आणलं आमची दिशाभूल करण्याच प्रयत्न केला त्यांच्यावर तुम्ही  कारवाई करा. निविदा अटी/शर्ती टाकुन

निविदा प्रक्रिया केली नाही तर सिमाताईंनी सांगितले आहे की,आम्ही कोर्टात जाईन. आम्ही काय रिकामे नाहीत तुमच्या चुकांचे आम्ही भागीदार व्हायला. मी पवन साळवे यांना विचारलं की, साहेब त्याचं मंथली बिल किती आहे. साहेब,मी तुम्हांला प्रश्न सरळ,सरळ विचारला आहे. तुम्ही काय सांगता  की त्यांच ३० ते ४० लाख रु.मंथली जे काही असेल ते तिथं तर ३० ते ४० लाख खर्च हा कसा चुकीचा आहे म्हणजे  मला वाटत सिमाताईचं उत्तर देतील  की त्यांना पहिलं १३ कोटी मिळाले नंतर २० कोटी मिळाले मग कसं काय मंथली ३० ते ४० लाख बिलींग  होणार मला त्याच्या हिशोबात पडायचं नाही परंतु मी त्यांना विचारल  काय कंडीशन आहे तर त्यांनी सांगितलं घाईघाईत की,आशाताई त्याच्यातन त्याचा  २० ते ३० टक्के खर्च जातो. तुम्हांला काय करायचं आहे. तो किती खर्च करतो,त्याला किती बेनिफिट मिळतो. आम्ही फक्त विचारलं की त्याच बिलींग किती आहे. मी त्याला किती प्रॉफीट होतो हा प्रश्न तुम्हांला विचारला होता का? जर तो आपल्या महापालिकेमधुन ५ ते १० कोट रु.कमवत असेल तर त्यांनी किमान माझ्या महापालिकेच्या हॉस्पिटलमधील जो बायोगॅस कचरा आहे तो तरी फुकट उचलायला हवा नां. आणि साहेब समजा आपण टेंडर कॉल केल्यानंतर तुम्ही म्हणाल पालिकेला १ लाख रु.देतो,कोणी म्हणेल २ लाख रु.देतो,कोणी म्हणेल १ कोटी देतो पास्कोवाला तुम्हांला म्हणेल ५ कोट रु.देईन  फायद्या तर माझ्या महापालिकेचा होईल. माझ्याच कररुपी नागरीकांचे पैसे महापालिकेच्या तिजोरीत  येणार असतील तर हे असे भ्रष्ट अधिकारी तुमच्याकडचे आहेत. असा आरोप करते साहेब. जो माणुस सगळयांना अडचणीत टाकतोय या,या,या आम्ही कसं करतोय कसं बरोबर आहे साहेब,तुमच्या पापात आम्हांला घेऊ नका. तुम्ही जर हा विषय मंजुर केला तर मी निश्चितपणे सिमाताईंबरोबर कोर्टात असेल परंतु तुम्हांला विनंती आहे की,या पापात आम्हांला सहभागी करु नका. आजही आमचा याठिकाणी विरोध आहे. मा.महापौर साहेब हा विषय मंजुर करु नये. शहराच्या हिताचे जे असेल निविदा प्रक्रिया राबवा यामध्ये पास्को आला तर आम्ही त्याला हाकलून देणार आहे का? वायसीएमच्या मागच्या बाजुला दिवसाढवळया  तिथं कचरा जाळतोय आणि त्याच्या धुराचा तीथल्या नागरीकांना त्रास होतो त्यांच्या तक्रारी आमच्याकडे आलेल्या आहेत. साहेब,या जगात,पृथ्वीवर खुप माणसं आहेत की,जे अशा प्रकारची कामे करतात त्यांनाही येऊ दे त्यामध्ये पास्को आला तरी आमचा त्याला विरोध नाही. तुमची विषय मांडण्याची जी पध्दत आहे आणि अधिका-यांची जी मुजोरी

वाढलेली आहे  या पालिकेमध्ये ते आता बंद करा साहेब. आता आमच्या पण डोईजड होत चालल्या आहेत सगळया गोष्टी तुम्हांला कुठं तरी थांबवण्याची वेळ आम्हांला आलेली आहे. मा.महापौर साहेब,आपण हा विषय मंजुर करण्यापुर्वी निश्चितपणे विचार करावा. अन्यथा  कोर्टात जाण्याची वेळ माझ्यावर देखील येणार आहे.

**मा.राजु मिसाळ** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह  या पास्कोच्या विषयावर सिमाताई,अजितभाऊ असतील माई, जे काही चाललयं ते सर्व सभागृहाच्या समोर आलं आहे. आताच सिमाताई तुम्ही जे बोललात की, खरचं हा विषय आपल्या माथ्यावर मारायला यायलाच नाही पाहिजे. साहेब,तुम्ही ज्यावेळेस असा विषय सभागृहा समोर घेवुन येता. १५ वर्ष झाली साहेब याला काम देवुन १५ वर्षाची मुदत संपत असताना त्याची निविदा का काढली नाही. साहेब,त्यांच्यावर तुम्ही कारवाई केली पाहिजे. आज त्यांच्यावर काही तरी कारवाई झाली पाहिजे. तुम्ही त्या शिक्षण समितीच्या शिंदे मॅडमला फक्त एक शोकॉज नोटीस दिली त्या नोटीसवर परत काय झालं आहे. फक्त शोकॉज नोटीस त्याच्या पुढं काहीच नाही नां म्हणुन मी मगाशी म्हणलं की,त्यांच्यावर सुध्दा कुठल्या एखादया मोठया नेत्याचा वरदहस्त आहे का? ते पहिलं चेक करा. तसंच यांच्यावर सुध्दा कोणाचा वरदहस्त आहे का ते पण चेक करा. साहेब,तुम्ही मगाशी  सिमाताईंना म्हणालात की, या विषयाच्या बाबतीत निर्णय घेण्यासाठी जी.बी.समोर विषय ठेवला आहे. साहेब,तुम्ही आम्हांला कशाला पापाचे धनी करताय?  या कामासाठी निविदा काढून जर यापेक्षा एखादा चांगला कॉन्ट्रॅक्टर येणार असेल तर आपण त्याला का पोसलं पाहिजे. मगाशी अजितभाऊ म्हणाले की, माईंना थोडस खटकलं  खरंच हा डाका घालण्याचं काम चालू आहे साहेब, त्याच्यामध्ये कुठलाही शब्द चुकीचा नव्हता. माई कधी,कधी काय होतं माहिती आहे का? माई तुम्ही जर चांगल काम केलं तर तुमचं आम्ही कौतूकच करणार आहोत. म्हणजे चुकीचं काम होणार  असेल तर ते आम्ही होऊ देणार नाही. साहेब,तुम्ही टेंडर काढता त्यामध्ये नियम अटी बनवता आणि या नियम अटी बनवताना डोळयासमोर टार्गेट ठेवुन बनवल्या जातात. हे मी तुमच्या नजरेसमोर आणुन  दिलं आहे. मी तुमच्या शाजगी मध्येही बोललो की काही अधिकारी  महिन्याला किती पैसे घेतात. ते कुणा मार्फत कसे जातात एवढच फक्त तुम्हांला समोर आणून दयायच बाकी राहील. तुम्ही यांची चौकशी लावा हे ज्यावेळेस या महापालिकेत रुजू झाले त्यावेळेस यांची प्रॉपर्टी काय होती आणि आता यांची

सर्व्हीस १०/१५ वर्ष झाल्यानंतर यांची प्रॉपर्टी किती आहेत याची चौकशी करा. आपल्या महापालिकेतील अधिका-याचा मुलगा याच महापालिकेत ठेकेदारी कसा करु शकतो साहेब. मी तुम्हांला प्रु करुन देवु शकतो. मोठया ठेकेदाराला पकडायचं त्याच्या प्लान्टला पार्टनर व्हायचं आणि हे सगळं सेटींग मध्ये काम चालू आहे. इथं जो खरा कॉन्ट्रॅक्टर आहे ज्यांने महापालिका घडवण्यामध्ये या शहरामध्ये जी काही डेव्हलपमेंट बघतोय ते त्या डेव्हलपमेंटमध्ये त्या प्रत्येक कॉन्ट्रॅक्टरचा काही ना काही वाटा आहे आणि त्याच्यामुळे हे झालेले आहे. या सर्व काही गोष्टी संगनमताने होत आहेत. या संगमनमताला तुम्ही कुठतरी थांबवणार आहेत की नाहीत. जसं सिमाताई म्हणाल्या की, अधिका-याची पाठ फिरल्यानंतर त्यांच्या बाबतीत वाईट बोललं जातं. आयुक्त साहेब,तुम्ही स्वभावाने खुप चांगले आहात मला पण पंधरा वर्षे झाले या सभागृहामध्ये. आम्ही सर्व ब-यापैकी सिनियर मंडळी याठिकाणी बसलेलो आहोत. मगाशी ताईनी श्रीकर परदेशीच नाव घेतल. साहेब, हे नाव कधी निघतं की एखाद चांगल काम झालतर ते चुकीचे न होवू देता त्या आयुक्तांनी त्या कामाला कोणाच्या दबावाला बळी पडलेले नाहीत. साहेब,हे कुठे तरी थांबणार आहे की, नाही. आम्ही या महापालिकेत येतो ना त्यावेळेस वरचा फ्लोअर पाहतो ना मग ज्या त्यावेळी काय होतं ते सगळ वेगळं दिसतय साहेब. आयुक्त साहेब, आपण हा विषय चुकीचा आणलेला आहे त्याला फार ३ महिन्याची मुदतवाढ द्या. आणि ३ महिन्याच्या मुदतवाढीमध्ये याचे टेंडर काढावे लागेल आणि तुम्ही याच व्यक्तीला दिलतर आम्हांला जे काही करायच आहे ते आम्ही तुम्हांला बोलून दाखवणार नाही. आम्हांला कोर्टाचे पर्याय आहेत आम्ही नक्कीच त्याचे दरवाजे ठोकू आयुक्त साहेब,मला तुम्हांला पुन्हा एकदा विनंती करायची आहे की, ज्या अधिका-यांनी या कामाची मुदतवाढ संपायच्या आत टेंडर का काढलं नाही त्या अधिका-यावर तुम्ही कारवाई करणार की नाही, नाही तर आम्हांला तुमच्या ऑफिसच्या समोर धरणं आंदोलन करावं लागेल. या कामाचं टेंडर का काढलं नाही त्यांच्यावर तुम्ही कारवाई करावी. माई, मी या विषयावर मतदान घ्या असं म्हणलं नाही हा विषय फेटाळून लावणेत यावा अशी सूचना केली आहे. आणि माई,आम्हांला तुमच्याकडनं अशी अपेक्षा आहे की,ज्या अधिका-याने ठेकेदाराला डोळयासमोर ठेवुन त्याचा हेतू सिध्द करीत असेल तर मा.महापौर साहेब,तुम्ही आयुक्तांना आदेश देवु शकता ज्या माणसाने याचे टेंडर काढले नाही त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे आणि हा विषय फेटाळून लावणेत यावा.

**मा.राहूल कलाटे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आयुक्त साहेब,आपल्या सर्वांच्या कृपेने सर्वजण पास्को,पास्को करतात. हा विषय स्थायी समितीकडुन तुमच्याकडे आला आहे. साहेब, या विषयाच्या बाबतीत शंका येण्यासारखं आहे कारण स्टँडींग रात्री १० पर्यंत चालली आहे आणि विषय स्टँडींगमध्ये ऐनवेळचा विषय होता. आणि रात्री ९ ते १० वा.विषय घेतला होता. त्यावेळेस देखील आम्ही म्हणले की हे कशासाठी करताय साहेब,या विषयाला तर आमचा पहिल्यापासून विरोध आहे. त्या पास्कोला १०० कोटी मिळो, २०० कोटी मिळो तुम्ही तुमची कायदेशीर बाबीची पूर्तता करा. त्याची एवढी काळजी तुम्हांला का? आताच अजितभाऊंनी आणि संदीप वाघेरे यांनी सांगितलं या परमीशन काढण याच तुम्हांला का टेन्शन आहे. का त्यांनी सांगितल आहे का, की,हे असं,असं ताणुन धरा,कोण परवानगी काढणार,काय करणार साहेब,त्यांनी १५ वर्षामध्ये त्यांनी आपल्याकडे १०० कोटीचं बिलींग केलं आहे. आणि आपल्याला नक्की करायचं काय आहे. ही महापालिका म्हणजे काही लोकांची ठेकेदारी झाली आहे का? प्रत्येक गोष्टीत आहे नां कधी,कधी किळसवाणं वाटतयं हे काम याचं,ते काम त्याचं सिमाताईंनी सांगितलं ना साहेब, एकदम डेंजर आहे. तांबे साहेब आणि ताई यांच्यामध्ये चर्चा झाल्यानंतर त्या ठेकेदारांचा त्यांना फोन का जातो आणि आता आम्ही शंका कोणावर घ्यायची. तुमच्यावर घ्यायची का तांबे साहेबांवर घ्यायची साहेब, हे सगळं डेंजर आहे. म्हणजे तुम्ही काय खाया पिया कुछ नहीं ग्लास फुटा बारा नही अशी तुमची परिस्थिती आहे. आम्हांला चांगल माहिती आहे तुम्ही काय करत नाही. पण कुठं तरी मुकसंमती देणं हे भ्रष्टाचारापेक्षा डेंजर आहे. भले हे साळवे साहेब करीत असतील पण आयुक्त साहेब तुम्ही बदनाम होणार आहात हे लक्षात घ्या. १५ वर्ष तुम्ही या पास्कोला पोसला आहे जस हे म्हणतात तो काळा आहे की गोरा हे कोणाला माहिती नाही. राष्ट्रवादीनी चुक केली त्यावेळेस तो विषय शहराला नवीन होता आता तर नवीन नाही. आता तुम्ही त्याला १०/१५ वर्ष पाहिलं आहे तो काय करतोय, आयुक्त साहेब,तुम्ही यामध्ये कॉम्पीटीशन करा. साळवे साहेब,तुम्ही यावर का कारवाई केली नाही. साहेब,माझी पण शिवसेना पक्ष म्हणून आपल्याला विनंती आहे की, याला ३ महिने ६ महिने मुदतवाढ द्या आणि याचं तुम्ही फेर कॉम्पीटीशन करा, टेंडर करा म्हणजे त्याला हे असं थेट पध्दतीने १५ वर्षा त्याला पैसे कमवायला संधी देणं ही पब्लिक प्रॉपर्टी आहे आणि आपण सगळे विश्वस्त आहोत आणि आपणच जर का त्याला अशी मुकसंमती देत बसलो तर

निश्चित या शहरात काळीमा फासणार आहे. या शहरात मुर्ती घोटाळयामुळे सत्ता बदल झालेला आहे. तो घोटाळा झाल्यानंतर त्याचा अहवाल पण आला या महापालिकेत मागच्या ५ वर्षात काय चाललंय, काय नाही हे सगळं ओपन सिक्रेट आहे. माई,हा विषय स्टॅंडींगला रात्री ९ वाजता विषय आला होता. हा विषय स्टॅंडीगच्या विषयपत्रिकेवर आलेला नव्हता आणि ती स्टॅंडींग जुन्या चेअरमनची शेवटची मिटींग होती. त्यानंतर यावर दोन वेळा चर्चा झाली कशासाठी तुम्ही आग्रह करताय जर या सभागृहाची मान्यता नाही तर तुम्ही का आग्रह करताय की यालाच टेंडर द्यायचं आता हे तुम्हीच सांगितलं आहे नां जर आयुक्तांना त्याच काम चांगल वाटलं तर  पास्कोनी ५.५० ला  गॅरंटी सबमिट केलेली नाही त्यामुळे त्याची ४ लाखाची बॅंक गॅरंटी जप्त करणार आहे. याशिवाय त्याची दुप्पट रक्कम म्हणजे ८ लाख रु.बॅंक गॅरंटी देण्यास सांगितले आहे. पास्कोवर एमपीसीबीने कारवाई करावी म्हणुन सांगितले आहे. त्याची बॅंक गॅरंटी नाही. म्हणजे हे चाललयं काय? साहेब,तुम्हांला असं काय चांगल वाटलं की, हा,एकदम चांगला आहे आणि त्याच्यासाठी अट शिथिल करावी. साहेब,याबाबतीत तुमच्यावर कोणाचा प्रेशर आहे का? त्याच या सभागृहात नांव सांगा मला पण त्यादिवशी बिल्डींग परमीशनच्या संदर्भात अधिका-याचा फोन आला प्रेशर आहे मला कंम्पलिशन द्यावं लागेल. मी त्याला म्हणलं त्यांच पत्र घे,ज्याचा प्रेशर आहे त्याच पत्र घे आणि ते पत्र त्या फाईलला लाव तसं तुंमच्यावर जर कोणाचा प्रेशर असेल तर त्याच पत्र घ्या नां, लावा फाईलला म्हणजे उद्या आम्हांलाही दाद मागता येईल. कारण मागच्या प्रकरणात आम्ही अनुभवलं आहे. तुम्ही लक्षात घ्या मागच्या प्रकरणात तुम्ही अचानक तुम्ही भ्रष्टाचारी झाले हे मी नाही एका पोर्टलवर बातमी आली होती. याचा खुलासा योग्यवेळी माई,पक्षनेते करतीलच हे पोर्टलवर बातमी होती. आयुक्त भ्रष्टाचारी अरं.... काही खरं नाही म्हणजे साहेब,तुम्ही असं काम केलं ना हे उद्या तुमच्यावरच बिल फाडतील सगळं सगळे हात वर करणार आहेत कोणी अंगावर घेणार नाही. फाईलवर कुठंही आमच्या पुढा-याचा संबंध येत नाही. फाईलवर तुम्ही आणि तुमचे अधिकारी आणि साळवे  साहेब आहेतच नां साळवे  साहेब तुम्ही वर्षभर टेंडर का काढलं नाही कारण तरी सांगा. या कामाचं डॉकेट तरी तयार आहे की, नाही. आज या सभागृहात ठरलं तर उद्या पब्लिश होईल असं आहे  की नाही साहेब,मी तुम्हांला शिक्षण मंडळाच सांगितलं तुमची मान्यता नसताना पत्र दिलं तुमची यांना मान्यता होती का? वर्षभर टाईमपास करा  साहेब,हे जे  काही चाललंय ते दुर्दैवी आहे. या

शहराचे नागरीकच ज्याची त्याला जागा दाखवतील आणि हे प्रत्येकाला सामोरे जायचं आहे. आणि तुम्ही हे जर केलं नाही केलं तर आम्हांला सर्वांना सामोरे जायचं आहे. सर्वपक्षीयांना जनतेसमोर जायचं आहे. त्यांनाही उत्तरं द्यायची आहेत. कुठं तरी अशा या भ्रष्टाचाराला पाठीशी घालू नका माई आपल्याला विनंती आहे की, आपण सर्वांना आई सारख्या आहात तुम्ही अशा काही चुकीच्या गोष्टी आयुक्तांवर लादु नका तुम्ही पास करुन पाठवलं तर आयुक्त ते मंजुर करतात की नाही हे बघा आणि आयुक्तांनी हे मंजुर केलं तर आम्हांलाही कायदयाचे दार ठोठावे लागतील. इथ शिवसेना पक्ष आहे, राष्ट्रवादी पक्ष आहे आणि कर्म सहयोगाने तुम्हांलाही माहीती आहे की मागच्या प्रकरणात काय झालं हे तुम्हांलाही माहिती आहे आणि सिमाताईंनी तर तुम्हांला सांगितलं आहे की, कोर्टातच जाणार आहे. साहेब,हे जे काही महापालिकेत चाललं आहे ते अत्यंत दुर्देवी आहे. मागच्या १५ वर्षाचं त्याला काम दिलं होतं आणि पुढच्या १५ वर्षामध्ये त्याला २०० ते २५० कोटी कमवायची त्याची व्यवस्था करायची असेल तर निश्चित तुम्ही करु शकता या शहराचे नगरसेवक,नागरीक म्हणुन आमचा याला विरोध आहे. कारण हा जनतेचा पैसा आहे तुम्ही काय तुमच्या खिशातून देत नाही. प्रत्येक गोष्टीत प्रायव्हेटेशन झालेलं आहे. म्हणजे कुठे कॉम्पीटीशनच करायचं नाही. वद्या असु,दसर असु,बुटाड असु, आणि आता तर कचरा पण असु त्या मागच्या कच-यावर पण माझी ४ पत्रं आहेत सर्वपक्षीय चर्चा घ्या म्हणुन माई,माझी तुम्हांला विनंती आहे परत पत्र देतो तुम्हांला या कच-यावर पण या सभागृहात चर्चा घ्या. पुर्वी किती कचरा होता,आता किती कचरा आहे, पुर्वी किती पैसे द्यायचो आता किती देतोय.म्हणजे हे सगळं दुर्देव आहे ओपन सिक्रेट आहे. फक्त आयुक्त आणि माईकडनं अशी चुक होऊ नये की जेणेकरुन न्यायालयाने ताशेरे ओढू नये. उद्या राज्य सरकार सुध्दा हस्तक्षेप करेल.माई,माझी तुम्हाला विनंती आहे की पक्ष म्हणून, या विषयाला आमचा विरोध आहे. याला ६ महिन्याची मुदतवाढ द्या सर्व गोष्टीची तयारी करा आणि मग टेंडर पब्लीश करा. तोपर्यंत या ठेकेदाराला ६ महिन्याची मुदतवाढ द्या याला आमची काही हरकत नाही परंतु ६ महिने किंवा टेंडर प्रक्रीया जे लवकरात लवकर होईल ते आयुक्त साहेब,तुम्ही मुदतवाढ देताना जे लवकरात लवकर होईल ते अशा प्रकारे ही निविदा प्रक्रीया राबवावी या ठेकेदाराला १५ वर्षासाठी काम देण्यास आमचा शिवसेना म्हणुन विरोध आहे. धन्यवाद.

**मा.नामदेव ढाके** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह खरं म्हणजे या विषयाच्या संदर्भामध्ये बरीच चर्चा झाली आहे. मी काय जास्त खोलात जाणार नाही मला असं वाटतयं की,आणि साळवे साहेबांनी सांगितल आहे की, २००५ ते २०१३ पर्यंत कशा कशा पध्दतीने त्याला सवलत दिली खाजगी डॉक्टरांच्या संस्थाच्याकडनं त्याला कशा पध्दतीने दिले. त्यामुळे महानगरपालिकेवरती दरमहा ६ लाख रु.ची आपल्याला त्याठिकाणी खोट बसली त्यानंतर २०१३ ते २०२० पर्यंतच आपण त्याला कशा प्रकारे पैशाची आकारणी केली. आणि आजतागायत आपण त्यांना जे पैसे देतो आणि खाजगी हॉस्पिटलकडनं आपण जे पैसे आकारतो ते जवळपास आज महानगरपालिकेवरती कुठल्याही पध्दतीनं त्या पास्कोच्या संदर्भामध्ये याठिकाणी कुठलीही तक्रार नाही. पैसेही म्हणुन आपल्या महानगरपालिकेवरती दायित्व आलेले नाही. किंवा बर्डन आपल्यावरती आलेलं नाही. सन्मा.महापौर मला याठिकाणी आपल्याला विनंती करायची आहे की, खरं म्हणजे याठिकाणी आयुक्तांच्या बद्दल बोललं आयुक्त चांगले आहेत,आयुक्तांनीच याठिकाणी विषय आणलेला आहे. आयुक्तांनी विषय का आणला याचं स्पष्टीकरण प्रपत्र अ याठिकाणी सोबत दिलेलं आहे. डॉ.साळवेच्या माध्यमातून याठिकाणी या विषयाच्या संदर्भमध्ये त्यांनी खुलासा करण्याचा प्रयत्न केला आहे. गेल्या १५ वर्षामध्ये त्यांनी कशा पध्दतीने त्यांनी याठिकाणी एमपीसीबीची परमिशन कशी घेतली त्यानंतर ईसीईची परमीशन कशी पध्दतीने घेतली यासंदर्भामध्ये मी आता खोलात जाणार नाही. परंतु आज जर आपण बघीतलं तर एक मात्र याठिकाणी कबुल केलं पाहिजे इतर महानगरपालिका किंवा आपली महानगरपालिका यामध्ये जैवीक कचरा किंवा बायोमेडीकल,बायोवेष्ट त्यासंदर्भामध्ये हा पास्को आपला कोण लागुन गेलेला नाही. परंतु पर्यावरणाच्या संदर्भामध्ये जी नियमावली आलेली आहे. एमपीसीबीच्या संदर्भामध्ये जी नियमावली याठिकाणी आलेली आहे. आणि विशेष करुन या बायोवेष्टच्या संदर्भामध्ये परत नियमावली याठिकाणी आलेली असताना,एमपीसीबीचे नवीन नियम याठिकाणी आलेले असताना गेल्या १५ वर्षामध्ये त्यांनी सांगितल्याप्रमाणे आज त्यांनी जे अँग्रीमेंट केलेल आहे त्यासंदर्भामध्ये आज खुलासा डॉ.पवन साळवेच्या माध्यमामधुन याठिकाणी केलेला आहे. आणि अजितभाऊ आम्ही कुठल्याही दबावाखाली किंवा नामधारी नाही. स्वत:चं व्यक्तीमत्व स्वत:चे विचारधारा याठिकाणी आम्ही मांडणार महानगरपालिकेच याच्यामध्ये काय हित आहे. गेल्या अनेक वर्षापासून आपल्याच काळामध्ये हे पास्कोचं पिल्लू राष्ट्रवादीच्या

काळामध्ये उत्पन्न केलेलं आहे. मी पक्षावर बोलणार नव्हतो पण आपण याठिकाणी उल्लेख केला की,तुमचे सगळे काऊंटडाऊन आम्ही याठिकाणी करतोय लोकांच्या जनतेमध्ये कोण काय काम करतोय,कोणी किती केलं १० वर्षामध्ये याठिकाणी टेंडरच्या संदर्भामध्ये किती बिलो झाले दरवर्षीच्या स्टँडींगची जर का बिलो काढली तर मागचे चार वर्ष आणि येथून चार वर्ष स्टँडींगमध्ये किती बिलो आहेत ते आताची आहेत का? यासंदर्भामध्ये आपण समोरासमोर बसु शकतो आणि चर्चा करु शकतो. परंतु त्यावर मला याठिकाणी बोलायचं नाही. कारण आकडेवारी ही स्टँडींग कमिटीच्या माध्यमामधुन याठिकाणी आहे. मा.महापौर साहेब,याठिकाणी हा चांगला विषय आहे. महानगरपालिकेच्या हितासाठी एकही तक्रार याठिकाणी आलेली आहे का? ते विचारा आज पास्कोच्या संदर्भामध्ये ही संस्था  काम करीत असताना बायोवेष्ट संदर्भामधुन किंवा हॉस्पिटलच्या माध्यमामधुन आणलं जातयं सन्मा.आयुक्तांच्या संदर्भामध्ये याठिकाणी अँग्रीमेंट मधील अट क्र.२२ मध्ये म्हणलेलं आहे की, हा प्रोजेक्ट राबवला आहे त्याच काम बघावं आणि त्याला त्याठिकाणी वाढ करुन द्यावी हा अधिकार आयुक्तांना आहे असे ताईंनी सांगितलं आहे. आणि आयुक्तांनीच हा विषय याठिकाणी दिलेला आहे. आणि आयुक्तांनी ज्यावेळेस हा विषय दिला त्यावेळी एखादया ठेकेदाराला जास्त वर्षासाठी तरतुद करायची असेल तर ७२ (ब)  च्या नुसार तुमच्या याच्यामध्ये म्हणलेलं आहे की, १५ वर्ष किंवा नव्याने निविदा काढणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७२ ब नुसार, सोबत जोडलेल्या प्रपत्र क व ड चे अवलोकन होऊन याबाबत योग्य तो निर्णय व मान्यता मिळणेकामी सदर प्रस्ताव मा.महापालिका सभेकडे सादर करणेत आलेला असुन याबाबत विनंती आहे. ७२ (ब)  नुसार हा विषय जनरल बॉडीला घ्यावा लागतोय तर मला सांगा आयुक्त साहेब या ७२ (ब)  च्या अनुषंगाने किंवा १५ वर्षामध्ये त्या पास्को कंपनीनं मागच्या कोवीडच्या काळामध्ये सुध्दा एवढया मोठया प्रमाणात बायोमेडीकल जमा करीत असताना  एक तरी तक्रार आली का साहेब या महानगरपालिकेला एमपीसीबीची किंवा पर्यावरणाच्या संदर्भात एक तर तक्रार प्राप्त झाली का? ते विचारा, साहेब तुम्ही सांगा हो, त्या संदर्भात एक तरी तक्रार आली का? आणि जर यासंदर्भात मला याठिकाणी सांगायचं आहे की, यामध्ये आपण हा विषय असं कुठं तरी आर्थीक याच्या संदर्भात नाही,कोणाच्याही हितसंबंधामध्ये नाही या पास्कोच्या संदर्भामध्ये उद्या टेंडर काढलं टेंडरच्या संदर्भामध्ये अजितभाऊ तुम्हीच त्यावेळेला अँग्रीमेंट करुन दिलं आम्ही नव्हतो

त्यावेळेला अट क्र.२२ याच्यामध्ये म्हणलेलं आहे आणि त्यानुसार त्यांनी चांगलं काम केलेलं आहे आणि त्यासंदर्भामध्ये याठिकाणी हा विषय मांडलेला आहे. मा.महापौर साहेब, मला या संदर्भामध्ये कुणाच्याही वरती आपण कुणीही बोलणार की याच्यामध्ये कोणाचे आर्थीक लागेबांधे आहेत का? काय संबंध आहे आर्थीक लागेबांधी असण्याचा त्या टेंडरला ६ महिन्याची स्टॅण्डींगमध्ये मुदत दिलेली आहे. त्यानंतर हा विषय आणलेला आहे. सन्मा.महापौर,सन्मा.आयुक्त साहेब मला वाटतं हा जो काही विषय आहे तुम्ही तुमच्या पध्दतीनं ७२ (ब) नुसार महापालिका सभेसमोर आणलेला आहे. आकडेवारीच्या संदर्भात खुलासा केलेलाआहे. समर्थन करण्यासाठी याठिकाणी अजिबात उभा नाही. राजकारण करीत असताना यामध्ये महापालिकेचं या संस्थेचं हित याच्यामध्ये आहे. या संस्थेच्या माध्यमातून पर्यावरण किंवा एमपीसीबीच्या माध्यमातून कुठलीही तक्रार याठिकाणी आलेली नाही. कुठल्याही प्रकारचा दंड याठिकाणी झालेला नाही. आपण इतर ठिकाणचा तुलनात्मक जर का विचार केला तर या कामाच्या संदर्भामध्ये सकारत्मकता आहे. आणि अॅग्रीमेंटच्यामध्ये म्हणल्यानुसार, आयुक्त साहेबांनी सांगितल्यामुळे हा विषय याठिकाणी आलेला आहे. सन्मा.महापौर साहेब,मी आपल्याला याठिकाणी विनंती करतो की, याठिकाणी कोणी आरोप केला असेल पैशाच्या संदर्भामध्ये,आरोपाच्या संदर्भामध्ये मी त्याच विखंडण करतो महापालिकेचं पास्कोच्या संदर्भामधुन जे काम चालू आहे त्यांच्या गाडया त्याठिकाणी फिरतात,कलेक्शन होतआहे. अशा २००५ ते २०१३ मध्ये आपल्याला प्रति महिना आपल्याला ६ लाख रु. हे सुध्दा सांगितलं की त्यावेळेला डॉक्टरांच्या किंवा खाजगी संस्थांच्या विनंतीनुसार त्यावेळी तो आलेला आहे. परंतु आज त्यांनी सांगितलं आहे २०१३ ते २०२० च्या काळामध्ये आपल्याला त्याला जवळपास २१ कोटी रु.देणं लागतय आणि त्याच्याकडुन २० कोटी ९३ लाख रु.आपल्याला मिळालेले आहेत. आपल्याला त्याच्यामध्ये कुठं बर्डन जातयं हा विषय कोणाच्याही स्वार्थासाठी नसून हा विषय पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या बायोवेष्टच्या संदर्भामध्ये सगळयांच्या हिताचा आहे. आपल्या दवाखान्याचे मागच्या काळामध्ये आपण बघितलेलं असल आपण इतर महानगरपालिकेतील दवाखान्याच्या बाहेर कच-याच्या कुंडया असतात,बायोमेडीकल वेष्टचा कचरा त्याठिकाणी असतो. आपल्या महानगरपालिकेच्या दवाखान्यातील कच-याच्या संदर्भात कुठलीही तक्रारा याठिकाणी आलेली नाही. म्हणुन सन्मा.महापौर साहेब,मी आपल्याला विनंती करतो की, आयुक्तांनी याठिकाणी उल्लेख केला की,

आपण जर का समजा आयुक्त म्हणले की, हे नियमानुसार हा विषय याठिकाणी येत नाही हा विषय करु परंतु जर का साहेबांनी सांगितल्यानुसार ७२ (ब) च्या नुसार मा. महापालिका सभेसमोर हा विषय आणलेला असेल तर हा विषय सन्मा.महापौर साहेब, हा विषय कोणाच्याही स्वार्थासाठी नसून महापालिकेच्या बायोवेष्टच्या कलेक्शनच्या संदर्भात हा विषय असल्यामुळे सन्मा.महापौर साहेब,हा विषय आपण याठिकाणी मंजुर करावा अशी विनंती करतो. त्यापुर्वी या विषयाच्या संदर्भामध्ये आयुक्तांना खुलासा करण्यास सांगावे.

**मा.आयुक्त –** सन्मा.महापौर,सन्मा.सभागृह आता बायोमेडीकल वेस्ट यासंदर्भामध्ये जो पीपीपी पार्टनर महानगरपालिके सोबत २००६ पासून महानगरपालिकेसोबत कार्यरत आहे. मे.पास्को यांच्या संदर्भात जे विषयपत्र प्रशासनाच्या वतीनं स्थायी समिती मार्फत सादर केलं होतं त्यावरती निर्णय घेण्यासाठी सविस्तर चर्चा झालेली आहे. डॉ.साळवे यांनी खुलासा सादर केला आहे मात्र परत एकदा मी काही बाबी सभागृहासमोर उचित निर्णय व्हावा याकरीता उद्दत करु इच्छितो. पहिल्या प्रथम मी काही गोष्टी स्पष्ट करु इच्छितो की, याच्यामध्ये कुठल्याही ठेकेदारास लाभ मिळवून देणे किंवा कोणाच्या व्यक्तीगत स्वार्थासाठी ही गोष्ट करणे ही बाब या निर्णयामागे अभिप्रेत नाही आणि ती असताही कामा नये. २/३ गोष्टी निश्चितपणे प्रशासनाच्या वतीने देखील मान्य कराव्या लागतील की ज्या मी सुरुवातीलाच करतो आणि यासाठी थोडस या करारनाम्याच्या पुर्वपिठीकडे आपल्याला जावं लागेल. करारनामा साधारणपणे २००५-०६ मध्ये करण्यात आलेला होता. जो की,१५ वर्षासाठी करणेत आलेला होता आणि १५ वर्षाच्या कालावधीमध्ये आपण जी मुळ जागा घेतलेली होती ती वायसीएमएच येथे हा प्लँन्ट निर्माण करणेत आलेला होता. त्याच ऑपरेशन करुन ५ वर्षानंतर ही जागा अन्यत्र हलवणं अभिप्रेत होतं तशा स्वरुपाचे निर्देश होते. त्याकरिता २०१२ मध्येच ही जागा वायसीएमएच मधुन हलवून अन्यत्र कुठले तरी योग्य सुनियोजित ठिकाणी स्थलांतरीत करणं या कंत्राटामध्ये अभिप्रेत होतं. त्या स्थलांतरासाठी करावा लागणारा सर्व खर्च हा देखील त्याच कंत्राटदारानं करणं अपेक्षित होतं. ही प्रक्रिया करण्यासाठी २०१२ मध्ये सुरु करण्यात आली २०१२ मध्ये सुरु झालेल्या प्रक्रियाची सविस्तर माहिती डॉ.साळवे यांनी दिली की ज्याच्यासाठी ॲक्च्युअल ईसी आपल्याला १४ जानेवारी २०२० रोजी प्राप्त झालेली आहे. निश्चितपणे या प्रक्रियेमध्ये झालेली दिरंगाई सकृतदर्शनी दिसुन येते. आणि यात जे कोणी जबाबदार असतील त्यांची चौकशी करुन कारवाई

निश्चीतपणे करण्यात येईल याची ग्वाही सर्वप्रथम मी सभागृहाला देतो. दुसरी महत्वाची गोष्ट अशी आहे की, हा करारनामा फेब्रुवारी २०२० अखेर संपणार आहे.याचाच अर्थ तो आता संपलेला आहे. ज्यावेळेला ही बाब माझ्या निदर्शनास आली गेल्या वर्षी या कंत्राटदाराच्या संदर्भामध्ये माझ्याशी प्रशासन विभागाच्या संबंधित अधिका-यांनी चर्चा केली. त्यावेळेला आपल्या सर्वांच्या मतानुसार माझी पहिली भूमिकाही तात्काळ निविदा प्रक्रीया सुरु करण्याच्या अनुषंगानेच होती. आणि तशा प्रकारचे निर्देश आपले ट्रान्झक्शन अँडव्हायझर केपीएमपी यांना देण्यात आलेले होते. आणि केपीएमपी कडुन निविदा प्रक्रीया करण्यासाठी जे काही आरएमपी डाक्युमेंट तयार करावे लागतील अशा सूचना देण्यात आलेल्या होत्या. दरम्यान या प्रक्रियेचा वेळोवेळी आढावा घेण्यासाठी बैठका घेण्यात आल्या. या बैठका घेताना काही बाबी ज्या समोर आल्या त्यामुळे हा निर्णय घेण्याची गरज पडली त्या बाबी मात्र या सभागृहाला ज्यांना निर्णय घ्यायचा आहे त्यांच्या समोर आणण्यासाठी सविस्तर विषयपत्र दाखल करण्यात आलेलंआहे. पहिली गोष्ट आपल्याला लक्षात घेतली पाहिजे की आपल्याला बायोमेडीकल वेस्ट डिस्पोझल रुल्स २०१६ नुसार कारवाई करणं अभिप्रेत आहे. त्या अनुषंगाने आपल्याला नव्यानं प्लांन्ट निर्माण करावं लागणार आहे. ज्यावेळेला आपण निविदा प्रक्रीया पूर्ण करु, निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर करारनामा होऊन फायनान्शियल क्लोजर करुन ती सगळी प्रक्रीया कंन्स्ट्रशन प्रोसेस साधारणता १२ महिने ते १८ महिन्याची असु शकते जर सगळं सुरळीत झालं तर आणि त्याच्या आधी पुनश्च जी प्रक्रीया आतापर्यंत **ईसी** साठी करण्यात आलेली आहे ती देखील पार पाडावी लागते. वेगातल्या वेगात जर काम केलं तर ती सहा ते नऊ महीन्याच्या कालावधीमध्ये ही सगळी प्रक्रीया पूर्ण करता येऊ शकेल. अत्यंत वेगानं काम झालंतर. निश्चीतपणे अनेक इकडे डेव्लपर्स आहेत त्यांना या ईसी प्रक्रीयेचा अनुभव आहे आणि आपण सगळेजण जाणता की, गेल्या काही वर्षामध्ये ही ईसी प्रक्रीया ब-यापैकी सुलभ झालेली आहे. यापुर्वीचा कालावधी काही कारणाने जास्त लागला असेल त्याच्यामध्ये काही कारणानं दिरंगाई सुध्दा असु शकेल त्याची चौकशी करुन मी यापुर्वीच उद्धत केलेलं आहे की,संबंधितावरती कारवाई केली जाईल. जर ते त्यांच्याकडनं जाणीवपुर्वक झालेलं असेल. पण आपल्याला निर्णय घेण्याच्या पुर्वी माझी जबाबदारी आणि कर्तव्य ही बाब आपल्यासमोर आणुन दिलं पाहिजे की, ही संपुर्ण प्रक्रीया जर विचारात घेतली तर ईसीकडुन अँक्च्युल कंन्स्ट्रक्शन सुरु करुन फायनान्सियल क्लोजर करुन

कंन्स्ट्रक्शन पूर्ण करणे या प्रक्रीयेला कुठल्याही परिस्थितीमध्ये ३ वर्ष लागू शकतात. आणि तोपर्यंत आपला आहे तो प्लँन्ट चालू ठेवावा लागणार आहे. याचा अर्थ असा की,२०२० मध्ये आज आपल्याला MPCB कडनं दररोज नोटीशीस येणार आहेत कारण आपण प्लॅन Non Complient आहोत Non Complient असल्यामुळे आज आपल्या अस्तित्वातील असलेल्या प्लँन्ट बद्दल आपल्याला त्याच्यावरती नोटीस आपल्याला येत राहणार आहेत. त्याच्यावरती आपल्याला दंडात्मक कारवाई होऊ शकते. त्यामुळे प्राप्त परिस्थितीमध्ये विभागाकडनं निश्चितपणे दिरंगाई झालेली आहे. याच्यावरती कारवाई निश्चितपणे केली जाईल. मात्र प्राप्त परिस्थितीमध्ये आपल्याला शहर हिताच्या दृष्टीने योग्य निर्णय घेणेचा आहे. आता आपण म्हणालात की, ६ महिने मुदतवाढ देवुन निविदा प्रक्रीया पूर्ण करा सभागृहाला मला नमुद करायचं आहे की, ६ महिन्यात निविदा प्रक्रीया निश्चितपणे पूर्ण होईल कार्यरंभाचे आदेश देखील दिले जातील मात्र Actual Construction सुरु होण्यासाठी १ वर्षाचा तरी किमान कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. आणि त्यामुळे त्याच्यानंतर तरी ही प्रक्रीया करावी लागली तर आपल्याला प्राप्त परिस्थितीमध्ये ३ वर्ष हा Actual Plant तयार होण्यासाठी थांबाव लागेल. प्राप्त परिस्थितीमध्ये कंत्राटचा ज्यावेळेला अभ्यास सुरु होता निविदा प्रक्रीयेची RMP Documents तयार करत होतो त्यावेळेला केवळ अट क्र.२२ जी आपल्याला दिसली त्याच्यामध्ये आयुक्तांनी याच्याबाबतीत उचित निर्णय घ्यावा असा त्या अटीमध्ये उल्लेख होता. आयुक्त म्हणुन माझी अजिबात व्यक्तीशा इच्छा नाही की,कुठल्याही पध्दतीनं व्यापक स्पर्धा न करता कुठल्याही कंत्राटदाराला कुठल्याही एवढया मोठया काळाचं कंत्राट मिळावं निश्चितपणे माझी इच्छा नाही. मात्र प्राप्त परिस्थितीमध्ये जी काही दिरंगाई विभागाकडनं झालेली आहे त्या कारणास्तव आपल्याला प्राप्त परिस्थितीमध्ये योग्य तो निर्णय सभागृहाच्या मदतीनेच घेणं शक्य आहे. जो की आयुक्त म्हणुन मी माझ्या स्तरावरती घेवु शकत नाही. जी गोष्ट ७२ (ब) नुसार जरी मी नव्याने निविदा केली १५ वर्षाच्या कालावधीसाठी निविदा करायची असेल, निविदा करण्यासाठी सुध्दा मला ७२ (ब) नुसार मला सभागृहाची मान्यता घ्यावी लागते. मला सभागृहासमोर येणं भाग आहे.जरी एक्सटेंशन देवुन याच व्यक्तीकडनं काम करुन घ्यायचं असेल आणि तसा निर्णय जरी मी माझ्या अधिकारात घेतला असता तरी तो अधिकार मला नाही. तो केवळ मी विचार करु शकतो अशा स्वरुपाचा अधिकार त्या करारनाम्यामध्ये दिलेला आहे. माझा विचार हा केवळ

प्रशासकीय विचार असु शकतो. त्याला अंतिम स्वरुप हे महापालिकेच्या सर्वसाधारण सभेकडनंच प्राप्त होऊ शकतं. आणि त्यामुळे दोन्ही बाबींचा विचार करता जी प्राप्त परिस्थिती आहे ती सर्वसाधारण सभागृहासमोर योग्य चर्चेसाठी पूर्ण अर्थानं सगळया बाबी मांडून म्हणुन एवढी सविस्तर अट चार प्रपत्र का केली त्यांनी याचं कारण आहे की,कुठल्याही बाबी कुठूनही सभागृहाच्या समोर दुर्लक्षित राहू नयेत त्यावरती योग्य निर्णय होणं अपेक्षित आहे. मला आनंद वाटला असता की,त्याची तात्काळ निविदा झाली असती पण ही प्रक्रीया खरोखर व्हावयाची असती तर ती २०१६ मध्ये सुरु होणचं अपेक्षित होतं. मात्र काही कारणांमुळे ती २०१६ मध्ये सुरु झाली नाही. ती २०१९/२० मध्ये करण्याचा जरी मी प्रयत्न केला असता तरी सुध्दा मी सांगतो त्या पध्दतीनं परिस्थिती निर्माण झाली असती. आणि म्हणुनच तात्काळ हे विषयपत्र ज्यावेळेला आम्ही प्रयत्न करुन याच्यावरती २ ते ३ महिने घालवून आमच्या निदर्शनास अशी बाब आली की, आपल्याला प्राप्त परिस्थितीमध्ये यांच्या सोबत काम करावं एवढाच हेतू समोर ठेवून सभागृहाच्या उचित निर्णयासाठी हा विषय आणलेला होता. मी पुनश्च सभागृहाच्या समोर सादरपूर्वक सादर करतो की,यामध्ये उचित निर्णय सभागृहाने घ्यावा. कारण जर का आपल्याला एक्सटेंशन द्यायचं असेल कंत्राटदाराला तर तसा निर्णय सभागृह घेवु शकतं पूर्ण एक्सटेंशन न देता ५ एक्सटेंशन देवुन निविदा प्रक्रीया पूर्ण करण्याचा निर्णय घ्यायचा असेल सभागृहाला, तर तसा निर्णय सभागृहाला घेता येऊ शकतो. म्हणजे कसा साधारणपणे ३ वर्षाचा एक्सटेंशन देवुन निविदा प्रक्रीया पूर्ण करुन कंन्स्ट्रक्शन पूर्ण करेपर्यंत आपल्याला चालू प्लँन्ट आपल्याला चालू ठेवावा लागणार आहे. ती प्रक्रीया आपल्याला पूर्ण करावी लागेल. अन्यथा तिसरा मार्ग आहे की, साधारणता ६ महिन्याचा एक्सटेंशन देवुन ऑपरेशन्स एक्झीसटींग प्लँन्टसाठी टेंम्पररी ऑपरेटर नेमण्याचा देखील निर्णय आपल्याला घेता येऊ शकतो. किंवा चौथा निर्णय की जो आहे त्याच कॉन्ट्रॅक्टरला १५ वर्षासाठी पुन्हा करारनामा करुन योग्य पध्दतीनं स्थायीची मान्यता घेवुन पुढे जाण्याचा निर्णय सभागृह घेऊ शकतं. पण ही संपुर्ण पार्श्वभूमी ही प्राप्त परिस्थितीमध्ये घेण्यात आलेली आहे. एवढंच मला सभागृहासमोर सादर करायचं आहे. निश्चितपणे याच्यामध्ये दिरंगाई विभागाकडनं झालेली आहे त्याबद्दल विभागावरती जबाबदारी निश्चित करुन जे कोणी जबाबदार असतील त्यांच्यावर निश्चितपणे कडक कारवाई करणेत येईल याची ग्वाही मी

सभागृहाला देतो आणि नम्रपुर्वक मी माझे निवेदन पुढील काही अधिक माहिती लागल्यास मी करण्यासाठी मी आपली विनंती करीन माझी अनुमती आहे.

**मा.महापौर** - हा विषय मंजुर करणेत येत आहे. पुढील विषय घेणेत यावा.

**मा.निलेश बारणे-** मा.महापौर साहेब, विरोध नोंदवून घ्या.

**मा.राजू मिसाळ-** मा.महापौर साहेब, विरोध नोंदवून घ्या.

**मा.राहूल कलाटे -** मा.महापौर साहेब, आमचा विरोध आहे.

**मा.महापौर-** ज्यांनी विरोध असल्याचे सांगीतले आहे त्यांचा विरोध नोंदवून हा विषय मंजूर करण्त येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ६९ प्रतिकूल- ०३

अशी मते पडली व सदर ठराव बहुमताने मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर -** सर्वांनी खाली बसुन घ्या.

(सभागृहात गोंधळ)

**मा.अॅड.मोरेश्वर शेडगे –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक- २

दिनांक- १३/१०/२०२० विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ** –१) मा.सागर आंगोळकर, मा.करूणा चिंचवडे यांचा प्रस्ताव–

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.५९६५ दि.२७/११/२०१९ अन्वये.

३) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ४८३ दि.०६/०१/२०२० अन्वये.

४) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ४९६ दि.२०/०१/२०२० अन्वये.

५) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ५४१ दि.१/०६/२०२० अन्वये.

६) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ५५५ दि.२१/०८/२०२० अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत खाजगी वाटाघाटीने भूसंपादन करताना संबंधित जमिन मालकास मोबदला अदा करताना मा.महापालिका सभा ठराव क्र.३९९ दि. २१/११/२०१३ नुसार मंजूर कार्यपध्दतीत व धोरणानुसार कार्यवाही करावयाच्या प्रकरणात नुकसान भरपाई अदा करताना ३०% दिलासा रक्कम देण्यास मान्यता देणेत आली आहे. तदनंतर मा.महापालिका सभा ठराव क्र.७७४

दि.२०/११/२०१५ अन्वये सदर धोरणात बदल करून नविन भूसंपादन कायदा २०१३ मधील तरतूदी नुसार ज्या मिळकत धारकांचे क्षेत्र ० ते ३०० चौ मी. आहे अशा बाधित छोट्या छोट्या मिळकतधारकांना १००% दिलासा रक्कम व ३०० चौ.मी पेक्षा जास्त क्षेत्राचे भूखंड धारकांना ३०% दिलासा रक्कम या प्रमाणे मान्यता देणेत आलेली आहे. सबब, दि.२०/११/२०१५ नंतर ३०० चौ.मी. पेक्षा मोठ्या भूखंडाचे विभाजन करून तुकडा ३०० चौ.मी. पेक्षा कमी क्षेत्राचा भूखंड केलेल्या सर्व प्रकरणात सांत्वना रक्कम ३०% इतकीच देय राहिल यास मान्यता देणे.

**मा.संतोष लोंढे –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.तुषार हिंगे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- समाईक मालकीच्या प्रकरणात बाधित क्षेत्राची नुकसान भरपाई परिगणना करतेवेळी प्रत्येक हिस्सेधारकाच्या स्वत:चे क्षेत्राचा विचार करुन सांत्वना रक्कम निश्चित करणेस मान्यता देणेत यावी. तसेच मौजे किवळे येथील स.नं. ३६ पैकी या जागेवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील आ.क्र. ४/११२ (जकात नाका) अन्वये एकुण १.६१ हे.आर. (१६१००.०० चौ.मी.) जागा आरक्षित आहे. या आरक्षित जागेपैकी ११७००.०० चौ.मी. ही जागा देहुरोड कॅन्टोमेंट हद्दीत येत असून केवळ ४५८७.०० चौ.मी. क्षेत्र म.न.पा. हद्दीत आहे. सध्या महाराष्ट्रात जकात वसुली बंद झाल्याने सदरहु आरक्षणाची भागश: जागा ताब्यात घेणे योग्य होणार नाही. तरी मौजे किवळे येथील स.नं.३६ पैकी या जागेवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील आ.क्र. ४/११२ (जकातनाका) MRTP ACT ३७ नुसार वैधनिक कार्यवाही पुर्ण करुन सदर आरक्षण रद्द करुन महाराष्ट्र शासनास कळविणेस मान्यता देणेत यावी तसेच मौजे पिंपळे गुरव येथील स.नं. ८२/१/१ पै. व स.नं. ८२/२/१ पै. मधील मंजूर विकास योजनेतील आ.क्र ३५५ (CPG) लहान मुलांचे खेळाचे मैदान भूसंपादनाने ताब्यात घेण्यास मान्यता देणेत यावी.

**मा. राहूल जाधव –** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

(सभागृहात गोंधळ)

**मा.ॲड.मोरेश्वर शेडगे –** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेसह दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ५७४ विषय क्रमांक- २
दिनांक- १३/१०/२०२० विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ** –१) मा.सागर आंगोळकर, मा.करूणा चिंचवडे यांचा प्रस्ताव–
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.५९६५ दि.२७/११/२०१९ अन्वये.
३) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ४८३ दि.०६/०१/२०२० अन्वये.
४) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ४९६ दि.२०/०१/२०२० अन्वये.
५) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ५४१ दि.१/०६/२०२० अन्वये.
६) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ५५५ दि.२१/०८/२०२० अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत खाजगी वाटाघाटीने भूसंपादन करताना संबंधित जमिन मालकास मोबदला अदा करताना मा.महापालिका सभा ठराव क्र.३९९ दि. २१/११/२०१३ नुसार मंजूर कार्यपध्दतीत व धोरणानुसार कार्यवाही करावयाच्या प्रकरणात नुकसान भरपाई अदा करताना ३०% दिलासा रक्कम देण्यास मान्यता देणेत आली आहे. तदनंतर मा.महापालिका सभा ठराव क्र.७७४ दि.२०/११/२०१५ अन्वये सदर धोरणात बदल करून नविन भूसंपादन कायदा २०१३ मधील तरतूदी नुसार ज्या मिळकत धारकांचे क्षेत्र ० ते ३०० चौ मी. आहे अशा बाधित छोट्या छोट्या मिळकतधारकांना १००% दिलासा रक्कम व ३०० चौ.मी पेक्षा जास्त क्षेत्राचे भूखंड धारकांना ३०% दिलासा रक्कम या प्रमाणे मान्यता देणेत आलेली आहे. सबब, दि.२०/११/२०१५ नंतर ३०० चौ.मी. पेक्षा मोठ्या भूखंडाचे विभाजन करून तुकडा ३०० चौ.मी. पेक्षा कमी क्षेत्राचा भूखंड केलेल्या सर्व प्रकरणात सांत्वना रक्कम ३०% इतकीच देय राहिल यास मान्यता देणेत येत आहे. तसेच समाईक मालकीच्या प्रकरणात बाधित क्षेत्राची नुकसान भरपाई परिगणना करतेवेळी प्रत्येक हिस्सेधारकाच्या स्वत:चे क्षेत्राचा विचार करुन सांत्वना रक्कम निश्चित करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मौजे किवळे येथील स.नं. ३६ पैकी या जागेवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील आ.क्र. ४/११२ (जकात नाका) अन्वये एकुण १.६१ हे.आर. (१६१००.०० चौ.मी.) जागा आरक्षित आहे. या आरक्षित जागेपैकी ११७००.०० चौ.मी. ही जागा देहुरोड कॅन्टोमेंट हद्दीत येत असून केवळ ४५८७.०० चौ.मी. क्षेत्र म.न.पा. हद्दीत आहे. सध्या महाराष्ट्रात जकात वसुली बंद झाल्याने सदरहु आरक्षणाची भागश: जागा ताब्यात घेणे योग्य होणार नाही. तरी मौजे किवळे येथील स.नं.३६ पैकी या

जागेवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील आ.क्र. ४/११२ (जकातनाका) MRTP ACT ३७ नुसार वैधनिक कार्यवाही पुर्ण करुन सदर आरक्षण रद्द करुन महाराष्ट्र शासनास कळविणेस मान्यता देणेत येत आहे तसेच मौजे पिंपळे गुरव येथील स.नं. ८२/१/१ पै. व स.नं. ८२/२/१ पै. मधील मंजूर विकास योजनेतील आ.क्र ३५५ (CPG) लहान मुलांचे खेळाचे मैदान भूसंपादनाने ताब्यात घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

(सभागृहात गोंधळ)

**मा.ॲड.मोरेश्वर शेडगे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक- ३

दिनांक- १३/१०/२०२० विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ – १)** मा.आयुक्त यांचे जा.क्र.डक्षे/स्था/कावि/४४१/२०२० दि.१४/८/२०२०

मा.राष्ट्रीय हरित लवाद (W2), पुणे यांचेकडे याचिका क्र.४९/२०१९ श्री.सारंग यादवडकर विरूध्द मनपा दाखल आहे. सदर याचिकेमध्ये श्री.सारंग यादवडकर व इतर ३ विरूध्द पुणे महानगरपालिका व इतर असे प्रतिवादी आहेत.

सदर दाव्याची दि.२३/०७/२०१९ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये वादी यांनी बेकायदेशीर अनाधिकृतपणे बांधकामाचा राडारोडा नदीपात्रात (मुळा, मुठा व पवना नदी) टाकण्यात आलेला आहे व त्यामुळे नदीच्या नैसर्गिक प्रवाहात अडथळे निर्माण झालेले आहे व काही ठिकाणी नदीच्या प्रवाहात अडथळे निर्माण करून बेकायदेशीररित्या नदीचा प्रवाह बदलेला असल्याबाबतचे मुद्दे उपस्थित केले. याबाबत तपासणीकामी नोडल एजन्सी महाराष्ट्र पोल्यूशन कन्ट्रोल बोर्ड यांना आदेश दिले, तसेच मा.आयुक्त, पुणे व पिंपरी चिंचवड मनपा यांनी नदीमध्ये कुढल्याही प्रकारचे बांधकामाचा राडारोडा व इतर बांधकामाचे टाकाऊ मटेरिअल यांचा नदीपात्रात भराव

होणार नाही याची खात्री करावी व याबाबतचा कालबध्द कृती आराखडा NGTयांना सहा आठवड्याच्या आत सादर करणेबाबत आदेश दिलेले आहेत.

मा.हरित लवाद, पुणे यांचेकडील कोर्ट ऑर्डर दि.२६/०९/२०१९ चे आदेशानुसार पिंपरी चिंचवड मनपा व त्यांचे कार्यक्षेत्रातील पवना व मुळा नदीवरील प्रतिबंधित क्षेत्रातील अनाधिकृत बांधकामे निष्कासीत करणे, ड्रेनेज व कारखाण्याचे प्रक्रीया न केलेले पाणी नदीत न सोडता उपलब्ध सिवरेज ट्रीटमेंट प्लांन्ट मध्ये वळवून आवश्यक प्रक्रीया करावी व ही सर्व कामे करणेकरीता सादर केलेल्या कृती आराखड्यानुसार कामे पुर्ण करावी अन्यथा पुणे मनपा, पिंपरी चिंचवड मनपा व पी.एम.आर.डी. यांना प्रत्येकी र.रू.१.०० कोटी दायित्व राहील. वर नमूद कामांबाबतचा कृती आराखडा दि.२६/०९/२०१९ रोजी सादर करणेत आलेला आहे.

मा.हरित लवाद, पुणे यांचेकडील कोर्ट ऑर्डर दि.१६/०६/२०२० चे आदेशानुसार नदीच्या सिमा व क्षेत्र नमूद असलेले आराखडे डिस्ट्रीक्ट सर्व्हेअर ऑफ लँन्ड रेकॉर्ड यांचेकडे उपलब्ध आहे. त्यानुसार नदीच्या सिमा निश्चित करून घेणेत याव्या. तसेच पाऊस सुरू होण्यापुर्वी नदीच्या प्रवाहातील अडथळे पुर्णपणे काढून घेतल्याची खात्री मा.आयुक्त यांनी पावसाळ्यापुर्वी करून घ्यावी असे आदेश कोर्टाने दिलेले आहेत.

त्यानुसार बांधकाम परवानगी विभागाने नदीपात्रातील अनाधिकृत भरावाबाबत संबंधित जागा मालक यांना महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५३ अन्वये नोटीस दिलेल्या असून त्याप्रमाणे भराव काढून घेणेची कार्यवाही करणेबबात कळविलेले आहे. तसेच सदर भराव काढून न टाकल्यास कलम ५३ (६ब) प्रमाणे सदरचा भराव मनपामार्फत काढणेत येईल व सदरचा खर्च वसुल करण्यात येईल याप्रमाणे संबंधित जागा मालकांना कळविलेले आहे.

सदर नदीपात्रातील बेकायदेशीर केलेला राडारोडा काढणे या कामाचा आढावा घेणेबाबत दि.२३/०७/२०२० रोजी मा.आयुक्त, पिं.चिं.मनपा. यांचे दालनात बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत मा.आयुक्त यांनी संबंधित कार्यकारी अभियंता, स्थापत्य यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात येत असलेल्या नदीपात्रातील अनाधिकृत भराव निष्कासीत करणे कामाची निविदा स्वतंत्रपणे काढणेबाबत सुचना दिल्या. कोर्टाच्या आदेशाची अंमलबजावणी ही कालमर्यादित असल्याने कामाची कार्योत्तर प्रशासकीय मान्यता घेऊन व कामास तरतुद उपलब्ध करून घेणेबाबत सुचना दिल्या.

त्यानुसार कामाचे प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव व मा.महापालिका सभेची मान्यता मिळणेच्या उमेदमान्यतेवर बांधकाम परवानगी विभागाने जमिन मालकांना दिलेल्या नोटीसी मधील परिमाणानुसार ज्या त्या क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील नदीपात्राजवळील राडारोडा काढण्याचे अंदाजपत्रक तयार करणेत आले असून सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम सोबतच्या प्रपत्र-अ प्रमाणे येत आहे. सदर अंदाजपत्रकासाठी महाराष्ट्र शासन यांचेकडील सन २०१९-२०२० ची मंजूर दरसूची व मनपा तांत्रिक विभागाकडील मंजूर दरपृथ्थःकरणानुसार दर घेणेत आलेले आहे व निविदा नोटीस प्रसिध्द करणेत आलेली आहे.

सदर कामासाठी सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकातील सोबतच्या **प्रपत्र-अ** प्रमाणे वाढ घट करून पर्यावरण विभागाच्या **भांडवली-अ पिं.चिं.मनपा परिसरातील पवना नदी पुर्नरूज्जीवन प्रकल्प राबविणे** या लेखाशिर्षातून **र.रू.१०,००,००,०००/-** विषयांकित कामावर तरतूद वर्ग करण्यास व सदर कामाच्या नावाचा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२०-२१ च्या मुळ अर्थसंकल्पात "**पर्यावरण अभियांत्रिकी विभागाच्या भांडवली-अ**" या लेखाशिर्षाअंतर्गत समावेश करणेस मान्यता देणे.

**मा.संतोष लोंढे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

(सभागृहात गोंधळ)

**मा.तुषार हिंगे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- श्री.नारायण विदयालय ही संकेत विहार, गहुंजे येथे असुन शाळेत एकुण २६५ विद्यार्थी शिक्षण घेत असून ते सर्व या परीसरातीलच आहे. विद्यार्थ्याच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातून शाळेतील बाथरुम, टॉयलेटमध्ये पुरेसे पाणी उपलब्ध असणे अत्यावश्यक आहे. परंतु गहुंजेचा पाणीपुरवठा अनियमित असल्यामुळे शाळेला रोज टँकरने पाणी पुरवठा करावा लागते तरी सुध्दा विद्यार्थ्यांची अत्यंत गैरसोय होत आहे. त्यामुळे या शाळेला महानगरपालिकेच्या पाईप लाईनवरुन नळकनेक्शन दिल्यास या विद्यार्थ्यांची पाण्याची कायमची सोय होईल तसेच महानगरपालिकेची पाईपलाईन शाळेपासून फक्त १०० मीटरवरुन गेली आहे. त्यामुळे या शाळेस महानगरपालिकेच्या पाईप लाईनवरुन नळकनेक्शन देणे सहज शक्य आहे. तसेच कनेक्शन दिल्यास ही शाळा मनपाची पाणीपट्टी भरण्यास तयार आहे. या शाळेतील विद्यार्थ्यांची गैरसोय पाहता मानवतावादी दृष्टिकोन ठेवून या विद्यालयास मनपाच्या पाईप लाईनवरुन

नळकनेक्शन देण्यास मान्यता देणेत यावी. तसेच राज्य शासनाने कोरोना विषाणुंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधक कायदा 1897 व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005, दि.13/03/2020 पासुन लागू केलेला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या परिसरात देखील कोरोना साथरोगाचा प्रादुर्भाव झाल्याने महानगरपालिका अधिनियम कलम 63 (3) नुसार साथरोग नियंत्रणात ठेवणेकामी आवश्यक उपाययोजना तातडीने करणेकरीता वस्तू अथवा सेवांची आपत्कालीन परिस्थीतीत तातडीने खरेदी करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरून महानगरपालिका अधिनियम कलम 67 (3) अन्वये विषयांकीत कामास मा. आयुक्त सो. यांनी खालिलप्रमाणे मंजुरी दिलेली आहे.

कै. अण्णासाहेब मगर स्टेडिअम येथे सद्यस्थितीत म.रा.वि.वि.कं.कडून डिस्ट्रीब्युशन फीडर द्वारे विजपुरवठा घेणेत आलेला आहे. त्यामुळे सदर ठिकाणी वारंवार होणा-या ट्रिपींगमुळे हॉस्पीटलमधील कामकाजावर परिणाम होत आहे. त्यामुळे दि. ४/९/२०२० रोजी मा. आायुक्त सो. व कार्यकारी समिती यांचेसमवेत झालेल्या बॆठकीमध्ये, म.रा.वि.वि.कं.चा वीजपुरवठा अखंडीत ठेवणे कामी मनपाचे गवळीमाथा पंपींग स्टेशनपासून मनपाचे एक्सप्रेस फीडरवर एक्सटेँशन करून एक्सप्रेस फीडर द्वारे वीजपुरवठा करणेकामी सूचना दिलेल्या आहेत. तसेच सदरचे कामाची निविदा तातडीने प्रसिध्द करणेकामी सूचना दिलेली आहे.

मा.आयुक्त सो. यांचे मान्यतेनुसार विषयांकीत कामाची र.रू. १,१९,५९,७८९.९० इतक्या रकमेची अल्प मुदतीची निविदा प्रसिद्ध करणेत आलेली आहे. सबब विषयांकीत कामाचा अंदाजपत्रकामधे नव्याने समावेश करून कामास प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

सबब खालील कामाचा अंदाजपत्रकात नव्याने समावेश करून कामास प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | क्षेत्रिय कार्यालय | लेखाशिर्ष | अंदाजपत्रकीय / प्रशासकीय मान्यता रक्कम | सन २०२०-२१ ची मूळ तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| १ | कॆ. अण्णासाहेब मगर स्टेडियम येथील डेडीकेटेड कोव्हिड -१९ हॉस्पीटल करिता विद्युत पुरवठ्याकरिता उच्चदाब २२ KV एक्सप्रेस फीडर द्वारे वीजपुरवठा करणे. | क क्षेत्रिय विद्युत विभाग | कोरोना निधी | १५०००००० | ० |

सबब वरील कामाचा अंदाजपत्रकात नव्याने समावेश करून कामास प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

तसेच प्रभाग क्र. ३९ संत तुकाराम नगर येथे विविध ठिकाणी मंडप व्यवस्थेचे काम केले आहे. सदर कामाचा उल्लेख २०२०-२१ अंदाजपत्रकात झाला नाही. तरी सदर कामास २०२०-२१ अंदाजपत्रकात समावेश करुन तरतुद उपलब्ध करुन मिळावी. तरी सदर कामासाठी आवश्यक तरतुद रक्कम रुपये ११५००००/- इतकी वर्गीकरणाद्वारे करुन देण्यास मान्यता देणेत यावी.

| अ. क्र. | कामाचे नाव | पा. क्र. | अ. क्र. | लेखाशिर्षक | २०१०-२१ ची तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | सन २०२०-२१ चा सुधारीत अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ३९ संत तुकाराम नगर येथील विविध कार्यक्रमासाठी मंडप व्यवस्था करणे | | | स्थापत्य विषयक कामे करणे | ० | ११५०००० | ० | ११५०००० |
| २ | महापौर विकास निधी | ६३ | २ | महापौर विकास निधी | ५००००००० | ० | ११५०००० | ४८८५०००० |
| | एकुण | | | | ५००००००० | ११५०००० | ११५०००० | ५००००००० |

तरी वरील तरतुद वर्गीकरणास मान्यता देणेत यावी.

तसेच प्रभाग क्र. २ मधील औद्योगित वसाहत परिसरातील रस्ते डांबरीकरण करणेचे काम निविदा क्र. 19/4-2019-20 अन्वये मे. धनेश्वर कन्स्ट्रक्शन यांना दि. 22/01/2020 चे आदेशान्वये 18 महिने मुदतीत पुर्ण करणेसाठी देणेत आलेले आहे.

प्रभाग क्र. २ जाधववाडी मधील बोल्हाईचामळा कॉलनी क्रं. 1 ते 10 व मधला पेठा कॉलनी क्रं. 11 ते 16 या नागरीवसाहती मधील रस्ते अत्यंत खराब झालेले आहे. व तेथिल नागरीकांची सदरचे रस्ते तातडीने नव्याने करणे बाबत मागणी आहे. तसेच औद्योगिक वसाहतीमध्ये रस्त्यांची रूंदी कमी असलेने पाण्याचा निचरा निट होत नाही. व औद्योगिक भागामध्ये विद्युत विषयक खोदाई (खाजगी) वारंवार होते. त्यामुळे रस्ते टिकत नाहीत. परिणामी सदरचे काम लोकवस्तीत करणे गरजेचे वाटते. या भागातील रस्त्याची दुरावस्था पाहता अत्यावश्यक वाटते.

तरी निविदा क्र. 19/4-2019-20 मधून औद्योगिक वसाहत परीसरातील रस्त्यांचे डांबरीकरणा ऐवजी बोल्हाईचामळा कॉलनी क्रं. 1 ते 10 व मधला पेठा कॉलनी क्रं. 11 ते 16 मधील रस्त्यांचे सिमेंट क्रॉक्रीटीकरण/डांबरीकरण करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच प्रभाग क्र. २ जाधववाडी येथे जि. प. प्राधमिक शाळा इमारतीचे जागेवर प्राथमिक आरोग्य केंद्र बांधणे निविदा क्र. 26/8-2019-20 अन्वये कामाचे आदेश मे. जे. पी. इन्फ्रा यांना दि.18/09/2019 चे आदेशान्वये 12 महिने मुदतीने देणेत आले होते. सदरचे कामामधून गट नं 605 मधील 2 गुंठे क्षेत्रावर प्रथमिक आरोग्य केंद्राची दुमजली इमारत बांधणेचे नियोजन करून RCC Work बांधकाम प्लॅस्टर पाण्याची टाकी सह इमारतीचे काम दि. 12/08/2020 पर्यंत पुर्ण झालेले आहे. सद्यस्थितीत सदरचे इमारतीचे कामामधील फरशी काम दरवाजे/खिडक्या सिमाभिंत बांधणे इत्यादी कामे अपुर्ण आहेत.

याच प्रभागातील निविदा क्र. 67/03-1019-20 नुसार प्रभाग क्र. २ चिखली गावठाण चिंतामणीनगर येथील मनपाची जुनी मोडकळीस आलेली व्यायामशाळा पाडून नविन RCC मध्ये व्यायामशाळा इमारत बांधणेच्या कामाचा आदेश मे. अक्षया इंन्टरप्रायझेस यांना देणेत आले आहेत. परंतू प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे काम कोविड -19 चे पार्श्वभुमीवर उर्वरीत रक्कम रूपये १० लाखाचे काम प्रथमतः पुर्ण करणे आवश्यक आहे.

सबब निविदा क्र. 67/03-2019-20 मधून प्राथमिक आरोग्य केंद्र बांधणेचे उर्वरीत काम रक्कम रूपये १००००००/- पर्यंत करून घेणेस मान्यता देणेत यावी.

तसेच सन २०२०-२१च्या अंदाजपत्रकात वाढ / घट करणेबाबत व सुधारित प्रशासकीय मान्यता व नावात बदल करणेस मान्यता देणेत यावी.

| अ. क्र. | लेखाशिर्ष | उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | पानांक | अ. क्र. | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | सुधारीत प्रशासकीय मान्यता | सन २०२०-२१ चा मुळ अंदाज | वाढ | घट | सन २०२०-२१ चा सुधारीत अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भांडवली -(नाला ट्रेनिंग - मुख्यालय | प्रभाग क्र.२० मधील महात्मा फुलेनगर व लांडेवाडी | ३१२ | ७ | ३०००००० | ३००००००० | १०००००० | ४९००००० | | ५९००००० |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ) | झोपडपट्टी समोरचा नाला विकसित करणे.(सन २०२०-२१) | | | | | | | | |
| २ | विशेष योजना | प्रभाग क्र.२० कासारवाडी येथील रस्ते विशेष पध्दतीने विकसित करणे. | ४१ | २३१ | ५००००००० | ५०००००० | | | ४९००००० | १००००० |
| **एकुण** | | | | | | | | **४९०००००** | **४९०००००** | |

तसेच सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकात नव्याने काम समाविष्ट करुन त्यास प्रशासकीय मान्यता मिळणे व तरतुदीत वाढ/घट करणेस मान्यता देणेत यावी.

| **अ क्र** | **कामाचे नाव** | **अंदाजपत्रकीय रक्कम** | **लेखाशिर्ष** | **पान क्र. अ.क्र** | **सन २०२०-२१ ची तरतूद** | **वाढ** | **घट** | **सन २०२०-२१ चा सुधारित अंदाजपत्रक** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | आकुर्डी धर्मराज चौक ते इस्कॉन मंदीर पर्यंतचा रस्ता अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार विकसित करणे. | १५.०० कोटी | UTF | - | ० | १.०० कोटी | - | १.०० कोटी |
| २ | आकुर्डी गुरुद्वार चौकापासुन ते राजयोग कॉलनी पर्यंतचा रस्ताअर्बन स्ट्रीट डिझाईननुसार विकसित करणे. | १०.०० कोटी | UTF | - | ० | १.०० कोटी | - | १.०० कोटी |
| ३ | सांगवी किवळे रस्त्यावरील रावेत ते मुकाई चौकापर्यंत रस्त्याचे रूंदीकरण करणे. | ५०.०० कोटी | UTF | ६४१/२६ | १.०० कोटी | - | ७५.०० लाख | २५.०० लाख |
| ४ | रावेत स.नं. १५१ इस्कॉन मंदीर ते भोंडवे कॉर्नर पर्यंतचा रस्त्यावर डाऊन रॅम्प बांधणे. | २०.०० कोटी | UTF | ६४१/२७ | १.०० कोटी | - | ७५.०० लाख | २५.०० लाख |
| ५ | सागंवी किवळे रस्त्यावर शिंदेवस्ती रावेत येथे उड्डाणपुल / ग्रेडसेपरेटर बांधणे. | ७५.०० कोटी | UTF | ६४१/३८ | १.०० कोटी | - | ५०.०० लाख | ५०.०० लाख |
| | **एकूण** | | | | **३.०० कोटी** | **२.०० कोटी** | **२.०० कोटी** | **३.०० कोटी** |

तसेच प्रभाग क्र.२६ पिंपळे निलख येथील खालील नमूद केलेल्या विकास कामाला सन २०२०-२०२१ च्या अंदाजपत्रकात असलेली तरतुद अपुरी पडत आहे. तरी सन २०२०-२०२१ चे मुळ अंदाजपत्रकातील खालील नमूद केलेल्या चालू कामांना आवश्यक तरतुद देणेस मान्यता देणेत यावी.

| अ.क्र | उप लेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | लेखाशिर्षक | अ.क्र. | पा.क. | मुळ प्रशासकीय मान्यता र.रु. | सुधारित प्रशा. मान्यता | सन २०२०-२०२१ ची मुळ तरतुद | वाढ | घट | आवश्यक तरतुद मान्यता र.रु. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्र.क्रं. २६ पिपंळे निलख स्मशानभूमी विकसीत व इ.स्था. विषयक अनु.कामे करणे. | स्थापत्य विशेष योजना (चालू कामे) | २१ | ३५ | ३०००००० | ३०००००० | १०००००० | ५०००००० | ० | ६०००००० | |
| २ | प्रभाग क्र.२६ कस्पटेवस्ती स्मशानभूमी विकसीत व इ. स्थापत्य विषयक अनुषंगिक कामे करणे. | स्थापत्य विशेष योजना (चालू कामे) | २१ | ३४ | ३०००००० | ३०००००० | १०००००० | ५०००००० | ० | ६०००००० | |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | प्रभाग क्र.२६ वाकड येथील समर्थ कॉलनी, तनिष्क कॉलनी व इतर परिसरा मध्ये क्रॉकीटीकरणने रस्ता विकसीत करणे. | स्थापत्य विशेष योजना (नविन कामे) | ३५ | ११२ | २५०००००००० | २५०००००००० | १००००० | ३००००००० | ० | ३०१००००० | |
| ४ | प्रभाग क्र.२६ पिंपळे निलख मधील उर्वरीत रस्ते क्रॉकीटीकरणने विकसीत करणे. | स्थापत्य विशेष योजना (नविन कामे) | ३५ | ११३ | २००००००००० | २००००००००० | १००००० | ३००००००० | ० | ३०१००००० | |
| ५ | प्रभाग क्र.२६ पिंपळे निलख सर्व्हे नं.०२ व ४२ मधील आरक्षण क्र.३८० भाजी मंडई व दुकान केंद्र विकसीत करणे. | स्थापत्य विशेष योजना (नविन कामे) | ४५ | ३०९ | १००००००००० | १००००००००० | १००००० | ३००००००० | ० | ३०१००००० | |
| ६ | प्रभाग क्र.२६ पिंपळे निलख येथील बापुजी बुवा चौक ते पिंपळे निलख स्मशानभूमी पर्यंता १८.०० मी. रूंदीचा | स्थापत्य विशेष योजना (नविन | ४६ | ३१३ | १००००००००० | १००००००००० | १००००० | २००००००० | ० | २०१००००० | |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | डी.पी. रस्ता विकसीत करणे व मनपाच्या ताब्यात येणारे रस्ते विकसीत करणे. | कामे) | | | | | | | | | |
| | एकुण | | | | ७१००००००० | ७१००००००० | २४०००००० | १२००००००० | ० | १२२४००००० | |

तरी वर नमूद केलेप्रमाणे सन २०२०-२०२१ च्या मुळ अर्थसंकल्पात सदर कामाला सुधारित तरतुद करुन देणेस मान्यता देणेत यावी. तसेच उपरोक्त विषयान्वये खालील विकास कामाचे नावात बदल करणे व सुधारीत प्रशासकीय मान्यता देणे व तरतूद करणेबाबत खालील प्रमाणे बदल करणेस मान्यता देणेत यावी.

| अ.क्र | अदाजपत्रक सन २०२०-२१ नुसार मुळ कामाचे नाव | लेखाशिर्षक | उपलेखार्शिषक | अ.क्र. | पा.क. | मुळ प्रशासकीय मान्यता र.रु. | अंदाजपत्रक सन २०२०-२१मधील मुळ तरतुद | नावात बदल झालेल्या कामाचे नाव | सुधारीत प्रशासकीय मान्यता र.रु. | वाढ करावयाची तरतूद | घट करावयाची तरतूद | आवश्यक तरतुद मान्यता र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ७ भोसरी आदिनाथनगर येथील पावसाळी पाण्याचा निचरा करणेसाठी विविध स्थापत्य विषयक कामे करणे. | विशेष योजना | इतर विशेष योजना व बी.ओ.टी. प्रकल्प | १९७ | ८६ | ३00000000 | १००० | प्रभाग क्र.७ भोसरी येथील स.नं.१ शेजारील नाल्याची सुधारणा करणे व स्थापत्य | ५०००००००० | १०००००००० | ० | १०००१००० |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | विषयक कामे करणे. | | | | |
| २ | प्रभाग क्र.७ भोसरी चांदणी चौक ते लांडेवाडी महाराष्ट्र बँके पर्यंतचा रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे | विशेष योजना | व्हीजन २०२५ | २५ | ११४ | १०००००००० | १००० | प्रभाग क्र.७ भोसरी चांदणी चौक ते लांडेवाडी महाराष्ट्र बँके पर्यंतचा रस्ता अद्यावत पध्दतीने विकसित करणे. | ६०००००००० | २००००००० | ० | २०००१००० |
| ३ | प्रभाग क्र.७ भोसरी बापुजी बुआ चौक ते पी.सी.एम.टी चौक पर्यंत च्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. | विशेष योजना | व्हीजन २०२५ | २५ | ११५ | १०००००००० | १००० | प्रभाग क्र.७ भोसरी बापुजी बुआ चौक ते पी.एम.टी चौक पर्यंतचा रस्ता अद्यावत पध्दतीने विकसित करणे. | ५०००००००० | १००००००० | ० | १०००१००० |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | प्रभाग क्र. ७ भोसरी बापुजी बुआ चौक ते अग्निशामक केंद्राच्या रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे. | विशेष योजना | व्हीजन २०२५ | २६ | ११६ | ५००००००० | १००० | प्रभाग क्र. ७ भोसरी स्मशानभुमी ते अग्निशामक केंद्रापर्यतचा रस्ता अद्यावत पध्दतीने विकसित करणे. | ६०००००००० | २००००००० | ० | २०००१००० |
| ५ | स नं. ६९५ येथील मध्यवर्ती भागात असलेल्या मनपाच्या ताब्यातील आरक्षणाच्या जागेत (PMPML) बस डेपो येथे व्यापारी संकुल व छोट्या व्यवसायिकांसाठी गाळे उभारणे | विशेष योजना | व्हीजन २०२५ | १८७ | ८५ | ३०००००००० | १००० | स नं. ६९५ येथील मध्यवर्ती भागात असलेल्या मनपाच्या ताब्यातील आरक्षणाच्या जागेत (PMPML) बस डेपो येथे व्यापारी संकुल व छोट्या व्यवसायिकां साठी गाळे | ३०००००००० | १००००००० | ० | १०००१००० |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | उभारणे | | | | |
| ६ | प्रभाग क्र. ७ भोसरी येथील आंतरराष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षण इमारती मध्ये स्थापत्यविषयक अनुषंगिक कामे करणे | विशेष योजना | भोसरी स न १ मधील मनपाच्या ताब्यात आलेली आरक्षण विकसित करणे | ९ | ६४ | १०००००००० | १००० | - | | १००००००० | ० | १०००१००० |
| ७ | प्रभाग क्र. ७ भोसरी येथील कै. अंकुशराव लांडगे नाटयगृहाचे नुतनीकरण करणे व अनुषंगिक कामे करणे. | विशेष योजना | भोसरी येथे प्रेक्षागृह इमारत बांधणे व इतर अनुषंगिक कामे करणे | ६ | ६४ | २०००००००० | १००० | - | | १००००००० | ० | १०००१००० |
| ८ | प्रभाग क्र.१० मधील महात्मा ज्योतीराव फुले पुतळ्या शेजारी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे व त्याकामी वास्तुविशारद | विशेष योजना | - | - | - | १०००००००० | ० | - | २०००००००० | १००००००० | ० | १००००००० |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | नेमणे व स्मारकाचे सुशोभिकरण करणेकरीता स्थापत्य विषयक कामे करणे. | | | | | | | | | | | |
| ९ | भुसंपादन निधी | | | ३ | ३४२-३४३ | | १२९८५००००० | | | ० | **१००००००००** | |
| | **एकुण** | | | | | | | | | **१००००००००** | **१००००००००** | **१००००७०००** |

तरी वरील प्रपत्रानुसार उपरोक्त स्थापत्य विषयक कामाचे सुधारीत नावास सुधारीत प्रशासकीय मान्यतेस व सुधारीत तरतुदीस मान्यता देण्यात यावी.

**मा.राहुल जाधव -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.
**मा.ॲड.मोरेश्वर शेडगे-** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.
(सभागृहात गोंधळ)
**मा.महापौर –** कृपया सर्वांनी खाली बसावे सभागृहात गोंधळ घालू नये.

यानंतर उपसूचनेसह दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- ५७५ विषय क्रमांक- ३
दिनांक- १३/१०/२०२० विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ – १)** मा.आयुक्त यांचे जा.क्र.डक्षे/स्था/कावि/४४१/२०२० दि.१४/८/२०२०

मा.राष्ट्रीय हरित लवाद (W2), पुणे यांचेकडे याचिका क्र.४९/२०१९ श्री.सारंग यादवडकर विरूध्द मनपा दाखल आहे. सदर याचिकेमध्ये श्री.सारंग यादवडकर व इतर ३ विरूध्द पुणे महानगरपालिका व इतर असे प्रतिवादी आहेत.

सदर दाव्याची दि.२३/०७/२०१९ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये वादी यांनी बेकायदेशीर अनाधिकृतपणे बांधकामाचा राडारोडा नदीपात्रात (मुळा, मुठा व पवना नदी) टाकण्यात आलेला आहे व त्यामुळे नदीच्या नैसर्गिक प्रवाहात अडथळे निर्माण झालेले आहे व काही ठिकाणी नदीच्या प्रवाहात अडथळे निर्माण करून बेकायदेशीररित्या नदीचा प्रवाह बदलेला असल्याबाबतचे मुद्दे उपस्थित केले. याबाबत तपासणीकामी नोडल एजन्सी महाराष्ट्र पोल्यूशन कन्ट्रोल बोर्ड यांना आदेश दिले, तसेच मा.आयुक्त, पुणे व पिंपरी चिंचवड मनपा यांनी नदीमध्ये कुढल्याही प्रकारचे बांधकामाचा राडारोडा व इतर बांधकामाचे टाकाऊ मटेरिअल यांचा नदीपात्रात भराव होणार नाही याची खात्री करावी व याबाबतचा कालबध्द कृती आराखडा NGTयांना सहा आठवड्याच्या आत सादर करणेबाबत आदेश दिलेले आहेत.

मा.हरित लवाद, पुणे यांचेकडील कोर्ट ऑर्डर दि.२६/०९/२०१९ चे आदेशानुसार पिंपरी चिंचवड मनपा व त्यांचे कार्यक्षेत्रातील पवना व मुळा नदीवरील प्रतिबंधित क्षेत्रातील अनाधिकृत बांधकामे निष्कासीत करणे, ड्रेनेज व कारखाण्याचे प्रक्रीया न केलेले पाणी नदीत न सोडता उपलब्ध सिवरेज ट्रीटमेंट प्लांन्ट मध्ये वळवून आवश्यक प्रक्रीया करावी व ही सर्व कामे करणेकरीता सादर केलेल्या कृती आराखड्यानुसार कामे पुर्ण करावी अन्यथा पुणे मनपा, पिंपरी चिंचवड मनपा व

पी.एम.आर.डी. यांना प्रत्येकी र.रू.१.०० कोटी दायित्व राहील. वर नमूद कामांबाबतचा कृती आराखडा दि.२६/०९/२०१९ रोजी सादर करणेत आलेला आहे.

मा.हरित लवाद, पुणे यांचेकडील कोर्ट ऑर्डर दि.१६/०६/२०२० चे आदेशानुसार नदीच्या सिमा व क्षेत्र नमूद असलेले आराखडे डिस्ट्रीक्ट सर्व्हेअर ऑफ लॅन्ड रेकॉर्ड यांचेकडे उपलब्ध आहे. त्यानुसार नदीच्या सिमा निश्चित करून घेणेत याव्या. तसेच पाऊस सुरू होण्यापुर्वी नदीच्या प्रवाहातील अडथळे पुर्णपणे काढून घेतल्याची खात्री मा.आयुक्त यांनी पावसाळ्यापुर्वी करून घ्यावी असे आदेश कोर्टाने दिलेले आहेत.

त्यानुसार बांधकाम परवानगी विभागाने नदीपात्रातील अनाधिकृत भरावाबाबत संबंधित जागा मालक यांना महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५३ अन्वये नोटीस दिलेल्या असून त्याप्रमाणे भराव काढून घेणेची कार्यवाही करणेबबात कळविलेले आहे. तसेच सदर भराव काढून न टाकल्यास कलम ५३ (६ब) प्रमाणे सदरचा भराव मनपामार्फत काढणेत येईल व सदरचा खर्च वसुल करण्यात येईल याप्रमाणे संबंधित जागा मालकांना कळविलेले आहे.

सदर नदीपात्रातील बेकायदेशीर केलेला राडारोडा काढणे या कामाचा आढावा घेणेबाबत दि.२३/०७/२०२० रोजी मा.आयुक्त, पिं.चिं.मनपा. यांचे दालनात बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत मा.आयुक्त यांनी संबंधित कार्यकारी अभियंता, स्थापत्य यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात येत असलेल्या नदीपात्रातील अनाधिकृत भराव निष्कासीत करणे कामाची निविदा स्वतंत्रपणे काढणेबाबत सुचना दिल्या. कोर्टाच्या आदेशाची अंमलबजावणी ही कालमर्यादित असल्याने कामाची कार्योत्तर प्रशासकीय मान्यता घेऊन व कामास तरतुद उपलब्ध करून घेणेबाबत सुचना दिल्या.

त्यानुसार कामाचे प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव व मा.महापालिका सभेची मान्यता मिळणेच्या उमेदमान्यतेवर बांधकाम परवानगी विभागाने जमिन मालकांना दिलेल्या नोटीसी मधील परिमाणानुसार ज्या त्या क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील नदीपात्राजवळील राडारोडा काढण्याचे अंदाजपत्रक तयार करणेत आले असून सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम सोबतच्या प्रपत्र-अ प्रमाणे येत आहे. सदर अंदाजपत्रकासाठी महाराष्ट्र शासन यांचेकडील सन २०१९-२०२० ची मंजूर दरसूची व

मनपा तांत्रिक विभागाकडील मंजूर दरपृथ्थःकरणानुसार दर घेणेत आलेले आहे व निविदा नोटीस प्रसिध्द करणेत आलेली आहे.

सदर कामासाठी सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकातील सोबतच्या **प्रपत्र-अ** प्रमाणे वाढ घट करून पर्यावरण विभागाच्या **भांडवली-अ पिं.चिं.मनपा परिसरातील पवना नदी पुर्नरूज्जीवन प्रकल्प राबविणे** या लेखाशिर्षातून **र.रू.१०,००,००,०००/-** विषयांकित कामावर तरतूद वर्ग करण्यास व सदर कामाच्या नावाचा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२०-२१ च्या मुळ अर्थसंकल्पात "**पर्यावरण अभियांत्रिकी विभागाच्या भांडवली-अ**" या लेखाशिर्षाअंतर्गत समावेश करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच श्री.नारायण विदयालय ही संकेत विहार, गहुंजे येथे असुन शाळेत एकुण २६५ विद्यार्थी शिक्षण घेत असून ते सर्व या परीसरातीलच आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातून शाळेतील बाथरुम, टॉयलेटमध्ये पुरेसे पाणी उपलब्ध असणे अत्यावश्यक आहे. परंतु गहुंजेचा पाणीपुरवठा अनियमित असल्यामुळे शाळेला रोज टँकरने पाणी पुरवठा करावा लागतो तरी सुध्दा विद्यार्थ्यांची अत्यंत गैरसोय होत आहे. त्यामुळे या शाळेला महानगरपालिकेच्या पाईप लाईनवरुन नळकनेक्शन दिल्यास या विद्यार्थ्यांची पाण्याची कायमची सोय होईल तसेच महानगरपालिकेची पाईपलाईन शाळेपासून फक्त १०० मीटरवरुन गेली आहे. त्यामुळे या शाळेस महानगरपालिकेच्या पाईप लाईनवरुन नळकनेक्शन देणे सहज शक्य आहे. तसेच कनेक्शन दिल्यास ही शाळा मनपाची पाणीपट्टी भरण्यास तयार आहे. या शाळेतील विद्यार्थ्यांची गैरसोय पाहता मानवतावादी दृष्टिकोन ठेवून या विद्यालयास मनपाच्या पाईप लाईनवरुन नळकनेक्शन देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच राज्य शासनाने कोरोना विषाणुंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधक कायदा 1897 व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005, दि.13/03/2020 पासुन लागू केलेला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या परिसरात देखील कोरोना साथरोगाचा प्रादुर्भाव झाल्याने महानगरपालिका अधिनियम कलम 63 (3) नुसार साथरोग नियंत्रणात ठेवणेकामी आवश्यक उपाययोजना तातडीने करणेकरीता वस्तू अथवा सेवांची आपत्कालीन परिस्थीतीत तातडीने खरेदी करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरून महानगरपालिका अधिनियम कलम 67 (3) अन्वये विषयांकीत कामास मा. आयुक्त सो. यांनी खालिलप्रमाणे मंजुरी दिलेली आहे.

कै. अण्णासाहेब मगर स्टेडिअम येथे सद्यस्थितीत म.रा.वि.वि.कं.कडून डिस्ट्रीब्युशन फीडर द्वारे विजपुरवठा घेणेत आलेला आहे. त्यामुळे सदर ठिकाणी वारंवार होणा-या ट्रिपींगमुळे हॉस्पीटलमधील कामकाजावर परिणाम होत आहे. त्यामुळे दि. ४/९/२०२० रोजी मा. आायुक्त सो. व कार्यकारी समिती यांचेसमवेत झालेल्या बॆठकीमध्ये, म.रा.वि.वि.कं.चा वीजपुरवठा अखंडीत ठेवणे कामी मनपाचे गवळीमाथा पंपींग स्टेशनपासून मनपाचे एक्सप्रेस फीडरवर एक्सटेंशन करून एक्सप्रेस फीडर द्वारे वीजपुरवठा करणेकामी सूचना दिलेल्या आहेत. तसेच सदरचे कामाची निविदा तातडीने प्रसिध्द करणेकामी सूचना दिलेली आहे.

मा. आयुक्त सो. यांचे मान्यतेनुसार विषयांकीत कामाची र.रू. १,१९,५९,७८९.९० इतक्या रकमेची अल्प मुदतीची निविदा प्रसिद्ध करणेत आलेली आहे. सबब विषयांकीत कामाचा अंदाजपत्रकामधे नव्याने समावेश करून कामास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सबब खालील कामाचा अंदाजपत्रकात नव्याने समावेश करून कामास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | क्षेत्रिय कार्यालय | लेखाशिर्ष | अंदाजपत्रकीय / प्रशासकीय मान्यता रक्कम | सन २०२०-२१ ची मूळ तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| १ | कै. अण्णासाहेब मगर स्टेडियम येथील डेडीकेटेड कोव्हिड -१९ हॉस्पीटल करिता विद्युत पुरवठ्याकरिता उच्चदाब २२ KV एक्सप्रेस फीडर द्वारे वीजपुरवठा करणे. | क क्षेत्रिय विद्युत विभाग | कोरोना निधी | १५०००००० | ० |

सबब वरील कामाचा अंदाजपत्रकात नव्याने समावेश करून कामास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

तसेच प्रभाग क्र. ३९ संत तुकाराम नगर येथे विविध ठिकाणी मंडप व्यवस्थेचे काम केले आहे. सदर कामाचा उल्लेख २०२०-२१ अंदाजपत्रकात झाला नाही. तरी सदर कामास २०२०-२१ अंदाजपत्रकात समावेश करुन तरतुद उपलब्ध करुन मिळावी. तरी सदर कामासाठी आवश्यक तरतुद रक्कम रुपये ११५००००/- इतकी वर्गीकरणाद्वारे करुन देण्यास मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | पा. क्र. | आ. . | लेखाशिर्षक | २०१०-२१ ची तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | सन २०२०-२१ चा सुधारीत अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ३९ संत तुकाराम नगर येथील विविध कार्यक्रमासाठी मंडप व्यवस्था करणे | | | स्थापत्य विषयक कामे करणे | ० | ११५०००० | ० | ११५०००० |
| २ | महापौर विकास निधी | ६३ | २ | महापौर विकास निधी | ५००००००० | ० | ११५०००० | ४८८५०००० |
| | एकुण | | | | ५००००००० | ११५०००० | ११५०००० | ५००००००० |

तरी वरील तरतुद वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे.

तसेच प्रभाग क्र. २ मधील औद्योगित वसाहत परिसरातील रस्ते डांबरीकरण करणेचे काम निविदा क्र. 19/4-2019-20 अन्वये मे. धनेश्वर कन्स्ट्रक्शन यांना दि. 22/01/2020 चे आदेशान्वये 18 महिने मुदतीत पुर्ण करणेसाठी देणेत आलेले आहे.

प्रभाग क्र. २ जाधववाडी मधील बोल्हाईचामळा कॉलनी क्रं. 1 ते 10 व मधला पेठा कॉलनी क्रं. 11 ते 16 या नागरीवसाहती मधील रस्ते अत्यांत खराब झालेले आहे. व तेथिल नागरीकांची सदरचे रस्ते तातडीने नव्याने करणे बाबत मागणी आहे. तसेच औद्योगिक वसाहतीमध्ये रस्त्यांची रूंदी कमी असलेने पाण्याचा निचरा निट होत नाही. व औद्योगिक भागामध्ये विद्युत विषयक खोदाई (खाजगी) वारंवार होते. त्यामुळे रस्ते टिकत नाहीत. परिणामी सदरचे काम लोकवस्तीत करणे गरजेचे वाटते. या भागातील रस्त्याची दुरावस्था पाहता अत्यावश्यक वाटते.

तरी निविदा क्र. 19/4-2019-20 मधून औद्योगिक वसाहत परीसरातील रस्त्यांचे डांबरीकरणा ऐवजी बोल्हाईचामळा कॉलनी क्रं. 1 ते 10 व मधला पेठा कॉलनी क्रं. 11 ते 16 मधील रस्त्यांचे सिमेंट क्रॉक्रीटीकरण/डांबरीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच प्रभाग क्र. २ जाधववाडी येथे जि. प. प्राधमिक शाळा इमारतीचे जागेवर प्राथमिक आरोग्य केंद्र बांधणे निविदा क्र. 26/8-2019-20 अन्वये कामाचे आदेश मे. जे. पी. इन्फ्रा यांना दि.18/09/2019 चे आदेशान्वये 12 महिने मुदतीने देणेत आले होते. सदरचे कामामधून गट नं 605 मधील 2 गुंठे क्षेत्रावर प्रथमिक आरोग्य केंद्राची दुमजली इमारत बांधणेचे नियोजन करून RCC Work बांधकाम प्लॅस्टर पाण्याची टाकी सह इमारतीचे काम दि. 12/08/2020 पर्यंत पुर्ण झालेले आहे. सद्यस्थितीत सदरचे इमारतीचे कामामधील फरशी काम दरवाजे/खिडक्या सिमाभिंत बांधणे इत्यादी कामे अपुर्ण आहेत.

याच प्रभागातील निविदा क्र. 67/03-1019-20 नुसार प्रभाग क्र. २ चिखली गावठाण चिंतामणीनगर येथील मनपाची जुनी मोडकळीस आलेली व्यायामशाळा पाडून नविन RCC मध्ये व्यायामशाळा इमारत बांधणेच्या कामाचा आदेश मे. अक्षया इंन्टरप्रायझेस यांना देणेत आले आहेत. परंतू प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे काम कोविड -19 चे पार्श्वभुमीवर उर्वरीत रक्कम रूपये १० लाखाचे काम प्रथमतः पुर्ण करणे आवश्यक आहे.

सबब निविदा क्र. 67/03-2019-20 मधून प्राथमिक आरोग्य केंद्र बांधणेचे उर्वरीत काम रक्कम रूपये १००००००/- पर्यंत करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच सन २०२०-२१च्या अंदाजपत्रकात वाढ / घट करणेबाबत व सुधारित प्रशासकीय मान्यता व नावात बदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | लेखाशिर्ष | उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | पानांक | अ. क्र. | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | सुधारीत प्रशासकीय मान्यता | सन २०२०-२१ चा मुळ अंदाज | वाढ | घट | सन २०२०-२१ चा सुधारीत अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भांडवली -(नाला ट्रेनिंग - मुख्यालय ) | प्रभाग क्र.२० मधील महात्मा फुलेनगर व लांडेवाडी झोपडपट्‌टी समोरचा नाला विकसित करणे.(सन २०२०-२१) | ३१२ | ७ | ३०००००० | ३००००००० | १०००००० | ४९००००० | | ५९००००० |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | विशेष योजना | प्रभाग क्र.२० कासारवाडी येथील रस्ते विशेष पध्दतीने विकसित करणे. | ४१ | २३१ | ५००००००० | ५०००००० | | | ४९००००० | १००००० |
| **एकुण** | | | | | | | | **४९०००००** | **४९०००००** | |

तसेच सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकात नव्याने काम समाविष्ट करुन त्यास प्रशासकीय मान्यता व तरतुदीत वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे.

| **अ क्र** | **कामाचे नाव** | **अंदाजपत्रकीय रक्कम** | **लेखाशिर्ष** | **पान क्र. अ.क्र** | **सन २०२०-२१ ची तरतूद** | **वाढ** | **घट** | **सन २०२०-२१ चा सुधारित अंदाजपत्रक** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | आकुर्डी धर्मराज चौक ते इस्कॉन मंदीर पर्यंतचा रस्ता अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार विकसित करणे. | १५.०० कोटी | UTF | - | ० | १.०० कोटी | - | १.०० कोटी |
| २ | आकुर्डी गुरुद्वार चौकापासुन ते राजयोग कॉलनी पर्यंतचा रस्ताअर्बन स्ट्रीट डिझाईननुसार विकसित करणे. | १०.०० कोटी | UTF | - | ० | १.०० कोटी | - | १.०० कोटी |
| ३ | सांगवी किवळे रस्त्यावरील रावेत ते मुकाई चौकापर्यंत रस्त्याचे रूंदीकरण करणे. | ५०.०० कोटी | UTF | ६४१/२६ | १.०० कोटी | - | ७५.०० लाख | २५.०० लाख |
| ४ | रावेत स.नं. १५१ इस्कॉन मंदीर ते भोंडवे कॉर्नर पर्यंतचा रस्त्यावर डाऊन रँम्प बांधणे. | २०.०० कोटी | UTF | ६४१/२७ | १.०० कोटी | - | ७५.०० लाख | २५.०० लाख |
| ५ | सागंवी किवळे रस्त्यावर शिंदेवस्ती रावेत येथे उड्डाणपुल / ग्रेडसेपरेटर बांधणे. | ७५.०० कोटी | UTF | ६४१/३८ | १.०० कोटी | - | ५०.०० लाख | ५०.०० लाख |
| | **एकूण** | | | | **३.०० कोटी** | **२.०० कोटी** | **२.०० कोटी** | **३.०० कोटी** |

प्रभाग क्र.२६ पिंपळे निलख येथील खालील नमूद केलेल्या विकास कामाला सन २०२०-२०२१ च्या अंदाजपत्रकात असलेली तरतुद अपुरी पडत आहे. तरी सन २०२०-२०२१ चे मुळ अंदाजपत्रकातील खालील नमूद केलेल्या चालू कामांना आवश्यक तरतुद देणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र | उप लेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | लेखाशिर्षक | अ.क्र. | पा.क. | मुळ प्रशासकीय मान्यता र.रु. | सुधारित प्रशा. मान्यता | सन २०२०-२०२१ ची मुळ तरतुद | वाढ | घट | आवश्यक तरतुद मान्यता र.रु. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्र.क्रं. २६ पिपंळे निलख स्मशानभूमी विकसीत व इ.स्था. विषयक अनु.कामे करणे. | स्थापत्य विशेष योजना (चालू कामे) | २१ | ३५ | ३०००००० | ३०००००० | १०००००० | ५०००००० | ० | ६०००००० | |
| २ | प्रभाग क्र.२६ कस्पटेवस्ती स्मशानभूमी विकसीत व इ. स्थापत्य विषयक अनुषंगिक कामे करणे. | स्थापत्य विशेष योजना (चालू कामे) | २१ | ३४ | ३०००००० | ३०००००० | १०००००० | ५०००००० | ० | ६०००००० | |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | प्रभाग क्र.२६ वाकड येथील समर्थ कॉलनी, तनिष्क कॉलनी व इतर परिसरा मध्ये क्रॉकीटीकरणने रस्ता विकसीत करणे. | स्थापत्य विशेष योजना (नविन कामे) | ३५ | ११२ | २५००००००० | २५००००००० | १००००० | ३००००००० | ० | ३०१००००० | |
| ४ | प्रभाग क्र.२६ पिंपळे निलख मधील उर्वरीत रस्ते क्रॉकीटीकरणने विकसीत करणे. | स्थापत्य विशेष योजना (नविन कामे) | ३५ | ११३ | २०००००००० | २०००००००० | १००००० | ३००००००० | ० | ३०१००००० | |
| ५ | प्रभाग क्र.२६ पिंपळे निलख सर्व्हे नं.०२ व ४२ मधील आरक्षण क्र.३८० भाजी मंडई व दुकान केंद्र विकसीत करणे. | स्थापत्य विशेष योजना (नविन कामे) | ४५ | ३०९ | १०००००००० | १०००००००० | १००००० | ३००००००० | ० | ३०१००००० | |
| ६ | प्रभाग क्र.२६ पिंपळे निलख येथील बापुजी बुवा चौक ते पिंपळे निलख स्मशानभूमी पर्यंता १८.०० मी. रूंदीचा | स्थापत्य विशेष योजना (नविन | ४६ | ३१३ | १०००००००० | १०००००००० | १००००० | २००००००० | ० | २०१००००० | |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | डी.पी. रस्ता विकसीत करणे व मनपाच्या ताब्यात येणारे रस्ते विकसीत करणे. | कामे) | | | | | | | | | |
| | एकुण | | | | ७१००००००० | ७१००००००० | २४००००० | १२००००००० | ० | १२२४००००० | |

तरी वर नमूद केलेप्रमाणे सन २०२०-२०२१ च्या मुळ अर्थसंकल्पात सदर कामाला सुधारित तरतुद करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

उपरोक्त विषयान्वये खालील विकास कामाचे नावात बदल करणे व सुधारीत प्रशासकीय मान्यता देणे व तरतूद करणेबाबत खालील प्रमाणे बदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र | अदाजपत्रक सन २०२०-२१ नुसार मुळ कामाचे नाव | लेखाशिर्षक | उपलेखार्शिषक | अ.क्र. | पा.क. | मुळ प्रशासकीय मान्यता र.रु. | अंदाजपत्रक सन २०२०-२१मधील मुळ तरतुद | नावात बदल झालेल्या कामाचे नाव | सुधारीत प्रशासकीय मान्यता र.रु. | वाढ करावयाची तरतूद | घट करावयाची तरतूद | आवश्यक तरतुद मान्यता र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ७ भोसरी आदिनाथनगर येथील पावसाळी पाण्याचा निचरा करणेसाठी विविध स्थापत्य विषयक कामे करणे. | विशेष योजना | इतर विशेष योजना व बी.ओ.टी. प्रकल्प | १९७ | ८६ | ३०००००००० | १००० | प्रभाग क्र.७ भोसरी येथील स.नं.१ शेजारील नाल्याची सुधारणा करणे | ५०००००००० | १००००००० | ० | १०००१००० |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | व स्थापत्य विषयक कामे करणे. | | | | |
| २ | प्रभाग क्र.७ भोसरी चांदणी चौक ते लांडेवाडी महाराष्ट्र बँके पर्यंतचा रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे | विशेष योजना | व्हीजन २०२५ | २५ | ११४ | १००००००००० | १००० | प्रभाग क्र.७ भोसरी चांदणी चौक ते लांडेवाडी महाराष्ट्र बँके पर्यंतचा रस्ता अद्यावत पध्दतीने विकसित करणे. | ६००००००००० | २००००००० | ० | २०००१००० |
| ३ | प्रभाग क्र.७ भोसरी बापुजी बुआ चौक ते पी.सी.एम.टी चौक पर्यंत च्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. | विशेष योजना | व्हीजन २०२५ | २५ | ११५ | १००००००००० | १००० | प्रभाग क्र.७ भोसरी बापुजी बुआ चौक ते पी.एम.टी चौक पर्यंतचा रस्ता अद्यावत पध्दतीने विकसित करणे. | ५००००००००० | १००००००० | ० | १०००१००० |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | प्रभाग क्र. ७ भोसरी बापुजी बुआ चौक ते अग्निशामक केंद्राच्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. | विशेष योजना | व्हीजन २०२५ | २६ | ११६ | ५००००००० | १००० | प्रभाग क्र. ७ भोसरी स्मशानभुमी ते अग्निशामक केंद्रापर्यंतचा रस्ता अद्यावत पध्दतीने विकसित करणे. | ६०००००००० | २००००००० | ० | २०००१००० |
| ५ | स नं. ६९५ येथील मध्यवर्ती भागात असलेल्या मनपाच्या ताब्यातील आरक्षणाच्या जागेत (PMPML) बस डेपो येथे व्यापारी संकुल व छोट्या व्यवसायिकांसाठी गाळे उभारणे | विशेष योजना | व्हीजन २०२५ | १८७ | ८५ | ३०००००००० | १००० | स नं. ६९५ येथील मध्यवर्ती भागात असलेल्या मनपाच्या ताब्यातील आरक्षणाच्या जागेत (PMPML) बस डेपो येथे व्यापारी संकुल व छोट्या व्यवसायिकां साठी गाळे | ३०००००००० | १००००००० | ० | १०००१००० |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | उभारणे | | | | |
| ६ | प्रभाग क्र. ७ भोसरी येथील आंतरराष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षण इमारती मध्ये स्थापत्यविषयक अनुषंगिक कामे करणे | विशेष योजना | भोसरी स न १ मधील मनपाच्या ताब्यात आलेली आरक्षण विकसित करणे | ९ | ६४ | १०००००००० | १००० | - | | १००००००० | ० | १०००१००० |
| ७ | प्रभाग क्र. ७ भोसरी येथील कै. अंकुशराव लांडगे नाटयगृहाचे नुतनीकरण करणे व अनुषंगिक कामे करणे. | विशेष योजना | भोसरी येथे प्रेक्षागृह इमारत बांधणे व इतर अनुषंगिक कामे करणे | ६ | ६४ | २०००००००० | १००० | - | | १००००००० | ० | १०००१००० |
| ८ | प्रभाग क्र.१० मधील महात्मा ज्योतीराव फुले पुतळ्या शेजारी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे व त्याकामी वास्तुविशारद | विशेष योजना | - | - | - | १०००००००० | ० | - | २०००००००० | १००००००० | ० | १००००००० |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | नेमणे व स्मारकाचे सुशोभिकरण करणेकरीता स्थापत्य विषयक कामे करणे. | | | | | | | | | | | |
| ९ | भुसंपादन निधी | | | ३ | ३४२-३४३ | | १२९८५००००० | | | ० | १०००००००० | |
| | **एकुण** | | | | | | | | | १०००००००० | १०००००००० | १००००७००० |

अनुकूल- ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

(सभागृहात गोंधळ)

**मा.ॲड.मोरेश्वर शेडगे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- ५७६ विषय क्रमांक- ४
दिनांक- १३/१०/२०२० विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ** – १) मा.आयुक्त यांचे जा.क्र.मभा/१५/कावि/३४४/२०२० दि.२४/८/२०२०

जिल्हाधिकारी कार्यालय पुणे, आपत्ती व्यवस्थापन कक्ष यांचेकडील पत्र आ.व्य./पगस/कावि/905/2019 दि.11/08/2019 व पत्र क्र. आ.व्य./पगस/कावि /904/2019 दि. 11/08/2019 नुसार कोल्हापुर व सांगली जिल्हा येथील अतिवृष्टी व पुरपरिस्थिती व तदनंतरच्या उपाययोजनांसाठी आवश्यक साधन सामुग्री प्रचलित दराने (निविदा प्राप्त दरानुसार) तातडीने उपलब्ध करुन देणेबाबत कळविले होते. त्यानुसार मे. रेखा इंजिनिअरिंग वर्क्स यांना रुपये 70,000/- मे.शिवसमर्थ एंटरप्रायजेस यांना रुपये 7,18,200/- व मे. शुभम उद्योग यांना रुपये 12,735/- चे पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेले होते.त्यानुसार सबंधित पुरवठादारांनी घमेली, मास्क व खराटे या साहित्यांचा पुरवठा जिल्हाधिकारी कार्यालय सांगली व कोल्हापुर येथे केलेला आहे.

त्यानुसार कोल्हापुर व सांगली जिल्हा येथील अतिवृष्टी पुर परिस्थिती व तदनंतरच्या उपाययोजना करण्यासाठी आवश्यक साधन सामुग्रीचा पुरवठा करणेसाठी खालीलप्रमाणे पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेले होते.

| अ.क्र. | पुरवठादाराचे नाव | पुरवठा आदेश क्रमांक | आदेशाची रक्कम रुपये | वाहतूक खर्च | एकूण | साहित्याचा तपशिल |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मे. रेखा इंजिनिअरिंग वर्क्स चिंचवड, पुणे 19 | मभां/15/कावि/369/2019 दि. 12/08/2019 | 70,000/- | 10620/-- | 80,620/- | घमेली |
| 2 | मे. शिवसमर्थ एंटरप्रायजेस निगडी, पुणे 44 | मभां/15/कावि/368/2019 दि. 12/08/2019 | 7,18,200/- | 32,000/- | 7,50,200/- | खराटे |
| 3 | मे. शुभम उद्योग, पिंपरी पुणे 18. | मभां/15/कावि/370/2019 दि. 12/08/2019 | 12,735/- | - | 12,735/- | मास्क |

त्यानुसार सबंधित पुरवठादार यांनी आदेशातील नमुद केलेल्या साहित्याचा पुरवठा सांगली व कोल्हापुर येथे मुदतीत केलेला असून पुरवठा केलेल्या साहित्याची देयके अदायगीकामी वाहतूक खर्चासह सादर केलेली आहेत.

मा. जयश्री कटारे, निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे यांचेकडील पत्र क्र. आ.व्य./पगस/कावि/905/2019 दि. 11/08/2019 अन्वये सदर साधनसामुग्रीच्या खरेदी व पुरवठा यांची देयके जिल्हाधिकारी कार्यालय, आपत्ती व्यवस्थापन कक्ष यांचेकडून अदा केली जातील असे कळविले होते.

त्यानुसार सबंधित पुरवठादारांची देयके अदायगीकामी जिल्हाधिकारी कार्यालय, आपत्ती व्यवस्थापन कक्ष पुणे यांचेकडे पाठविणेत आली असता आपत्ती व्यवस्थापन कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय पुणे यांनी पत्र क्र. आव्यप्र/197/2019 दि. 23/12/2019 अन्वये सांगली व कोल्हापुर जिल्ह्यातील अतिवृष्टी व पुरपरिस्थिती व तदनंतरच्या उपाय योजनांसाठी आवश्यक लागणारे साहित्याचा पुरवठा अनेक सामाजिक संस्था व महानगरपालिका यांनी केलेला होता व त्याची सर्व देयके सबंधित संस्था व महानगरपालिका यांनी अदा केलेली आहेत तसेच पुणे महानगरपालिकेमार्फत अतिवृष्टी व पुर परिस्थिती साठी वाहन व्यवस्था करणेत आलेली होती व त्यासबंधीचे देयके त्यांनीच अदा केलेली आहेत असे कळविले आहे.

सबब कोल्हापुर व सांगली जिल्हा येथील अतिवृष्टी व पुरपरिस्थिती व तदनंतरच्या उपाययोजनांसाठी आवश्यक साधन सामुग्री प्रचलित दराने (निविदेनुसार) खरेदीसाठी व त्यासबंधित पुरवठादार यांची देयके अदा करण्यासाठी येणा-या रुपये 8,43,555/- चे खर्चास मा. स्थायी समिती सभेने ठराव क्र. 7185 दि. 24/06/2020 अन्वये मान्यता दिलेली असून महापालिका हद्दीबाहेर खर्च करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.संतोष लोंढे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

(सभागृहात गोंधळ)

**मा.ॲड.मोरेश्वर शेडगे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- ५७७ विषय क्रमांक- ५

दिनांक- १३/१०/२०२० विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ-१)** मा.आयुक्त यांचे जा.क्र.हक्षे/स्था/३०६/२०२० दि.२६/८/२०२०

राज्य शासनाने कोरोना विषाणुंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधक कायदा 1897 व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005, दि.13/03/2020 पासुन लागू केलेला आहे.पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या परिसरात देखील कोरोना साथरोगाचा प्रादुर्भाव झाल्याने महानगरपालिका अधिनियम कलम 63 (6) नुसार साथरोग नियंत्रणात ठेवणेकामी आवश्यक उपाययोजना तातडीने करणेकरीता वस्तू अथवा सेवांची आपत्कालीन परिस्थीतीत तातडीने खरेदी करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 67 (3) अन्वये विषयांकित कामास वर्गीकरण करण्यास मा.आयुक्त सो.यांनी खालीलप्रमाणे मंजूरी दिलेली आहे.

| अक्रं | उपलेखाशिर्ष अथवा कामांचे नाव | पानांक | अक्रं | अंदाजपत्रकीय र. रू. | लेखाशिर्ष | सन २०२०-२१ ची मुळ अंदाज (उपलब्ध तरतूद) | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | सन २०२०-२१ चा सुधारीत अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वाय.सी.एम.हॉस्पिटल येथे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी आवश्यक कामे करणे, नवजात अर्भक विभागाचे नुतनीकरण करणे, डॉक्टरांचे निवासस्थान | १७ | २७ | ५९०००००० | विशेष योजना | ४,००,००,००० | ११०००००० | ० | १५०००००० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | नुतनीकरण करणे.( भाग-२)(फेज-२) | | | | | | | | |
| २ | भूसंपादन निधी | ३४२ | ३ | | | १२९८५००००० | | ११०००००००० | ११८८५००००० |
| | एकूण | | | | | | ११०००००००० | ११०००००००० | |

तरी उपरोक्त विषयांकित कामास वरीलप्रमाणे कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

**मा.संतोष लोंढे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता--
अनुकूल- ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

(सभागृहात गोंधळ)

**मा.ॲड.मोरेश्वर शेडगे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक- ६
दिनांक- १३/१०/२०२० विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ-१)** मा.आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/२/कावि/३५८/२०२०
दि.४/९/२०२०

पिंपरी चिंचवडमहानगरपालिका आस्थापनेवर **'आरोग्य कार्यकारी अधिकारी'** अभिनामाचे **१** पद **पे.लेवल S-२३ वेतनश्रेणी ६७७००-२०८७००** मध्ये शासन मंजूर असून सदरचे पद रिक्त आहे. प्रस्तुतच्या पदाकरीता शासन निर्णयाप्रमाणे निर्धारीत केलेली अर्हता पुढीलप्रमाणे :-

महाराष्ट्र शासन राजपत्र, दि.१८ फेब्रुवारी २०२० अधिसूचना पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार पुढीलप्रमाणे,

**पदोन्नतीने १०० %**

महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत सहाय्यक आरोग्य अधिकारी या पदाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणा-या अधिका-याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.

**'आरोग्य कार्यकारी अधिकारी'** रिक्त पद पदोन्नतीने भरण्याकामी मा.आयुक्तसो यांच्या अध्यक्षतेखाली पदोन्नती समिती सभा दिनांक २८/०७/२०२० रोजी आयोजित करण्यात आलेली होती.

प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व **'सहाय्यक आरोग्य अधिकारी'** पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, आरक्षण, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, मत्ता व दायित्व, संगणक अर्हता आणि शिस्तभंग विषयक कारवाई इत्यादि सेवाविषयक तपशिल पडताळून, **श्री.बेंडाळे विनोद काशिनाथ, सहाय्यक आरोग्य अधिकारी** यांना पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७मध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार खुल्या प्रवर्गातून **'आरोग्य कार्यकारी अधिकारी'** पदावर पे. लेवल S-२३ वेतनश्रेणी ६७७००-२०८७०० या वेतनश्रेणीत पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार शासन मंजूरीच्या अधिन तसेच मा.महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्याबाबत पदोन्नती समितीने सर्वानुमते शिफारस केली आहे.

सबब, श्री.बेंडाळे विनोद काशिनाथ यांना **पे.लेवल S-२३ वेतनश्रेणी ६७७००-२०८७००** मध्ये **'आरोग्य कार्यकारी अधिकारी'** पदावर, पदोन्नती मधील आरक्षण रद्द करण्या संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गाच्या रिक्त जागेवर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यास मान्यता देणेत यावी.

**मा. संतोष लोंढे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.तुषार हिंगे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर नागरवस्ती विकास योजना विभागासाठी समाज विकास अधिकारी हे पद मंजूर असून श्री, संभाजी भगवान ऐवले हे या पदावर दिनांक २२/०८/२०१४ पासून कार्यरत आहेत. या पदाच्या पुढील पदोन्नतीचे पद मुख्य समाज विकास अधिकारी हे असून या पदास महाराष्ट्र शासनाकडून आकृतीबंधात अद्याप मान्यता देण्यात आलेली नाही. तरी मुख्य समाज विकास अधिकारी या पदास शासनाची मान्यता मिळणेकामी पुनश्च प्रस्ताव प्रशासन विभागामार्फत शासनास पाठविण्यास व शासनाची मान्यता मिळेल या उमेदमान्यतेवर सदरच्या पदावर श्री.संभाजी भगवान ऐवले यांची वेतनश्रेणी रु.रु.१५,६००-३९१००- ग्रेड वेतन ६६०० या वेतनश्रेणीत नियुक्ती करणेस मान्यता देणेत यावी. तसेच उदयान विभागामध्ये मुख्य उदयान अधिक्षक हे पद माहे जानेवारी २०२१ रोजी रिक्त होणार आहे. त्या पदासाठी श्री.पी.एम.गायकवाड (उद्यान अधिक्षक) यांचा अनुभव व सेवाजेष्ठता बघता ते त्या पदासाठी पात्र असलेमुळे त्यांना सदर 'मुख्य उद्यान अधिक्षक' या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सेवा नियमावलीस दि. १८ फेब्रुवारी २०२० रोजी महाराष्ट्र शासनाची मान्यता मिळालेली आहे. सद्यस्थितीत श्रीम.स्वाती वडझिरकर, या मनपा सेवेमध्ये केमिस्ट वर्ग-२ या पदावर ३० वर्षापासून कार्यरत आहेत. नविन मंजूर सेवा नियमावलीनुसार त्या चिफ केमिस्ट (Chief Chemist) या पदावर सेवाजेष्ठतेनुसार पात्र आहेत. त्यानुसार स्वाती वडझिरकर यांची चिफ केमिस्ट (Chief Chemist) या पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अस्थापनेवर गट "अ" मधील "मुख्य सुरक्षा अधिकारी" या अभिनामाचे एक पद शासन निर्णय पी.सी.सी./३०१५/प्रक्र/५४५/नवि/२२ दिनांक ३० ऑगस्ट २०१९ नुसार मंजुर करण्यात आलेले आहे. सदर पदाला पे लेवल S- 20 - 56100 - 177500 अशी वेतनश्रेणी शासन मंजुर आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सदर सेवाप्रवेश नियमावलीस दिनांक १८/०२/२०२० रोजी शासन मान्यता मिळालेली आहे.

मनपाचा सुरक्षा विभाग हा अत्यावश्यक सेवा पुरविणारा विभाग असल्याने सदर विभागाच्या कामकाजाचा वाढता व्याप पाहता व सदर पदाची निकड विचारात घेऊन तसेच "मुख्य सुरक्षा अधिकारी" या पदास शासन मान्यता असल्याने सुरक्षा विभागातील सद्यस्थितीत श्री.उदय गणपत जरांडे हे दिनांक ०४/०४/२०१३ पासून सुरक्षा अधिकारी या पदावर कार्यरत असुन ते सेवा ज्येष्ठता यादीमध्ये एकमेव

अधिकारी असून ते पदोन्नती मिळणेस पात्र आहेत. तसेच “मुख्य सुरक्षा अधिकारी” पदास असणारी अर्हता ते धारण करीत असल्याने त्यांना “मुख्य सुरक्षा अधिकारी” या पदावरील पदोन्नतीला मान्यता देणेस तसेच त्याबाबतची सर्व प्रशासकिय कार्यवाही तातडीने करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच सद्याचे ‘सुरक्षा अधिकारी’ यांची ‘मुख्य सुरक्षा अधिकारी’ या पदावर पदोन्नतीने नेमणूक झाल्यानंतर ‘सुरक्षा अधिकारी’ हे पद रिक्त होणार आहे.

तरी ‘सुरक्षा अधिकारी’ हे पद रिक्त झाल्यानंतर सदर पदावर महापालिका अस्थापनेवर ‘सहा. सुरक्षा अधिकारी’ पदावरील सेवाजेष्ठ अधिकारी श्री.विलास बाबासाहेब वाबळे सहा.सुरक्षा अधिकारी हे एम.कॉम,एम.ए., एम.एम.एस. या प्रमाणे शैक्षणिक अर्हता धारण करीत असुन त्यांची सदर पदावरील सेवा ७ वर्ष ४ महिने इतकी झाली आहे. त्यांची सेवा विचारात घेता तसेच ते पदोन्नतीची आवश्यक अर्हता धारण करीत असल्याने श्री. विलास बाबासाहेब वाबळे, सहा. सुरक्षा अधिकारी यांची पदोन्नतीने ‘सुरक्षा अधिकारी’ पदावर नेमणूक करणेस मान्यता देण्यात यावी.

**मा.राहुल जाधव -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.ॲड.मोरेश्वर शेडगे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेसह दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

(सभागृहात गोंधळ)

ठराव क्रमांक- ५७८ विषय क्रमांक- ६
दिनांक- १३/१०/२०२० विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ-१)** मा.आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/२/कावि/३५८/२०२०
दि.४/९/२०२०

पिंपरी चिंचवडमहानगरपालिका आस्थापनेवर '**आरोग्य कार्यकारी अधिकारी**' अभिनामाचे **१** पद **पे.लेवल S-२३ वेतनश्रेणी ६७७००-२०८७००** मध्ये शासन मंजूर असून सदरचे पद रिक्त आहे. प्रस्तुतच्या पदाकरीता शासन निर्णयाप्रमाणे निर्धारीत केलेली अर्हता पुढीलप्रमाणे :-

महाराष्ट्र शासन राजपत्र, दि.१८ फेब्रुवारी २०२० अधिसूचना पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार पुढीलप्रमाणे,

**पदोन्नतीने १०० %**

महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत सहाय्यक आरोग्य अधिकारी या पदाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणा-या अधिका-याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.

**'आरोग्य कार्यकारी अधिकारी'** रिक्त पद पदोन्नतीने भरण्याकामी मा.आयुक्तसो यांच्या अध्यक्षतेखाली पदोन्नती समिती सभा दिनांक २८/०७/२०२० रोजी आयोजित करण्यात आलेली होती.

प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व '**सहाय्यक आरोग्य अधिकारी**' पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, आरक्षण, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, मत्ता व दायित्व, संगणक अर्हता आणि शिस्तभंग विषयक कारवाई इत्यादि सेवाविषयक तपशिल पडताळून, **श्री.बेंडाळे विनोद काशिनाथ, सहाय्यक आरोग्य अधिकारी** यांना पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७मध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार खुल्या प्रवर्गातून '**आरोग्य कार्यकारी अधिकारी**' पदावर पे. लेवल S-२३ वेतनश्रेणी ६७७००-२०८७०० या वेतनश्रेणीत पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार शासन मंजूरीच्या अधिन तसेच मा.महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्याबाबत पदोन्नती समितीने सर्वानुमते शिफारस केली आहे.

सबब, श्री.बेंडाळे विनोद काशिनाथ यांना **पे.लेवल S-२३ वेतनश्रेणी ६७७००-२०८७००** मध्ये '**आरोग्य कार्यकारी अधिकारी**' पदावर, पदोन्नती मधील आरक्षण रद्द करण्या संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गाच्या रिक्त जागेवर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर नागरवस्ती विकास योजना विभागासाठी समाज विकास अधिकारी हे पद मंजूर असून श्री, संभाजी भगवान ऐवले हे या पदावर दिनांक

२२/०८/२०१४ पासून कार्यरत आहेत. या पदाच्या पुढील पदोन्नतीचे पद मुख्य समाज विकास अधिकारी हे असून या पदास महाराष्ट्र शासनाकडून आकृतीबंधात अद्याप मान्यता देण्यात आलेली नाही. तरी मुख्य समाज विकास अधिकारी या पदास शासनाची मान्यता मिळणेकामी पुनश्च प्रस्ताव प्रशासन विभागामार्फत शासनास पाठविण्यास व शासनाची मान्यता मिळेल या उमेदमान्यतेवर सदरच्या पदावर श्री.संभाजी भगवान ऐवले यांची वेतनश्रेणी रु.रु.१५,६००-३९१००- ग्रेड वेतन ६६०० या वेतनश्रेणीत नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच उदयान विभागामध्ये मुख्य उदयान अधिक्षक हे पद माहे जानेवारी २०२१ रोजी रिक्त होणार आहे. त्या पदासाठी श्री.पी.एम.गायकवाड (उद्यान अधिक्षक) यांचा अनुभव व सेवाजेष्ठता बघता ते त्या पदासाठी पात्र असलेमुळे त्यांना सदर 'मुख्य उद्यान अधिक्षक' या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सेवा नियमावलीस दि. १८ फेब्रुवारी २०२० रोजी महाराष्ट्र शासनाची मान्यता मिळालेली आहे. सद्यस्थितीत श्रीम.स्वाती वडझिरकर, या मनपा सेवेमध्ये केमिस्ट वर्ग-२ या पदावर ३० वर्षापासून कार्यरत आहेत. नविन मंजूर सेवा नियमावलीनुसार त्या चिफ केमिस्ट (Chief Chemist) या पदावर सेवाजेष्ठतेनुसार पात्र आहेत. त्यानुसार स्वाती वडझिरकर यांची चिफ केमिस्ट (Chief Chemist) या पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अस्थापनेवर गट "अ" मधील "मुख्य सुरक्षा अधिकारी" या अभिनामाचे एक पद शासन निर्णय पी.सी.सी./३०१५/प्रक्र/५४५/नवि/२२ दिनांक ३० ऑगस्ट २०१९ नुसार मंजुर करण्यात आलेले आहे. सदर पदाला पे लेवल S- 20 - 56100 - 177500 अशी वेतनश्रेणी शासन मंजुर आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सदर सेवाप्रवेश नियमावलीस दिनांक १८/०२/२०२० रोजी शासन मान्यता मिळालेली आहे.

मनपाचा सुरक्षा विभाग हा अत्यावश्यक सेवा पुरविणारा विभाग असल्याने सदर विभागाच्या कामकाजाचा वाढता व्याप पाहता व सदर पदाची निकड विचारात घेऊन तसेच "मुख्य सुरक्षा अधिकारी" या पदास शासन मान्यता असल्याने सुरक्षा विभागातील सद्यस्थितीत श्री.उदय गणपत जरांडे हे दिनांक ०४/०४/२०१३ पासून सुरक्षा अधिकारी या पदावर कार्यरत असुन ते सेवा ज्येष्ठता यादीमध्ये एकमेव अधिकारी असून ते पदोन्नती मिळणेस पात्र आहेत. तसेच "मुख्य सुरक्षा अधिकारी" पदास असणारी अर्हता ते धारण करीत असल्याने त्यांना "मुख्य सुरक्षा अधिकारी" या पदावरील पदोन्नतीला मान्यता देणेस तसेच त्याबाबतची सर्व प्रशासकिय कार्यवाही तातडीने करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच सद्याचे 'सुरक्षा अधिकारी' यांची 'मुख्य सुरक्षा अधिकारी' या पदावर पदोन्नतीने नेमणूक झाल्यानंतर 'सुरक्षा अधिकारी' हे पद रिक्त होणार आहे.

तरी 'सुरक्षा अधिकारी' हे पद रिक्त झाल्यानंतर सदर पदावर महापालिका अस्थापनेवर 'सहा. सुरक्षा अधिकारी' पदावरील सेवाजेष्ठ अधिकारी श्री.विलास बाबासाहेब वाबळे सहा.सुरक्षा अधिकारी हे एम.कॉम,एम.ए., एम.एम.एस. या प्रमाणे शैक्षणिक अर्हता धारण करीत असुन त्यांची सदर पदावरील सेवा ७ वर्ष ४ महिने इतकी झाली आहे. त्यांची सेवा विचारात घेता तसेच ते पदोन्नतीची आवश्यक अर्हता धारण करीत असल्याने श्री. विलास बाबासाहेब वाबळे, सहा. सुरक्षा अधिकारी यांची पदोन्नतीने 'सुरक्षा अधिकारी' पदावर नेमणूक करणेस मान्यता देण्यात येत आहे.

अनुकूल- ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.महापौर** – सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करणेत येत आहे.

-----

**(उषा उर्फ माई मनोहर ढोरे)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/५/कावि/५५१/२०२०
दिनांक - २/१२/२०२०



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

नमुद केलेप्रमाणे सध्या
लेल्या प्रकल्पाची मुदत
माची गुणवत्ता तपासून
ार मार्च २०१८ पर्यंत
YCMH येथील जागेत
कायदयानुसार मशिन्स
०९/१२/२०१९ रोजी
गितला. त्यास अधिन
शीमध्ये सुरु करु असे
3 यांचेद्वारे करण्याची

ामधून निर्माण होणा-
ग्य त्या अंमलबजावणे
ा वैदयकीय घनकचरा
, यांनाच करारनामा
वे की नव्याने निविदा
ार सोबत जोडलेल्या
ापत्र सादर केले आहे.
या मा.स्थायी समिती

युक्त
महानगरपालिका
४११ ०१८.

दिनांक - २८/०२/२०२०

# प्रपत्र – अ

**BMW प्रकल्प मोशी येथे हलविण्याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून मोशी येथील जागेसाठी ना हरकत दाखला प्राप्त झाल्यापासूनचा घटनाक्रम (२०११ पासून)**

- दि. २४.०८.२०११ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून मोशी येथील जागेसाठी ना हरकत दाखला प्राप्त झाला.
- दि. २०.११.२०११ रोजी मा. स्थायी समिती यांनी ठराव क्र. १५३२६ अन्वये जागा देणेस मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस केली.
- दि. १४.१२.२०११ रोजी मा. महापालिका सभेने ठराव क्र. १२३३ अन्वये जागा देणेस मान्यता दिली.
- दि. १५.०६.२०१२ रोजी मोशी येथील जागेसाठी मूळ करारनाम्यातील अट क्र. ७ नुसार lease deed करण्यात आले
- माहे सप्टेंबर २०१२ मध्ये बांधकाम परवानगी अर्जासोबत जोडण्यासाठी विविध विभागांचे ना हरकत दाखले प्राप्त झाले.
- दि. १७.०६.२०१४ रोजी बांधकाम चालू करणेकरीता दाखला प्राप्त झाला.
- दि. ०१.०७.२०१४ रोजी मे. पास्को एन्विरॉन्मेंटल सोल्युशन्स प्रा. ली. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे consent to Establish मिळणेकामी अर्ज सादर केला.
- दि. १७.०४.२०१५ रोजी केंद्रीय पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय यांच्या अधिसूचनेनुसार या प्रकल्पास Environmental Clearance घेणे बंधनकारक करण्यात आले.
- दि. २२.०७.२०१५ रोजी पिंपरी चिंचवड महानगरपालिका व मे. पास्को एन्विरॉन्मेंटल सोल्युशन्स प्रा. ली. यांच्या संयुक्त नावे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून consent to Establish प्राप्त झाले.
- दि. ११.०४.२०१६ रोजी मा. आयुक्त साहेब यांनी महानगरपालिकेच्या वतीने Environmental Clearance मिळविणेकामी काम करणेकरीता मे. पास्को एन्विरॉन्मेंटल सोल्युशन्स प्रा. ली. यांना परवानगी दिली.
- दि. ११.०४.२०१६ रोजी मे. पास्को एन्विरॉन्मेंटल सोल्युशन्स प्रा. ली. यांनी पर्यावण विभाग, महाराष्ट्र राज्य शासन यांच्या कडे Environmental Clearance मिळणेकामी अर्ज सादर केला.
- दि. १४/०१/२०२० रोजी ३ वर्ष ९ महिन्यांच्या प्रयत्नानंतर पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि मे. पास्को एन्विरॉन्मेंटल सोल्युशन्स प्रा. ली. (PESPL) यांच्या संयुक्त नावे Environmental Clearance प्राप्त झाले.
- BMWM rules 2016 नुसार मार्च २०१८ पर्यंत इन्सिनरेटर व इ. मशीन मध्ये बदल करणे बंधनकारक होते परंतु जागा व Environmental Clearance अभावी हे शक्य झाले नाही.
- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रकल्प हलविणेबाबत दि. ०९/१२/२०१९ च्या नोटीस ला मे. पास्को एन्विरॉन्मेंटल सोल्युशन्स प्रा. ली. दि. २३/१२/२०१९ ला दिलेल्या उत्तरामध्ये Environmental Clearance मिळाल्यानंतर प्रकल्प स्थलांतरित करण्याचे काम सुरु करू असे कळविले आहे.
- दि. १४/०१/२०२० Environmental Clearance प्राप्त झाल्यानंतर त्यात नमूद केलेल्या मुदतीपर्यंत मोशी येथे नवीन नियम व अटींनुसार प्रकल्प स्थलांतरित न केल्यास सध्याचा YCMH येथील प्लांट बंद करण्याची सूचना MPCB कडून येऊ शकते.

२८.०२

आरोग्य वैद्यकिय अधिकारी
पिंपरी–चिंचवड महानगरपालिका
पिंपरी–४११ ०१८.

दिनांक - २८/०२/२०२०

## प्रपत्र – ब

**नवीन संस्था नियुक्त करावयाची असल्यास पुढील प्रक्रिया करावी लागेल व परवानग्या मिळवाव्या लागतील :**

- नवीन संस्थेच्या नावे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून मोशी येथील जागेसाठी ना हरकत दाखला घ्यावा लागेल.
- मा. स्थायी समिती मार्फत जागा देण्याची शिफारस मा. महापालिका सभेकडे करावी लागेल.
- मा. महापालिका सभेची मान्यता घावी लागेल.
- नवीन संस्थेसोबत जागेबाबत lease deed करावे लागेल.
- नवीन संस्थेस नव्याने प्रकल्पासाठी प्लॅन डिजाइन करावा लागेल व विविध विभागांचे ना हरकत दाखले घेवून त्या प्रमाणे बांधकाम परवानगी घ्यावी लागेल.
- पर्यावण विभाग, महाराष्ट्र राज्य शासन यांचे Environmental Clearance मिळवावे लागेल.
- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे Consent to Establish मिळवावे लागेल.
- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे Consent to Operate मिळवावे लागेल

## प्रपत्र – क

**याशिवाय नियुक्त संस्थेस पुढील गोष्टी कराव्या लागतील :**

- नवीन वाहतूकदार नेमणे.
- collection Points ठरविणे.
- MPCB व CPCB यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विविध अहवाल बनविण्यासाठी नवीन हार्डवेअर, सॉफ्टवेअर प्रणाली व संकेतस्थळ बनवावे लागेल.
- बारकोड, GPS, संगणक यांच्यासाठी नवीन प्रणाली बनविणे.
- कर्मचा-यांना त्यासाठीचे आवश्यक प्रशिक्षण देणे.
- प्रकल्पासाठी लागणारी गुंतवणूक व कार्यपद्धती बसविणे.
- वैद्यकीय आस्थापनांशी संबंध प्रस्थापित करणे.

२८.०२

अति. आरोग्य वैद्यकिय अधिकारी

दि. २८/०२/२०२०

# प्रपत्र – ड

**मे. पास्को एन्विरॉन्मेंटल सोल्युशन्स प्रा. ली. यांच्या सकारात्मक बाबी...**

- १५ वर्षांच्या कालावधीत MPCB, वैद्यकीय आस्थापना यांचेकडून कामाबाबत कोणतीही मोठी तक्रार प्राप्त झालेली नाही.
- मे. पास्को एन्विरॉन्मेंटल सोल्युशन्स प्रा. ली. यांना पुणे महानगरपालिकेने सन २००९ पासुन ३० वर्षांकरिता जैव वैद्यकीय कचरा निर्मूलनाचे काम दिलेले आहे.
- मे. पास्को एन्विरॉन्मेंटल सोल्युशन्स प्रा. ली. यांना पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - वसुंधरा पुरस्कार २००९, गट - लहान उद्योग, प्रथम क्रमांक मिळालेला आहे.
- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या Status Report Common Bio Medical Waste Treatment & Disposal Facility (Maharashtra) मध्ये सदर प्रकल्पास प्रथम क्रमांक ' अ ' श्रेणी मिळाली आहे.
- ISO ९००१ & १४००१ मानांकन प्राप्त केलेली जैव वैद्यकीय घनकचरा व्यवस्थापन व विल्हेवाट लावणे यामधील प्रथम संस्था आहे.
- सदर संस्थेने ISO मानांकन प्राप्त केलेले असल्याने त्यातील कामकाजाचा भाग म्हणून त्यांच्या कामाबाबत पिंपरी चिंचवड मनपा हद्दतीतील खाजगी / सरकारी आस्थापनांकडून अभिप्राय घेतला जातो. त्यात त्यांच्या कामाची गुणवत्ता समानधारक आहे, असा अभिप्राय आहे.
- हॉस्पिटलच्या मागणीनुसार वेळोवेळी BMW चे Segregation & Disposal कसे करावे? याचे विनामुल्य प्रशिक्षण दिले जाते.
- सर्व वैद्यकीय आस्थापनांना Barcode पुरवले जातात. ज्यायोगे योग्य वजन, योग्य कॅटेगरी समजण्यास सोपे होते, हि पद्धत २००६ पासून मे. पास्को एन्विरॉन्मेंटल सोल्युशन्स प्रा. ली. (PESPL) वापरत आहे.
- सर्व वाहनांमध्ये Electronic Weight Scale, Barcode Scanner ठेवण्यात आलेला आहे.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे – ४११ ०१८.

# प्रपत्र-अ

(मा.आयुक्त यांचे जा.क्र.डक्षे/स्था/कावि/४४१/२०२० दि.१४/८/२०२० वि.क्र.३ चे लगत)

## प्रपत्र-अ

विषय:- सन २०१९-२०२० चे सुधारीत व सन २०२०-२१ चे मुळ अंदाजपत्रकात पर्यावरण विभागाच्या भांडवली-अ लेखाशिर्षकाअंतर्गत नविन कामांचा समावेश करून त्यास प्रशासकीय मान्यता घेऊन भांडवली विषयक कामातुन तरतुदी वाढ घट करून मिळणेबाबत...

सन २०१९-२०२० चे सुधारीत व सन २०२०-२१ चे मुळ अंदाजपत्रकात पर्यावरण विभागाच्या भांडवली-अ लेखाशिर्षकाअंतर्गत खालील नमूद केलेल्या कामांचा समावेश करून त्यास प्रशासकीय मान्यता घेऊन भांडवली विषयक कामातून तरतुदी वाढ घट करणे आवश्यक आहे. तरी खालील नमूद केलेप्रमाणे सन २०२०-२१ च्या सुधारीत अंदाजपत्रकात कामांचा समावेश करून आवश्यक तरतुदी करून मिळाव्यात. हि

| अ. क्र. | उप लेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | लेखाशिर्ष | अंदाजपत्रक पान क्र. | अंदाजपत्रक अनु. क्र. | प्रशासकीय मान्यता | सन २०२०-२०२१ ची मुळ तरतुद | वाढ | घट | सन २०२०-२०२१ साठी लागणारी आवश्यक तरतुद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पि.चि.मनपा परिसरातील पवना नदी पुर्नरूज्जीवन प्रकल्प राबविणे | भांडवली-अ | ४६२ | ९ | १५५०००००००० | ४००००००००० | ० | १००००००००० | ३००००००००० | |
| २ | इ. ग व ब क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील नदीपात्रालगतचा अनाधिकृत भराव काढून जमिनीची समतल पातळी करणे. | भांडवली-अ | - | - | १३००००००० | ० | ६००००००० | ० | ६००००००० | |
| ३ | इ क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील नदीपात्रालगतचा अनाधिकृत भराव काढून जमिनीची समतल पातळी करणे. | भांडवली-अ | - | - | ८००००००० | ० | ३००००००० | ० | ३००००००० | |
| ४ | प्रभाग क्र.९ चिखली परिसरात राडारोडा उचलणेसाठी यंत्रणा पुरविणे | भांडवली-अ | - | - | २००००००० | ० | १००००००० | ० | १००००००० | |
| | एकुण | | | | १५८०००००००० | ४००००००००० | १००००००००० | १००००००००० | ४००००००००० | |

तरी वर नमूद केलेप्रमाणे सन २०२०-२०२१ च्या मूळ अर्थसंकल्पात नविन कामांचा समावेश करून प्रशासकीय मान्यता व आवश्यक तरतुद मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करावी, हि विनंती.

कार्यकारी अभियंता "ड" व "ग" क्षेत्रिय

कार्यकारी अभियंता "अ" क्षेत्रिय

कार्यकारी अभियंता "इ" क्षेत्रिय

कार्यकारी अभियंता "ब" क्षेत्रिय

सह शहर अभियंता
पिं.चिं.महानगरपालिका
पिंपरी-१८